श्री

ज्ञानदेवकृत अमृतानुभव

व त्यावरील

श्रीशिवकल्याणकृत अमृतानुभवविवरण नित्यानंदैक्यदीपिका.

हा ग्रंथ,

तीन प्रतींवरून तपासून

प्रस्तावना आणि कठीण शब्दांचा कोश

यांसहित

अण्णा मोरेश्वर कुंटे

यांनीं

मुंबई येथें

“निर्णयसागर” छापखान्यांत छापविला.

शके १८१०.

1888

1888

ज्ञानोबा.

आपेगांव या नांवाचें गंगातीरावर एक नामांकित क्षेत्र होतें. तेथील गोविंदपंत या नांवाचे जोशी होते. हे विष्णूचे निस्सीम भक्त होते. ज्ञानेश्वरविजय १–१८ **तैंगोविंदमहानुभाव विलसे सद्विप्रचूडामणी ॥ गैनीनाथकृपे अलभ्यमिनला सज्ञानरूपी मणी ॥ १८ ॥ सारी षट्कर्मयोगाविधिसहित सुखें आश्रमी योगनिष्ठा ॥ नीरायीनामभार्येसह भजत गुरूनाथ गैनी वरिष्ठा ॥ १९ ॥** यांच्या बायकोचें नांव निराबाई, ती परम भाविक व पतिव्रता होती. यांना एक पुत्र झाला. त्याचें नांव त्यांणीं विठोबा असें ठेविलें. आठवे वर्षी याचें मौंजीबंधन केलें. विठोबाकडून वेदशास्त्र अध्ययन करवून काव्यव्याकरणादिकांमध्यें हा निपुण झाला. **वेदाध्ययन धर्मशास्त्र निहिते श्रौतादिसांगे पिता ॥ हा वैराग्यविलासवंत न धरी संसारचिंता कथा ॥ २१ ॥** ज्ञा० वि० १. पुढें विठोबाला तीर्थाटन करावें असा अनुताप झाला. ह्मणून मातापित्यांजवळ आज्ञा मागितली. यापासून वडिलांस समाधान वाटून विठोबास तीर्थाटनास जाण्यास अनुमोदन दिलें. याविषयीं भक्तिविजय अ० ८ ओ० २३—**ह्मणोनी अनुताप धरोनियां मना ॥ विठोबा चालिला तीर्थाटना ॥ माया ममता टाकोनी जाणा ॥ हरिभजनीं विनटला ॥** अशा चित्तवृत्तीनें द्वारका, पिंडारक, सुदामपुरी, मूळमाधव, भालूकातीर्थ सोरटीसोमनाथ, धवलपुरी, व पुराणप्रसिद्ध व जगद्विख्यात अशीं मार्गांत समस्त महातीर्थें वंदन करून सप्तशृंगी, त्र्यंबक व भीमाशंकर हीं उर्कून आळंदीस येऊन पोंचला. तेथें चक्रतीर्थांत स्नान करून घाटावर देवतार्चन करीत बसला असतां, सिधोपंत या नांवाचे त्या गांवचे कुळकर्णी स्नानास आले. त्यांणीं विठोबास नमस्कार करून नामाभिधान पुसलें, व आपण कुठचे, येथें येण्याचें कारण काय, इत्यादि विचारतां आपला वृत्तांत विठोबांनीं सिधोपंतास कळविला. **वदे ग्राम गोदातटीं दिव्य आहे ॥ पितामाय माझी असे तेथ पाहे ॥ ३७ ॥ घरीं वृद्ध मातापिता क्षेत्रवासी ॥ अपेगांवची वृत्ति तेथील जोशी ॥ यजुर्वेदवाजीसनी शुद्ध शाखा ॥ असें बोलतां तोष पंतासि देखा ॥ ३८ ॥** सिधोपंताची एकुलतीएक रखमाबाई या नांवाची कन्या होती. तिला चांगलें स्थल मिळावें, या शोधांत ते फार दिवस होते. अनायासें हा प्रसंग फार उत्तम घडून आला, कारण विठोबाचें सौजन्य व भक्ति पाहून, व कुलवृत्त ऐकून, हा आपल्या रुखमिणीस योग्य वर आहे असा त्यांचा निश्चय झाला. **ज्ञानी रूपस सत्कुलीन तरणा सत्सूतपस्वी असा ॥ विद्यावंत विचारशील सुचिता सौजन्य सिंधू तसा ॥ गांभीर्यादिगुणें सदा विलससी सत्पात्र भाग्यें अह्मां ॥ जामाता हरिनें दिल्हा न करितां सायास ये आश्रमा ॥ ४३ ॥** ज्ञा० वि० १ मग सिधोपंतांनीं विठोबाची प्रार्थना केली कीं, आज आमचें घर आपण पवित्र करावें. मग त्यांना घरीं घेऊन गेले, व त्यांचा सामोपचार केला. एकदोन दिवस राहून घेऊन त्यांचे जवळ लग्नाची गोष्ट काढली. जरी प्रथम विठोबाच्या मनांत वृद्ध मातापितरांच्या अनुमोदनाशिवाय दूरदेशांत लग्न करावें असें आलें नाहीं; तथापि तो योग घडून आलाच. लग्नानंतर कांहीं दिवसांनीं

सासूसासरा, व विठोबा आणि त्यांची पत्नी आषाढीस पंढरीस गेलीं. तेथें तें रमणीय क्षेत्र, तो भगवन्नामाचा गजर, त्या भक्तांच्या झुंडी, तीं प्रेमळ निरूपणें, व सर्व जातीच्या भक्तांमध्यें परस्परांविषयीं समदृष्टी पाहून विठोबाच्या मनावर मोठा संस्कार झाला. पुन्हा सहकुटुंब ही मंडळी आळंदीस आली. विठोबांनीं आपला रामेश्वरास जाण्याचा मनोदय सिधोपंतांस कळविला, व त्यांचें अनुमोदन घेऊन पुन्हा पंढरीस जाऊन तेथून अनुक्रमानें, शैलपर्वत, मल्लिकार्जुन, वेंकोबाचा गिरी, गोकर्ण अशीं पहात पहात रामेश्वरास पोंचले. मग परत येतांना कोल्हापूर, माहुली इत्यादि तीर्थें करून आळंदीस येऊन पोंचले. रस्त्यावर विठोबाची वृत्ति कशी होती याविषयीं भक्तिविजय अ० ८ ओ० ७६९ **मार्गीं चालतां सत्वर गती ॥ हृदयीं चिंती विठ्ठलमूर्ती ॥ मुखीं गात नाम कीर्ती॥ सप्रेम गती करूनी ॥** आळंदीस पोंचल्यानंतर आतां मातापिता यांचें दर्शन घ्यावें असें मला वाटतें आहे, तरी आतां मला आज्ञा द्यावी अशी सासऱ्याची प्रार्थना केली. **आपुले कांतेसहवर्तमान ॥ घ्यावें वडिलांचें दर्शन ॥ आह्मीं येत असों बोळवण ॥ भेटीकारणें तयांच्या ॥ ८६ ॥ मग कन्या जामात घेवोनी पाहीं ॥ सिधोपंत आले आपेगांवीं ॥ गोविंदपंतासी लवलाहीं ॥ येऊनियां भेटले ॥ ८७ ॥** विठोबाचा घरसोडल्यापासून परत येई तोंपर्यंत सर्व वृत्तांत ऐकून विठोबाचा बाप गोविंदपंत व आई निराबाई यांस मोठा संतोष वाटला. **वस्त्रें भूषणें उभयतांशी ॥ सिधोपंत देत सन्मानेशी ॥ आज्ञा मागुनी आळंदीशी ॥ परतोनि आले तेधवां ॥ ९२ ॥** कांहीं दिवस लोटल्यानंतर विठोबाचीं वृद्ध मातापितरें निवर्तलीं. संसाराची खटपट ही विठोबास कधीं माहीत नव्हती, तशांत त्याचा सर्व काळ प्रथम अध्ययन, मग तीर्थाटन व भगवद्भजन यांमध्यें गेला असल्यामुळें मातापितरांच्या निवर्तनानंतर विठोबा अगदीं विरक्त झाले. ॥ **संसार चिंतेचा विटाळ ॥ कदा न धरीच विठ्ठल ॥ जैसे येतां तीन्ही काळ ॥ समसमान सर्वांशी ॥ ९४ ॥** अंगचें औदासीन्य व नुकतीच व्याही व विहीण निवृत्त झालीं आहेत ह्मणून जामाताचा एकवेळ समाचार घ्यावा ह्मणोन सिधोपंत आपेगांवास आले. याकरितां:— **मग ह्मणे जामातासी ॥ तुह्मीं तो विरक्त उदासी ॥ सर्व पदार्थ संसारासीं ॥ नित्यानित्य पाहिजे ॥ ९८ ॥** तर कृपा करून मजबरोबर आळंदीस चला. आळंदीस आल्यानंतर विठोबाच्या चित्तास कांहीं समाधान वाटलें. साधू संतांचें दर्शन, नित्य हरिकीर्तन, व दर आषाढी कार्तीकीस पंढरीची यात्राः—ह्या क्रमानें त्या क्षेत्रांत विठोबाचीं बरींच वर्षें लोटलीं. पुत्रसंतान नाहीं, ह्मणोन चित्तास औदासीन्य उत्पन्न झालें, व काशीस जाऊन संन्यास घ्यावा, असा त्याच्या मनाचा ग्रह झाला. कोणत्याहीप्रकारें आळंदींतून सुटका करून घेऊन विठोबा काशीस येऊन पोंचले. तेथें श्रीरामाश्रम या नांवाचे संन्यासी यांस शरण जाऊन संन्यासदीक्षा प्राप्त होण्याकरितां त्यांचे चरण धरिले. रामांश्रमानीं कांता, पुत्र, परिवार यांची विचारपूस करितां, विठोबांनीं मला दारापुत्रादि कांहीं नाहींत ह्मणून चित्तास अनुताप होऊन, दुस्तर संसार, दुर्धर व अनिवार माया, व जन्ममरणांचा येरझार, यांपासून मुक्त होण्याकरतां स्वामींना सद्भावानें शरण आलों आहें, अशी विनंती केली. स्वामींनीं याची विरक्त चित्तवृत्ति पाहून संन्यासदीक्षेस हा योग्य असें वाटून त्यांनीं त्याकरवीं संन्यासग्रहण करविलें, व त्याचें नांव चैतन्य असें ठेविलें. स्वामीपासून चैतन्यास मोठा लाभ झाला

ज्ञा० वि० २ २९ **श्रीशारीरकभाष्य तें पढविलें गीता सभाष्यें बरी ॥ श्रीवासिष्ठ अह- निशीं गुरुमुखें शोधोनि निष्ठा धरी ॥ नानायोगमतें विचित्र निरखी अध्यात्मबोधीं हिता ॥ वेदांतोपनिषद्विचार घडला संतोष दे आयिता ॥** कर्णोपकर्णी सिधोपंतांस व रख- माबाईस विठोबाच्या चतुर्थाश्रमाची बातमी समजली ॥ **कांनीं ऐकुनी संन्यासवार्ता ॥ रडे आक्रोशें पतिव्रता ॥ समाधान करतां मातापिता ॥ मग धैर्ये चित्ता आवरिलें १२६** जन्माचें सार्थक करावें ह्मणून रखमाबाईनीं अश्वत्थाची सेवा आरंभिली. एके दिवशीं त्या आश्व- त्थाच्या पारावर श्रीपाद स्वामी येऊन बसले होते. हे येथें कसे आले, याविषयीं:—ज्ञा० वि० २. ३१.३२ **अकस्मात काशींत याच्या गुरूतें ॥ मनीं वाटलें या मठीं विठ्ठलातें ॥ सुखें स्थापिजे जायिजे रामलिंगा ॥ पुन्हा येइजे सेविजे देवगंगा ॥ ३१ ॥ असें वाटतां नीघता होय वेगीं ॥ पथीं चालतां ये अळंदीस मार्गीं ॥ अकस्मात आकाशपुष्पा- प्रमाणें ॥ विधीनें तया आणिलें हेंचि माने ॥ ३२ ॥ यती ओढिला सत्य ईच्या त- पानें ॥ अकस्मात अश्वत्थनारायणानें ॥** त्यांस पाहून सद्भावानें रखमाबाईनें नमस्कार केला. "अष्टपुत्रा सौभाग्यवती भव" असा आशीर्वाद स्वामींनीं देतांच रखमाबाईस हसूं आलें. श्रीपाद विचारतात, माझ्या आशीर्वादाचा आपणांस विनोद कां वाटला ? रखमाबाई ह्मणतात, महाराज चित्तास अनुताप होऊन मला भ्रतारांनीं सोडून संन्यासग्रहण केलें आहे. तेव्हां हा आशीर्वाद फलद्रूप कसा व्हावा? तरुण स्त्री संतानहीन टाकून जर संन्यासग्रहण झालें, तर शास्त्रामध्यें गुरु व शिष्य या दो- घांस दंड सांगितला आहे, व दोघांसही प्रायश्चित्त घ्यावें लागेल, असें मनांत आणून रखमाबाईपाशीं त्यांच्या भ्रताराच्या खाणाखुणा विचारूं लागले. अंतीं हा शब्द आपल्यावरच येत आहे अशी त्यांची खात्री झाली. आपलीं कोणीं वडिल आहेत काय व त्यांचीं माझी गांठ पडावी अशी स्वामींनीं इच्छा दर्शित केल्यावरून रखमाबाईनें सिधोपंतास बोलावून आणलें. अधिक विचारपूस करतां आपला शिष्य जो चैतन्य तोच इचा नवरा अशी त्यांची खात्री झाली. मी चैतन्यास मठाधिकारी करून रामेश्वराचे यात्रेस निघालों व रस्त्यांत रखमाबाईपासून हें वृत्त ऐकून माझ्यावर दोष येत आहे व माझें सुकृत लयास पावत आहे करितां रखमाबाईस बरोबर घेऊन आपण मजबरोबर काशीस चलावें असें स्वा- मीनें सिधोपंतास सांगितलें. वाराणशीस पोंचल्यानंतर आश्रमांत जाऊन चैतन्यास खरा वृत्तांत काय हा पुसल्यानंतर तो ह्मणाला ॥ **ह्मणे तरुण कांता संतानहीन ॥ सत्यची टाकोनी आलों जाण ॥ १६८ ॥** स्वामी ह्मणाले, आपल्या पत्नीचा अंगीकार करून स्वदेशास जावें, व स्वधर्म आचरावा. व ह्मणाले कीं:—॥ **अविधी कर्माचें भय मानिसी ॥ विकल्पा झणी चित्तीं धरिसी ॥ माझी आज्ञा प्रमाण तुजसी ॥ हृषीकेशी साह्य तुज ॥** असा आशीर्वाद होतांच चैतन्यांनीं स्वामींचे पाय धरिले. सिधोपंत; जामात व कन्या घेऊन आळंदीस आले; व विठोबा ग्र- हस्थाश्रमांत येऊन पुनरपि रखमाईसीं संसार करूं लागले. या संबंधानें गांवांत दुर्जनांचे अनेक आक्षेप होऊं लागले ॥ **एक ह्मणती विषयलंपट ॥ एक ह्मणती कृपण कंटक ॥ एक ह्मणती याचें मुख ॥ पाहूं नये सर्वथा ॥१५२॥ द्विजीं घातलें वाळीत ॥ आप्तवर्गीं सांडिलें त्वरीत ॥** अशा या स्थितींत विठोबांनीं गावांच्या बाहेर एक खोपटी बांधून कांतेसहित

राहिले व उदरपोषणार्थ भिक्षा मागूं लागले. **कुटुंबपोषणाकारण ॥ भिक्षा मागुनी मिळवी अन्न ॥ रात्रंदिवस नामस्मरण ॥ नाहीं खंडण क्षणमात्र ॥ १८२ ॥ गीता भागवत श्रवण मनन ॥ अखंड चित्तीं समाधान ॥ ऐसीं द्वादश वर्षें लोटतां जाण ॥ पोटीं संतानें जहालीं ॥ १८३ ॥ तिघे पुत्र कन्या एक ॥**

या चार मुलांचीं नांवें निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई. निवृत्ती हे शालिवाहन शके ११९० त जन्मले. ज्ञानदेव ११९३ त, सोपानदेव ११९६ त व मुक्ताबाई ११९९ त. दिवसें-दिवस हीं मुलें थोर झालीं. विठोबा स्वतः वेदशास्त्रसंपन्न व भक्तिमान असल्याकारणानें या चा-रही मुलांना तोच मार्ग लागला. अनुक्रमानें निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई हीं १५, १२, ९, ६ इतक्या वर्षांचीं होईतोंपर्यंत यांना सर्व रीतीचीं बापाचा कित्ता लागला. कीर्तन, भजन, अध्यात्माविषयीं विवेचन, वेद, शास्त्र, पुराण व इतिहास इत्यादिकांतील कथा व विषय यांची यांना माहिती झाली. बापाचा सुशील व भक्तिमान नित्यक्रम, सदा सार्वकाळ हरिस्मरण, ऐहिक सर्व विष-यांचें वैराग्य, व एक विठोबाची भक्ति यांविषयींचा प्रेमा हा या चार भावंडांत मोठ्या प्रबल रीतीनें उत्पन्न झाला. केवळ बापाच्या वर्तनाच्या बाह्य संस्कारानेंच हीं मुलें प्रवीण झालीं असें ह्मणतां येत नाहीं. उपजत यांच्या बुद्धीच तीव्र होत्या, ह्मणोन सर्व बापाचे वर्तनाचें यांनीं केवळ अनुकरण केलें असें नाहीं, परंतु यांच्या बुद्धीवर भक्तिमार्गाचा पक्का ठसा उठला. तशांत यांच्या वडिलांनीं यांच्याकडून अध्ययनही करविलें. ज्ञानोबाच्या चरित्रामध्यें हा काल मोठा महत्वाचा आहे. याविषयीं उल्लेख पुढें करूं. मुलांच्या मुंजींचा सुखसोहळा आपण पहावा असें आईस वाटूं लागलें. ती यजमानास ह्मणाली, कीं, हीं तीन मुलें मुंजीयोग्य झालीं आहेत. आपण तर बहिष्कृत, याकरितां ब्रह्मवृंदांस विनंती करून धर्मशास्त्रांतून सवड काढून आपणास प्रायश्चित्त मिळावें, अशी तजवीज करावी. ह्म-णोन ब्रह्मवृंदांची आळंदी येथें सभा जमविली. त्यांत मोठे शास्त्री व वैदिक होते. ह्यांनीं अनेक ग्रं-थांचें विवेचन केलें, परंतु यांच्या प्रायश्चित्ताची तोड कोठेंच सांपडेना! देहांत प्रायश्चित्त हा एक प्र-कार, पण याचा उपयोग काय? विठोबा निराश झाले. यांनीं दारापुत्रांचा त्याग करून थेट प्रया-गाचा रस्ता धरला. व तेथें त्रिवेणींत देहार्पण केलें. याविषयीं नामदेव ज्ञानदेवेश्वरादींत ह्मणतात ॥ **श्रीपाद ह्मणती अवश्य करीन ॥ देह हें दंडीन अनुतापें ॥ ४ ॥ त्रीवेणी संगें मी घालीन कर्वती ॥ गेला पूर्व स्थिति वीत रागें ॥ ५ ॥ दारा पुत्र गृह त्यजूनी नि-घाला ॥ नमस्कार केला द्विजवृंदा ॥** असें ह्मणतात कीं, रखमाबाईला आपल्या भ्रताराचा यथार्थ शेवट समजल्यावर तिनेही आईबापांच्या स्वाधीन हीं चार मुलें करून तोच मार्ग धरिला. माता पिता आह्मांला त्यागून गेलीं. आह्मी आश्रयहीन दीन झालों, तर आमच्या संगोपनाचा अभि-मान आपणास असावा असें निवृत्तींनीं सांष्टांग नमस्कार करून ब्राह्मणवृंदास सांगितलें, तर या-पुढें आमची गति काय? या संबंधानें आज्ञा व्हावी असें विनयपूर्वक सुचविलें. ब्राह्मणांला यांची कांहीं दया आली नाहीं! तुमच्याबरोबर भाषण देखील करूं नये, तुमचें दर्शन झालें असतां सचैल स्नान करावें, असें द्विजांचें उत्तर आलें. मग काय विचारावें! चौघांना गहिंवर दाटून आला व सृष्टि निर्माणकर्ता जो सर्वेश्वर याला दूषण देऊं लागले. **तूं विश्व सृजिता सर्वेश्वर ॥ आह्मां का-**

सया निर्मिलें ॥ ६९ ॥ विधातया ह्मणती विधी ॥ कां ललाटीं लिहिला अविधी ॥ असा प्रकार पाहून विप्र गहिंवरले. तुह्मांस पत्र देऊन पैठणास पाठवूं, व तेथील ब्रह्मवृंदाची जशी आज्ञा होईल तसें करूं. आपल्या जन्माच्या सार्थकाचा धर्मशास्त्राशिवाय दुसरा कांहीं प्रकार निघेल तर बरें, असा निवृत्तीचा निश्चय झाला. ना. ली. अ. २८. **असो सर्वोपरी निराधार ॥ आह्मां कर्म क्रिये नसे आधार ॥ जरी धांवे गुरू दीनोद्धार ॥ निश्चय निर्धार गुरुपदीं ॥ ७६ ॥ जे पितामहाचे श्रीगुरू समर्थ ॥ संकटीं पातले गहीनी नाथ ॥ निवृत्ती मस्तकीं देवूनी हस्त ॥ उपदेश देत तयांतें ॥ ९६ ॥ ह्मणती वत्सा पाहे पाहे ॥ तुह्मांस नसे भव भयाचे भये ॥ माझे सुप्रसन्न वरप्रसादें ॥ त्रैलोक्य विजय पावाल ॥ श्री आदिनाथ, मच्छेंद्र, गोरक्ष पर्यंत ॥ माळिका निवेदिली तयातें ॥ सद्‌गुरू आज्ञापिती निवृत्तीतें ॥ उपदेश त्रिवर्गातें देईजे ॥** हा वृत्तांत झाल्यानंतर हीं ज्ञानदेवादि चार भावंडे आपसांत विचार करूं लागलीं. नामदेवकृत ज्ञानेश्वरआदि **अभंग १८. ह्मणती सकळ द्विज जावें प्रतिष्ठना ॥ तेथूनी पत्र आणा वंद्य करूं ॥ १ ॥ नाहीं जाती कूळवर्णा अधिकार ॥ क्षत्रिय वैश्य शूद्र द्विज नव्हे ॥ २ ॥ नहो देवगण यक्ष ना किन्नर ॥ ऋषी निशाचरते ही नहो ॥ ३ ॥ ते आह्मि अविनाश अव्यक्त जुनाट ॥ निजबोधें इष्ट स्वरूप माझें ॥ ४ ॥ नहो आप तेज वायु व्योम मही ॥ महत्तत्वतेंही विराट नहो ॥ ५ ॥ नव्हे मी सगुण नव्हे मी निर्गुण ॥ अनुभूतीं भजन होऊनी नहो ॥ ६ ॥ निवृत्ती ह्मणतसे ऐके ज्ञानेश्वरा ॥ माझी परंपरा ऐसी आहे ७** नामदेवकृत ज्ञानेश्वरआदि—**अभंग १९. विधिवेद विरुद्ध संपर्क संबंध ॥ नाहीं भेदाभेद स्व स्वरूपीं ॥ १ ॥ अविधि आचरण परम दूषण ॥ वेदोनारायण बोलियेला ॥ २ ॥ स्वधर्म अधिकार जाती परतत्व भेद ॥ उचित तें शुद्ध ज्याचें तया ॥ ३ ॥ ह्मणोनियां संतीं अवश्य आचरावें ॥ जना दाखवावें वर्तोनियां ॥ ४ ॥ कुळींचा धर्म अवश्य पाळावा ॥ सर्वथा न करावा अनाचार ॥ ५ ॥ प्रत्यवाय आहे अशास्त्रीं चालतां ॥ पावन अवस्था जरी झाली ॥ ६ ॥ ज्ञानदेव ह्मणे ऐकावें निवृत्ती ॥ बोलिली पद्धती धर्मशास्त्रीं ॥ ७ ॥** नामदेवकृत ज्ञानेश्वरआदि—**अभंग २०. हेंचि आह्मां श्रेष्ठ बोलिले केपरनिष्ठ ॥ असतां दुर्घट परि सेव्य असे ॥ १ ॥ पांडवांचें कूळ शोधितां निर्मळ ॥ कुंडजारगोळबुद्धि कैशी ॥ २ ॥ भक्ति हे सरती जाती न सरती ॥ ऐशी आत्मस्थिती स्वसंवेद्य ॥ ३ ॥ दुर्वासी वसिष्ठ अगस्ती गौतम ॥ हे ऋषी उत्तम कुळींचे कैसे ॥ ४ ॥ व्यास आणी वाल्मीक कोण कूळ तयांचें ॥ तैसें न आमुचें सोपान ह्मणे ॥ ५ ॥ घेऊनियां पत्र निघाले सत्वर ॥ करोनी नमस्कार सकळांशी ॥ ६ ॥** याप्रमाणें परस्परांचा संवाद होऊन ब्राह्मणांस नमस्कार करून त्यांनीं पैठणचा रस्ता धरला. रस्त्यांत बरेच दिवस लागले. कित्येक ह्मणतात, कीं हे प्रथम त्र्यंबकेश्वरास जाऊन तेथें कांहीं दिवस राहून नंतर पैठणास गेले. कांहीं असो आळंदी सोडल्यापासून ते पैठणास पोचततोंपर्यंत यांचा बराच काळ गेला असें वाटतें. पैठणांत ब्राह्मणांची सभा करून

आपला सर्व वृत्तांत त्यांस निवेदन केला. पत्र वाचून हे कां आले आहेत हेंही ब्रह्मवृंदांस श्रुत झालें त्यांणीं बहुत रीतीनें विचार करून पाहिला. परंतु प्रायश्चित्ताची सवड कोणत्याहीपरी निघेना, तथापि ते ह्मणाले:—**परी एकची उपाय यातें ॥ बोलिला असे शास्त्रमतें ॥ तो करितील तरी यांतें ॥ प्रायश्चित्त कासया ॥ ४१ ॥ श्रीहरीसी जाउनी शरण ॥ सर्वांभूतीं करावें भजन ॥ गोखरगजादि श्वान ॥ समसमान वंदावे ॥ ४२ ॥** याप्रमाणें ऐकून निवृत्ति, सोपान, व ज्ञानदेव यांना परमानंद वाटला. ते ह्मणाले, जसें आमच्या मनांत होतें तशीच धर्मनीतिही निघाली. मुक्ताबाईनेंही या यांच्या ह्मणण्यास रुकार दिला. सभेंत जमलेल्या ब्राह्मणांनीं निवृत्ती, सोपान, ज्ञानेश्वर व मुक्ति हीं नांवें ऐकून मोठें आश्चर्य मानिलें; व त्या वेळेस व त्यानंतर जितके दिवसपर्यंत हीं भावंडें पैठणास होतीं तोंपर्यंत त्यांचें वर्तन, विद्या, व भक्ति, पाहून त्यांची खात्री झाली; व हीं नांवें यथार्थ आहेत असें त्यांस वाटलें. **पैठणींचे जन समस्त ॥ सप्रेमभावें वेधले बहुत ॥ ह्मणती धन्य वैष्णवभक्त ॥ संसारीं विरक्त सर्वदा ॥ ७६ ॥ नित्य करुनी गंगास्नान ॥ वेदांतव्याख्या पुराणश्रवण ॥ रात्रीं होत हरिकीर्तन ॥ करिती श्रवण सकळीक ॥ ७७ ॥ हे वेदत्रय मूर्तिमंत ॥ यांसी न चले प्रायश्चित्त ॥ कीं जगद्गुरु देहातीत ॥ जीवन्मुक्त असती हे ॥ १०३ ॥** पैठणांत यांच्या भगवद्भक्तीची फार कीर्ति झाली. हें पत्र घेऊन जेव्हां आळंदीस जावयास निघाले, त्या वेळेस—**गांवाबाहेर निघतां जाण ॥ बोळवीत चालले ब्राह्मण ॥ अश्रुपातें भरले नयन ॥ देती क्षेम प्रीतीनें ॥ ११२ ॥ सद्गदहोऊनियां चित्तीं ॥ एकमेकांतें उत्तर बोलती ॥ ह्मणती ज्ञानेश्वराचे संगती ॥ उत्तम काळ क्रमियेला ॥ ११३ ॥ एक अर्ध कोशपर्यंत ॥ नरनारी आल्या बोळवीत ॥ तयासी ज्ञानेश्वर विनवीत ॥ परतोनि जावें मंदिरा ॥ ११४ ॥** हे मार्गक्रमण करित असतां नानापरींच्या कविता करून हरीचे गुण वर्णून कीर्तनें करीत महालय (नेवासें) या नांवाचे क्षेत्रांत आल्यानंतर मोहनीराज यास भेटले. एथें ज्ञानेश्वरांनीं भावार्थदीपिका या नांवाची प्राकृत भगवद्गीतेवर टीका केली. श्रीनिवृत्तिनाथ यांनीं मोठ्या प्रेमानें ज्ञानदेवास ह्मटलें, कीं तूं गीतेवर टीका केलीस हें ठिकच झालें, कारण गीतेचा जो अर्थ अगदीं गहन आहे. त्यावर प्राकृत लेखन आपण केलेंत यांत प्रेमळ जे भाविक जन आहेत यांस ज्ञानप्राप्ती होइलच. आतां आपण स्वबुद्धीच्या उत्कर्षानें अमृत ह्मणजे, अखंड, अशी जी वस्तु, जिचा अनुभव सर्वकाळ, सर्वदेशीं, सर्वावस्थेंमध्यें सर्वांस आहे, व जी सिद्धच आहे, तिचा अनुवाद आपण करावा. **अवश्य ह्मणूनी तये क्षणीं ॥ मस्तक ठेविला सद्गुरुचरणीं ॥ मग स्वात्मबुद्धीनें विचारूनी ॥ अमृतानुभव ग्रंथ केला ॥ १२४ ॥** आळंदीहून निघाल्यापासून पैठणास येईतोंपर्यंत बराच काळ क्रमला असें वर ह्मटलें आहे. या कालामध्यें गैनीनाथाचे आज्ञेप्रमाणें निवृत्तीनें आपल्या तिन्हीही भावंडांस उपदेश केला. ज्ञानदेव आदीमधील जे तीन अभंग वर घेतले आहेत, त्यांत निवृत्तीचें केवळ तादात्म्यस्वरूप झालेलें आहे असें अठराव्या अभंगावरून स्पष्ट समजतें, परंतु ज्ञानोबाचा शिष्टाचार रक्षणकरण्याचा आग्रह, शास्त्रविधी न उल्लंघन करण्याची इच्छा, ही ऐकुणिसावे अभंगावरून स्पष्ट दिसते. सोपानानें तर शास्त्रामध्यें जरी विधिनिषेधांचे प्रकार पुष्कळ असले, तथापि अगदीं नीच जा-

तीचे पावन झाले, इतकेंच नाहीं, तर वाल्मिकादिकांसारखे जगद्वंद्य झाले आहेत, असा कांहीं उद्गार काढला आहे. आत्मप्रतीतीविषयीं या भावंडांमध्यें विषमता या अभंगांच्या लेखावरून दृष्टीस पडते. परंतु पैठणाहून निघतांना अथवा तेथें असतांनाही ही विषमता जाऊन श्रीनिवृत्तीनाथाच्या उपदेशाचा परिणाम पूर्ण झाला आहे असें दृष्टीस पडतें. महालयक्षेत्राहून हे आळंदीस येण्यास परत निघाले, **मार्गीं चालतां चौघेजण ॥ सप्रेम करिती नामस्मरण ॥ रात्रीं नगरांत उतरून ॥ हरिकीर्तन करिताती ॥ १२७ ॥** विषमता जाऊन अखंड चिदैकरसाचें अस्वादन यांना झालें आहे असें या खालील लेखावरून दिसतें. **माया ममता मानापमान ॥ सांडोनि देहाचा अभिमान ॥ ब्रह्मादि पिपीलिकादि करून ॥ लेखिती समान समदृष्टी ॥ १२८ ॥** आळंदीस येऊन पोंचल्यानंतर यांनीं जें पैठणचें पत्र आणिलें होतें तें ब्रह्मवृंदांस दिलें. यांची विद्वत्तेची कीर्ति, विराग, सौजन्य व आत्मज्ञान हीं पैठणचे पत्रांत स्पष्ट लिहून पाठविलीं असावींत. **सप्रेमकरितां हरिकीर्तन ॥ श्रवण करिती सकळ जन ॥ ह्मणती आह्मांकारण ॥ अवतरले सद्गुरू ॥ १४२ ॥** याप्रमाणें हरिकीर्तनांत व आनंदांत हीं भावंडें काळ क्रमूं लागलीं. हें सर्वांस मान्य होतें, तथापि विसोबा यानांवाचा श्रीमान व कर्मठ एक ब्राह्मण होता, तो यांचा तिरस्कार करी. तथापि यांचा सहवास झाल्यानंतर हाही सात्विक होऊन त्यांचाच भक्त झाला. **होतां नारदाचें दर्शन ॥ वाल्मिकें टाकिला तामसगुण ॥ तेवीं ज्ञानदेवाचे संगती करून ॥ सात्विक लक्षण आलें कीं ॥ १९९ ॥**

आळंदींत असतां चांगदेव नामाचा योगी ज्ञानदेवादिकांस भेटावयास आला. हा हट्टयोगामध्यें फार प्रवीण होता, अशी याची ख्याती होती. हट्टयोगाच्या सिद्धीला व चांगदेवाच्या महिमेला मान देणारे असे याचे बहुत शिष्य होते. ह्मणतात कीं हा व्याघ्रावर बसे व याच्या हातांत सापाचा चाबूक असे. यांनीं ज्ञानेश्वराची महिमा सर्व देशभर पसरलेली ऐकिली, व त्यांना भेटावें असें चांगदेवाचे मनांत आलें. ज्ञा० वी० ॥९॥ ९॥ **वेदत्रयासम विराजति देहधारी ॥ हे ब्रह्मसारपुतळे जगसौख्यकारी ॥ जे वर्तती निजविलासगुणे सदाही ॥ सत्कीर्तिघोष अतिवाहत देशदाही ॥ ९ ॥ ऐसा विचित्र महिमा महिमाजीं ऐके ॥ तो चांगया निघत शिष्य कुळें अनेकें ॥ व्याघ्रावरी वळघला बहु योग सिद्धि ॥ दावी जना सुकृत वैभव तत्समृद्धी ॥ १३ ॥** चांगोबाची व ज्ञानोबाची गांठ पडल्यानंतर साक्षात ज्ञानसंपन्न चिदानंदरसांत निमग्न असे हे साधू पाहून, अमृतानुभव हा योगसिद्धीपेक्षां अनंत पटीनें मोठा अशी खात्री होऊन, चांगोबांनीं मुक्ताबाईपासून उपदेश घेतला. **भेटोनि ज्ञानफळ पाउनि स्वच्छ झाला ॥ याचा अहंकृतिविलास बरा विझाला ॥ ओझें जुनाट अति टाकुनि शुद्ध झाला ॥ मुक्ताकृपे परम मुक्तिपदाशि गेला ॥ १६ ॥**

एके दिवशीं ज्ञानदेव पंढरपुरास गेले. मनांत इच्छा ही, कीं नामदेवाची भेट घ्यावी. ज्ञानोबा आपणाला भेटायाला आले याचें नामदेवास मोठें आश्चर्य वाटलें. ज्ञानोबा ह्मणतात, आपल्याला आह्माला कांहीं विचारावयाचें आहे. **कांहीं एक जीवींचें गुज ॥ ऐकशील तरी सांगेन तुज ॥ नामदेवासी हातीं धरूनी सहज ॥ अंतर मंदीरीं पैं नेलें ॥ १७ ॥ ह्मणे जिवन्मुक्त**

झालिया पावन ॥ न सांडिजे गुरुदेवतीर्थभजन ॥ भूतळींचीं तीर्थे संपूर्ण ॥ तुझि-या संगतीनें पाहवीं ॥ १८ ॥ ऐसा हेत धरूनी चित्तीं ॥ तुझे भेटीस आलों प्रीति ॥ माझे मनोरथ पूर्ण होती ॥ किंवा न होती मज सांगा ॥१९॥ ऐसें वचन ऐकोनी ॥ नामा उद्विग्न झाला मनीं ॥ ह्मणे पंढरी क्षेत्र टाकोनी ॥ तीर्थाटनीं कां जावें ॥ नामदेवाला मनापासून पंढरीक्षेत्र सोडावें व इतर तीर्थें करावीं असें वाटेना. तथापि ज्ञानदेवाचा अति आग्रह, त्याला तोडवेना; ज्ञानोबा ह्मणाले. **परी नामया ऐसा प्रेमळ भक्त ॥ घडावी संगत मज याची ॥ याचे संगतीचें घेऊनि सुख ॥ देहाचें करावें सार्थक ॥** मग दोघांनीं पंढरीक्षेत्र सोडिलें. रस्त्यावर ज्ञानाच्या गोष्टी परस्पर करीत चालले. नामदेव हे भक्त, यांच्या भक्तीचा मार्ग नामस्मरण. ज्ञानदेव हे चिद्रूपरसांत निमग्न अमृतअनुभवी; तेव्हां अर्थात नाम व ज्ञान यांमध्यें कांहीं विसंगती पडूं लागली. **नामदेव ह्मणे मी नेणें ॥ योग युक्ति साधन ॥ माझी विश्रांती जगजीवन ॥** भक्त खरा परंतु तूं मी याचा भेद अजून मोडला नाहीं. नामदेवा ऐक; **येरू ह्मणे रे प्रेमळ भक्ता ॥ त्यावीण ठावची न दिसे रिता ॥ भेदभाव सांडुनी आतां ॥ हृदयीं अद्वयता ओळगावें ॥** आतां एकमेकांची समजूत पडावी ह्मणून ॥ **ज्ञानदेव ह्मणे नामयासी ॥ तुवां स्वाधीन केला हृषीकेशी ॥ तो भक्तिमार्ग मजपाशीं ॥ विस्तारासी सांगावा ॥ १३ ॥ कवणेरीतीं करावें भजन ॥ कैसें करावें श्रवण मनन ॥ कैसें आहे निदिध्यासन ॥ धृतिधारण कोणतें तें ॥** नामदेव ह्मणतातः— **मी नेणें बहुव्युत्पत्ती ॥ मी नेणता बहु अज्ञान ॥ आणि तुह्मी पुसता अध्यात्मज्ञान ॥ कल्प तरू याचक होऊन ॥ कृपणमंदिरा पातला ॥** मग नामदेवांनीं जे ज्ञानोबाचे प्रश्न होते त्यांचें उत्तर दिलें. व भक्ति आणि ज्ञान यांच्या गोष्टी करीत रस्त्यावर ठिकठिकाणीं कीर्तन करीत दिल्लीस येऊन पोंचले. तेथील यवनराजा भगवद्भक्तांविरुद्ध होता. तथापि गांवांतील लोकांच्या झुंडीच्या झुंडी यांच्या कीर्तनास जमत. त्या राजानें या भगवद्भक्तांची पुष्कळ तऱ्हेनें परीक्षा केली. अंतीं त्याला यांच्या वैराग्याची, ज्ञानाची, व भक्तीची खात्री होऊन यांना मान देणें जरूर पडलें. दिल्लींतून निघून हे काशिक्षेत्रास येऊन पोंचले. रस्त्यावर ज्या तीर्थावर अथवा गांवांत उतरत तेथें भाषापरत्वें कविता करून हरिकीर्तनें करीत चार महिने हे काशींत राहिले. तेथें यांची व कबिराची गांठ पडली. **कबिराची कीर्ति अति अद्भुत ॥ नामदेवासी जाहली श्रुत ॥ मग ज्ञानदेवासी सांगोनी मात ॥ आले भेटीस कबिराच्या ॥९९॥** भ० वि० अ० ११. ज्ञानदेवानें कबिरास सांगितलें कीं दक्षिणमहाराष्ट्रांत पंढरी या नांवाचें क्षेत्र आहे तें आपण येऊन पहाल तर आपले मनास संतोष होईल. हें ऐकून कबीर ह्मणाले, आह्मी एखाद्या कार्तिकीस येऊं. मग गया, प्रयाग, अयोध्या, मथुरा, द्वारावती, इत्यादि ठिकाणीं राहून मारवाडदेशांत आले. मारवाडांतून बद्रिकाश्रम, हिमाचल, ओढ्या-जगन्नाथ, केदार, उज्जनी, परळी वैजनाथ, सोरटी सोमनाथ, मल्लिकार्जुन, नाशिक, त्र्यंबक, हीं क्षेत्रें फिरून, पश्चिम समुद्राच्या बाजूनें भीमाशंकरास आले. तेथून रामेश्वराकडे चालले व परत फिरतांना आंवढ्या नागनाथास आले. तेथें एक दोन दिवस राहून कीर्तनें केलीं. या कीर्तनांपासून तेथील मंडळीस मोठा आनंद झाला. यांच्या कीर्तनानें सर्व जातींची मंडळी इतकी तल्लीन होऊन गेली कीं,

महिपती ह्मणतात, ती मंडळीः— **श्रवणीं ऐकतां श्रीहरीचे गुण ॥ विदेही होऊनि बैसले ॥१००॥** भ० वि० अ० १२. **ध्यानांत आणूनी जगजेठी ॥ अल्हादें टाळिया पीटिती ॥ विठ्ठलनामें गर्जना करिती ॥ आनंद चित्तीं न समाये ॥ १०१ ॥** तेथील कर्मठ ब्राह्मणांना हा टाळघोष आवडला नाहीं. ते ह्मणाले, उगाच गोंगाट करावा, टाळ्या पिटाव्या, मोठ्यानें हांका माराव्या, हे संताळे खेळ पंढरीसच शोभतात, नागनाथास आवडत नाहींत. आह्मीं, उंच वर्णाचे ब्राह्मण आहोंत. आह्मी सर्वज्ञ शास्त्राधिकारी असतां हा नामदेव उगाच वल्गना काय करितो. परंतु नामदेवाची निःस्पृहता, व तें सिद्धांत ज्ञान ऐकून, ब्रह्मवृंदांनीं आपला अभिमान सोडून नामदेवाची व ज्ञानोबाची प्रशंसा केली. असे फिरत फिरत हे पंढरीस आले. नामदेवानें पंढरी पाहतांच त्याला मोठा आनंद झाला. या ठिकाणीं अनेक भक्तमंडळी यांना भेटावयास आली. येथें यांनीं आपले तीर्थांचें उद्यापन केलें.

पंढरीस असतां तीर्थयात्रा करून आलेले हे साधु, यांना भेटण्याकरितां गोराकुंभार, सावंतामाळी, कूर्मदास, भानुदास, नरहरीसोनार, आणि चोखामेळा इत्यादि महा प्रसिद्ध भक्तिवैराग्यशील साधु भेटण्यास आले होते. ज्ञानदेवाची स्थिति या वेळेस लोकदृष्ट्या अतिविलक्षण झाली होती. ते विनंती करून सर्व साधूंस ह्मणाले कीं, आतां आपण समाधिस्थ व्हावें अशी इच्छा उत्पन्न झाली आहे. कांहीं काळ पंढरींत घालवून हे आळंदीस आले. तेथें अनेक ठिकाणची व विशेषेंकरून पंढरीची पुष्कळ संतमंडळी जमली. कार्तिक वद्य अष्टमी शके १२१९ या दिवशीं ज्ञानोबा समाधिस्थ होणार ह्मणून, असें ह्मणतात, कीं इंद्रायणीच्या तीरावर एक मोठा मंडप उभारला, व कीर्तनें होऊं लागलीं. सिद्धेश्वर या नांवाचें जें मोठें तेथें देऊळ आहे त्या देवळाच्या वामभागीं अजान वृक्षाच्या छायेखालीं दोन खणांची गुहा तयार केली; व त्रयोदशीच्या दिवशीं सर्व सिद्ध साधु इत्यादिकांच्या समक्ष मोठ्या आनंदांत यांनीं गुहेंत प्रवेश केला. यांचे समाधीचें वर्तमान फार दूरदूरच्या गांवांत पसरलें होतें, ह्मणून समाधि घेण्यापूर्वी व समाधिस्थ झाल्यानंतरही आळंदींत मोठी गर्दी झाली होती. अधिकारपरत्वें ज्ञानोबाविषयीं मंडळीच्या मनांत नानातऱ्हेंचे तरंग उत्पन्न झाले.

ज्ञानोबाचें निवळ चरित्र या प्रकारचें आहे. यांच्या चरित्रास साधनः— नामदेवकृत ज्ञानदेवआदि, भक्तिविजय, संतलीलामृत, भक्तितत्वामृत, मत्स्येंद्रसंहिता, मुक्तितत्वामृत, मुक्तिकथासार, नाथलीलामृत, कथाकल्पतरू इत्यादि ग्रंथ आहेत. शके ११९३ यांत ज्ञानोबाचा जन्म झाला. शके १२१९ यांत हे समाधिस्थ झाले. यांनीं केलेले ग्रंथः— त्यांत मुख्य १—भगवद्गीतेवरील प्राकृत टीका (भावार्थदीपिका अथवा ज्ञानेश्वरी.) २—अमृतानुभव. ३—अभंग ज्यांत डौर, मदालसा, दिंडटा, आंधळें, पांगुळ, मुके, सौरी, बहिरे, बाळसंतोष, पंचीकरण, वासुदेव, असे लहान लहान प्रबंध आहेत. ४—उत्तरगीतेवर टीका. ५—योगवासिष्ठावर टीका. ६—चांगदेव पांसष्टी. व ७—हरिपाठ. ज्ञानदेवाचे चरित्राचे चार विभाग होतात. जन्मल्यापासून ते आईबाप मरे तोंपर्यंत जो काल गेला हा प्रथम भाग. साधारण वर्षानुक्रमानें ह्मटलें असतां ज्ञानोबा या वेळेस बारा वर्षांचे असावे. दुसरा विभाग निवृत्तीची नुसती संगती, ह्मणजे निवृत्तीशीं ज्ञानोबाचा बंधुरूपानें सहवास. तिसरा, ज्ञानोबास निवृत्तीपासून उपदेश मिळून निवृत्ति गुरु व ज्ञानोबा शिष्य या तऱ्हेचा दोघांचा सहवास. चवथा, ज्ञानोबाची स्वतंत्र-

पणें वागणूक ह्मणजे त्यांचा आळंदी येथील वास, पंढरपुरची यात्रा, नामदेवासह तीर्थाटण, व समाधि जावत्कालपर्यंत ज्ञानोबाचा आपल्या भावंडांसकट मातापित्यांशीं सहवास होता, तावत्कालपर्यंत जे जे संस्कार ज्ञानोबाचे मनावर व त्यांचे भावंडांचे मनावर घडले, त्याहींकरूनच त्या सर्वांची एक विलक्षण स्थिति होऊन राहिली. ज्ञानोबाचा बाप विठोबा. हा भगवद्भक्तांच्या घराण्यांतील. याचा वडील गोविंद जोशी. यांना गैनीनाथाचा उपदेश मिळाला होता. गोविंदपंतांनीं विठोबाकडून वेदाध्ययन करविलें होतें. ह्मणजे अर्थात दश ग्रंथांचा संस्कार यांना पूर्ण झाला होता. हे काव्य, व्याकरण, व न्याय, हेही पढले. नंतर यांणीं एक मोठें तीर्थाटण केलें. त्या तीर्थाटणांत, नानादेश, नानारीतिभाती, नानापंथ, नाना तऱ्हेचे भक्त, नाना तऱ्हेचीं देवतार्चनें हीं अनुभवास आलीं. नंतर यांनीं संन्यास घेतला. त्या वेळेस त्यांच्या गुरूनीं यांकरवीं शारीरसूत्रादिक ब्रह्मविद्येवर जे ग्रंथ आहेत, त्यांचें अध्ययन करविलें. या अध्ययनाला अन्य दर्शनाचें अध्ययन हें अवश्य साधन आहे. कारण अस्तिक आणि नास्तिक दर्शनांची चांगली ओळख झाल्याशिवाय ब्रह्मसूत्रें व शारीरकभाष्य हीं चांगलीं समजावयाचीं नाहींतच. अशा तऱ्हेचे वेदशास्त्रसंपन्न विठोबा. केवळ शास्त्रसंपन्नच नव्हेत, परंतु हे भक्तिसंपन्नही होते. नामस्मरण, पंढरीची वारी, हरिकीर्तन, देवाच्या गुणानुवादाचें निरूपण, हा सतत यांचा नेहमीं क्रम असे. स्वभावतः हे अनुतापी असत. तशांत मातापितरें मेलीं यामुळें, पुढें पुत्रसंतान होईना यामुळें, गुरूपदेशावरून, बहिष्कृतस्थितींतील अडचणीपासून, व शेवटीं प्रायश्चित्त मिळेना यावरून, विठोबा हे केवळ मूर्तिमान वैराग्यच होते. रखुमाबाईचीही स्थिति अशाच तऱ्हेची. तिचीं आईबापें भगवद्भक्त. तिचा भ्रतार हा असा वर वर्णन केलेला, बहु गुणांनीं संपन्न. यावरून, व भ्रतारानें संन्यासग्रहण केलेल्या कालामध्यें तिचें औदासीन्य, व बहिष्कृतस्थिति, या सर्वांचा परिणाम अति औदासीन्य, मोठें वैराग्य व निःसीमभक्ती, अशी झाली होती. ज्ञानोबाचा अशा दोन व्यक्तींशीं रात्रंदिवस समागम. त्यामुळें आईबापांच्या भक्तीचें व वैराग्याचें अनुकरण, त्यांत विठोबापासून मिळालेलें शिक्षण, याचा परिणाम कोणाही साधारण मुलावर मोठा व्हावयाचाच; तर ज्याची उपजत विशाल बुद्धी, अशा ज्ञानोबावर एक मोठा जगडव्याळ संस्कार झाला होता. वेदाध्ययन, नीति व धर्मशास्त्र, काव्य, व्याकरण, न्याय, इतिहास व पुराणें यांमध्यें ज्ञानोबाचा प्रवेश बापामुळें फार उत्तम झाला. पुढें निवृत्तीच्या समागमापासून आणीक एक दुसऱ्या तऱ्हेचा संस्कार झाला. आईबापांनीं प्रायश्चित्त मिळावें ह्मणून आळंदीच्या ब्राह्मणांची याचना केली; ती याचना निरुपयोगी होऊन मातापितरांनीं देहत्याग केला. अशा संकटांत हीं चार अनाथ भावंडें व त्या सर्वांचे निवृत्ति हे दादा. इतर तीन भावंडांचा सांभाळ आपल्यावर येऊन पडला, कर्ममार्गापासून ह्मणजे श्रुतिस्मृतिपुराणोक्त व लोकव्यवहारिक शुचिर्भूतपणा आपणांस येत नाहीं, आपण सर्वथैव पतित, असा विचार मनांत येऊन सृष्टिनिर्माणकर्ता जर सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, सर्वन्यायी असा कोणी आहे, तर आह्मीं जे सृष्ट यांना या अशा दुःखांत ठेवणें हें त्याला लांछन आहे. तर लांछनाजोगता प्रकार नसून केवळ व्यवहारांतच गडबड आहे. अशी निवृत्तीची खात्री होऊन, याशिवाय दुसरा कांहीं प्रकार आहे कीं काय ह्मणून शोधूं लागतां अद्वैतसिद्धांताचे प्रवर्तक गैनीनाथ हे त्यांस भेटले. त्यांपासून सर्व संशयांची निवृत्ति होऊन निवृत्तिनाथास पूर्णदशा प्राप्त झाली. प्रवृत्तीच्या घोंटाळ्यांत असणारे निवृत्ति अशा स्थितींत, प्रवृत्ति व निवृत्ति-

रहित निवृत्ति, अशा दोन्हींस्थितींच्या निवृत्तींशीं ज्ञानोबाचा समागम झाला. यानंतर जे अन्य मार्ग, त्यांत प्रबळ दोन मार्ग, असे लोकप्रचारांत त्यावेळेस होते; एक योग, व दुसरा केवळ नामस्मरणानें ईश्वरप्राप्ति, त्याविषयीं ज्ञानोबा विचार करूं लागले. अद्वैतसिद्धांताचे पूर्ण मर्मज्ञ हे होते. "सर्वं खल्विदं ब्रह्म". या सृष्टिव्यापारांत मुळीं सृष्टीच नाहीं, व्यापारही नाहीं, मग त्या व्यापरांतर्गत सुखदुःख, ज्ञानअज्ञान, पतितपावन, बद्धमुक्त, अशीं हीं द्वंद्वें कोठून असणार! जें ज्ञानअज्ञानरहित, जन्ममृत्युरहित, सुखदुःखादिरहित, जें कांहीं एक अनिर्वचनीय आहे; ज्याचा अनुभव प्रत्येकास आहे, व जें प्रत्येक आहे, व जें साध्यसाधनरहित व नामानामव्यतिरिक्त, जें सदा प्राप्त त्यास योगाभ्यासानें काय साध्य होतें, व नामानें काय प्राप्त होतें, हें ज्ञानोबांनीं आपल्या स्वतंत्रस्थितीमध्यें पाहिलें. या वेळेंतच यांचा व चांगदेवाचा समागम झाला, व याकारणास्तवच नामदेवाला बरोबर घेऊन यांनीं तीर्थाटणें केलीं. नाम व ज्ञान, हीं दोन्हीं पडताळून पाहिलीं. यावरील लेखावरून ज्ञानोबाच्या चरित्राचे जे चार भाग होतात ते स्पष्ट लक्षांत येतील.

दुर्दैव ह्मणा अथवा सुदैव ह्मणा, या हिंदुस्थानासारखा देश या महीतलावर दुसरा नाहीं. भुगोलविद्येसंबंधी पाहिलें असतां हिंदुस्थानाचें वैचित्र्य, भूगर्भविद्येसंबंधी पाहिलें असतां हिंदुस्थानाचें वैचित्र्य, पदार्थविज्ञानामध्यें वैचित्र्य, उद्भिद्, खनिज, धातु, मणी, मंत्र, औषधी, शिल्पविद्या, इत्यादि सर्वप्रकारें अधिभौतिकांत हिंदुस्थान विचित्रच विचित्र. विद्युद्वातावरणादि प्रकार जे आधिदैविक, यांतही वैचित्र्य; अध्यात्माविषयीं तर हा प्रकार विशेषच आहे. "नाना देव नाना मतें ॥ पाहूं जातां असंख्यातें ॥" असें एका कवीचें ह्मणणें आहे. केवळ धर्म व मतानें वैचित्र्य आहे एवढेंच नाहीं, तर भाषा, वर्ण, व्यवहार, पेहराव, आकृति, व्यवसाय यांमध्यें देखिल वैचित्र्यच. शेवटीं राज्यव्यवस्थेची हीच तऱ्हा. कोण जाणे परमात्म्याचा हा अंश असाच काय!! असो. ज्ञानोबा निर्माण होण्यापूर्वी अध्यात्मसंबंधानें या हिंदुस्थानांत नाना तऱ्हेचे प्रकार होऊन गेले होते. अनादि वेदधर्म, ज्यांत केवळ भक्तिवात्सल्य मुख्य होतें; यज्ञयागादि ज्यांत कर्ममार्ग प्रबल होता; अध्यात्मविवेचन ज्यांत वैराग्य विशेष होतें; अशी ही बरेच वर्षांची प्राचीन धर्मव्यवस्था, या वेळचे भक्तिमार्गाचे प्रवर्तक ऋषि, यज्ञयागादिकाचे प्रवर्तक आचार्य, व अध्यात्मविवेचनाचे प्रवर्तक ब्रह्मवादी. या ब्रह्मवाद्यांमध्यें मतविकल्प उत्पन्न होऊन ब्रह्मप्राप्ति अथवा मोक्ष याचें विवेचन होऊं लागलें. सृष्टि निर्माण झाली कशी? सृष्टिनियंता कोण आहे? आपली येथें स्थिति कां? जगतांत चित्रविचित्र प्रकार कां दिसतात? व, यांची परिसमाप्ति कोठें? असे हे गहन विचार उत्पन्न झाले, या विचारांला साधनें काय आहेत. तर हीं साधनें निर्माण झालीं. या साधनांच्या अनुरोधानें या वरील सर्व विषयांचें विवेचन होऊं लागलें. या विचारांमध्यें मतांतरें पडून, षड्दर्शनें उत्पन्न झालीं. यांच्या विचारसरणीमध्यें शाब्दप्रमाण अथवा आप्तवाक्य ह्मणजे वेद, याचें मोठें प्राधान्य आहे. वेद प्रमाण मानणारे मुनी यांना वेदवाक्याचा समन्वय करून व्यवस्था करावी लागली. परंतु वेदालाच प्रमाण न मानणारे असा एक वर्ग या मुनींमध्यें उत्पन्न झाला. यांच्या मताच्या प्रमुख लक्षणांवरून यांना सूचक नांवेंही मिळालीं. बौध्द, चार्वाक, लोकायतिक, आदिकरून एक दुसरा मुनिवर्ग उत्पन्न झाला. वेदप्रमाण मानणारे यांना अस्तिक असें ह्मणूं लागले. वेद प्रमाण न मानणारे यांना नास्तिक असें

ह्मणतात. पुढें अनेक देवतार्चनें प्रचारांत आलीं. त्या त्या देवतेच्या आराधनेवरून, प्राभाकर, रसेश्वर, माहेश्वर, पाशुपत, अशीं मतें उत्पन्न झालीं. होतां होतां स्थानमाहात्म्यानें, नानातीर्थें व नाना दैवतें हीं प्रचारांत आलीं. ठिकठिकाणीं नदी, पर्वत, गुहा, दरी, सरोवरें, झरे, यांचीं माहात्म्यें उत्पन्न होऊन सर्व हिंदुस्थानभर तीर्थांची व पवित्र स्थानांची रेल चेल होऊन गेली. हिंदुस्थानांतील सनातन धर्म वैदिक या वेदाला अनुसरून ह्मणजे वेद प्रमाण धरून ज्या मताचें, ज्या तीर्थाचें, ज्या देवतेचें, ज्या वस्तुविशेषाचें आराधन होई, तोच हिंदुधर्म व याव्यतिरिक्त जे, ते, वेदबाह्यधर्म, असा प्रघात पडला. वेदबाह्य धर्मापैकीं अति अडचण करणारें असें मत ह्मटलें ह्मणजें बौद्धाचें, त्यांत शून्यवाद व विज्ञानवाद हे तर अगदीं दुरुत्तरच झाले. अधिकारपरत्वें या बौद्ध लोकांनीं व्यवस्था केली. राजापासून ते रंकापर्यंत यांनीं धर्मव्यवस्थेची मांडणी केली. हजारो राजे व असंख्य प्रजा बौद्ध होऊन राहिले. वेदधर्म बुडतो असें मोठें संकट येऊन पडलें व बौद्धधर्म उन्मूलन करण्यास पुन्हा व्यवस्थापक उत्पन्न झाले. यांपैकीं कुमारिलभट्ट, मंडणमिश्र शंकराचार्य हे प्रमुख. अशा मंडळींनीं धर्मव्यवस्था केली खरी तथापि जीं पूर्वींच्या देवता व स्थानें होतीं हीं असंख्य होऊन, हिमालयापासून तों रामेश्वरापर्यंत, एक मोठा प्रचंड धर्माचा व्यवहार उत्पन्न झाला. नाना सांप्रदाय उत्पन्न होऊन या सांप्रदायाचे अधिकारीही उत्पन्न झाले. या प्रत्येक सांप्रदायाचे अनुयायीवर्ग निरनिराळे झाले. सांप्रदायांत कांहीं गूढ तत्वें उत्पन्न होऊन गुरुशिष्यपरंपरा बसली. ज्यांना या सांप्रदायांत शिरण्यास कठीण पडूं लागलें, त्यांना एक सोपा मार्ग निघाला. त्या सोप्यामार्गाचें नांव नामस्मरण. अशी व्यवस्था ज्या वेळेस पूर्णदशेस आली त्या वेळेस ज्ञानोबाचा अवतार झाला. निवळ ऋषीपासून तों नामस्मरण भक्तीपर्यंत जे अनेक मतव्यवहार अस्तिक व नास्तिक या देशांत उत्पन्न झाले या सर्वांचा पूर्ण विचार करून जो मोठा अनुग्रह या सिद्धपुरुषानें करून आह्मांस कसें पावन केलें आहे, हें आतां पाहूं या. याला आधार ज्ञानोबाची गाथा व अमृतानुभव.

यांच्या ग्रंथांपैकीं ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, अभंग डौरादिकाची गाथा, चांगदेवपांसष्टी व हरिपाठ हे ग्रंथ सहज उपलब्ध होतात. या ग्रंथांवरून ज्ञानोबाचें यथार्थ ज्ञान होतें. सर्व भगवद्भक्तांमध्यें हे शिरोमणी का? यांचा अधिकार काय? यांनीं आह्मावर काय उपकार केले आहेत? व यांच्यापासून आह्मी लाभ कसा करून घ्यावा? याविषयीं चार अक्षरें लिहितों. भावार्थदीपिका अथवा जी लोकप्रसिद्ध ज्ञानेश्वरी ही भगवद्गीतेवरील टीका. ज्ञानेश्वरीविषयीं उल्लेख करण्याच्या पूर्वी स्वतः भगवद्गीता इचें माहात्म्य काय आहे तें पाहूं. अध्यात्मविचाराचा ज्या शास्त्रांत उल्लेख आहे, ह्मणजे जगद्वंद्य वेदापासून, ब्राह्मण, उपनिषदें, षड्दर्शनें, स्मृति, इतिहास, व पुराण, ज्यामध्यें, सर्वतः, अथवा अंशतः जगतोत्पत्ती, मनुष्यधर्म, बंध व मोक्ष व ज्ञान आणि अज्ञान अशा तऱ्हेच्या विषयांचा उल्लेख केला आहे. यांची पृथक् पृथक् विचारणा केली असतां, त्या प्रत्येकांत एकदेशता दृष्टीस पडते. ह्या एकदेशतेनें परस्परांशीं विरोध पडतो. ह्या विरोधाच्या योगानें प्रत्येक शास्त्रमतास एकदेशीयव्यक्तित्व उत्पन्न होतें, आणि ह्या व्यक्तित्वाच्या योगानें त्या त्या शास्त्राच्या अनुयायी लोकांत जरी हिंदु या नांवानें ऐक्य आहे तथापि मोठें गहन मतांतर असून मैत्रभावांत विकल्प येतो. हा घोटाळा दूर करण्यास जो भगवंतांनीं प्रयत्न केला, व प्रयत्न नव्हे, परंतु तो घोटाळा दूर केला, ह्यांत जें शास्त्र उत्पन्न झा-

लें ह्याचें नांव गीता. हें गीताशास्त्र अनेक ठिकाणीं अनुवादिलें आहे. अधिकारानुरूप व मतवात्सल्य ह्यामुळें गीताशास्त्राचे अर्थ अनेक झालेले आहेत. हा प्रकार श्रीमच्छंकराचार्य, मध्व, रामानुज, वल्लभ, श्रीधर, नीलकंठ, शंकरानंद, मधुसूदन इत्यादिकांच्या भाष्यांवरून, मतभेदाच्या अनुरोधानें गीताशास्त्राचे भिन्न भिन्न अनुवाद झाले आहेत हें सहज लक्षांत येतें. अधिकारपरत्वें जें वर ह्मटलें, यांत ही, असाच प्रकार झाला आहे. अधिकारपरत्व व्हावयाला कारणें अनेक आहेत. व्युत्पत्तीच्या योगानें जे नानावाद करावे हे एक जातीचे अधिकारपरत्व, केवळ भाषेच्या ज्ञानानें जो गीताशास्त्राचा अनुवाद होतो हे दुसरे, व केवळ भक्तीच्याच भरानें जो अनुवाद करावा हे तिसरे. अशा तऱ्हेचीं अधिकारपरत्वें शोधावयास गेलें असतां अनेक निघतील. याचीं उदाहरणें जीं प्राकृत अथवा हिंदुस्थानांतील अनेक भाषेमध्यें गीतेचीं भाषांतरें झालीं आहेत, तसेंच यवन लोकांनीं जीं भाषांतरें केलीं आहेत त्यांवरून ही गोष्ट लक्षांत येण्यास सुलभ आहेत. निवृत्तिमहाराज यांनीं ज्ञानोबास गीतार्थ प्रकट करण्यांत प्रसाद दिला, ह्मणजे जें सर्व शास्त्रांचें माहेर, व ज्या गीताशास्त्राचा हाच उद्देश आहे कीं, अनेक आर्यमतांचा मेळ बसवावा व मुमुक्षूनें कर्म, ज्ञान, व उपासना यांतील कोणताही पक्ष स्वीकारला असतां चित्तास समाधान व्हावें. ज्ञानोबांनीं गीतार्थ मराठी भाषेंत प्रकट केला आहे. ज्ञानोबाचा अधिकार फार मोठा होता. हा ह्यांच्या चरीत्रावरून लक्षांत येतोच. तशांतून निवृत्तिनाथांचें ह्यांना पाठबळ. गीतार्थ जसा आहे तसा प्रगट करावा येवढाच काय तो ज्ञानेश्वरी या टीकेचा उद्देश. यांत ज्ञानोबाचा स्वानुभव प्रकट करण्यास सवड नाहीं. गीतेविषयीं अर्थगांभीर्याचें केवढें माहात्म्य आहे व तें स्पष्ट करण्यास निवृत्तीची केवढी मदत हें खालील वेंच्यांवरून समजेल. ज्ञा० १—५४॥ **हे अपार कैसेनि कवळावें ॥ महातेज कवणें धवळावें ॥ गगन मुठींत सुवावें ॥ मशकें केवीं ॥** अ० ६ ॥ ३२॥ **ते बुद्धिही आकळितां सांकडे ॥ ह्मणऊनी बोली विपाये सांपडे ॥ परी श्रीनिवृत्तीकृपा दीप उजेडे ॥ देखोन मी ॥** अ० ९ ॥३२॥ **तव श्रीगुरु ह्मणती काइ जाहलें ॥ हें समस्तही आह्मां पावलें ॥ आतां सांगे जें निरूपिलें ॥ श्रीकृष्ण देवें ॥** अ० ॥ १० ॥ ४५ ॥ **तैशी देशी आणि संस्कृत वाणी ॥ एका भावार्थाच्या सुखासनीं ॥ शोभती ऐणी ॥ चौखट ऐका ॥** अ० ॥ ११ ॥ २२ ॥ **तव श्रीनिवृत्तीदास ह्मणे ॥ जी श्रीकृष्णार्जुनांचें बोलणें ॥ मी प्राकृत काय सांगों-जाणें ॥ परी सांगावा तुह्मीं ॥** अ० १४—१४६ ॥ **तया अक्षरा आंतील भाव॥ पावचीन मी तुमचा ठाव ॥ ऐका ह्मणे ज्ञानदेव ॥ निवृत्तीचा ॥** आतां कोठें कोठेंही स्वानुभवाचे मासले दृष्टीस, पडतात ते केवळ, अध्यायाच्या अवतरणांत अथवा उपसंहारांत अल्पच सांपडतात. अ० १४–१३ **नाद ब्रह्म खुजे ॥ कैवल्यही तैसें नसजे ॥ ऐसा बोल देखिजे ॥ जेणें दैवें ॥** अ०१७—१७ ॥ **जैं सर्वथा सर्वही नोहिजे ॥ तैं अद्वैता तुंतें लाहिजे ॥ हें जाणें मी वर्म तुझें ॥ आराध्यलिंगा ॥** ज्ञानेश्वरींत गीतार्थाचा उल्लेख करणें हेंच मुख्य वर्म आहे. त्यांत ज्ञानोबास स्वातंत्र्य नाहीं.

देवानें जग उत्पन्न केलें, त्यांत प्राणिमात्र सर्व पदार्थ सृष्ट आहेत. पापपुण्यानुसार उंचनीचपणा जगतांत दृष्टीस पडतो. पुण्यवान पुरुषास धन, दारा, शरीरसंपत्ति, यांचें सुख असतें व तो वारं-

वार पुण्यमार्गांत राहून अंतीं स्वर्गप्राप्ती पावतो. पाप्यास नरकप्राप्ती आहे. चौऱ्यांशीं लक्ष योनींचा येरझार हा प्रत्येकाचे पाठीं लागला आहे. अशा तऱ्हेचे जे साधारण कर्ममार्गाचे व्यवहार यांला अनुसरूनच ज्ञानोबाचें पहिल्या अवस्थेंतील समज:— या सर्व प्रपंचांतून सुटण्यास ऐहिक सर्व पदार्थांचा त्याग करून, समसमान बुद्धि ठेऊन, हरीचें भजन करणें, विठोबाला शरण जाणें, पंढरीची यात्रा करणें, व नेहमी सगुण स्वरूपाचें ध्यान करणें, हा भक्तिमार्ग या वेळीं ज्ञानोबाचा होता. अष्टांगयोगादिक साधनें, अथवा इतर जीं वेदशास्त्रपुराणांत सांगितलेलीं यज्ञतपदानादि सर्व निरुपयोगी आहेत. तसेंच काशी, अयोध्या, इत्यादि महान तीर्थें पंढरीपुढें कांहीं नव्हत. नामस्मरण हाच सर्व मार्गांमध्यें उत्तम मार्ग; उत्तम नव्हे परंतु हा एकच मार्ग. असें या खालील वेंच्यांवरून सहज लक्षांत येईल. **आरंभीं आवडी आदरें आलें नाम ॥ तेणें सकळ सिद्धिजगीं जालें पूर्णकाम ॥ १ ॥ १ ॥ पतितपावन साचे ॥ श्रीविठ्ठलाचें नाम वाचे ॥ २ ॥ २ ॥ गातां वातां नाचतां प्रेम उल्हासें ॥ चराचरीं दोष नाशियले अनयासें ॥ ३ ॥ २ ॥ गोपाळारे तुझें ध्यान लागो मना ॥ अनू नविसंबे हरी जगत्र जीवना ॥ ४ ॥ १ ॥ विश्वाचें जिवन तें म्या सारदेखियलें ॥ योगीध्याती ध्यानीं ब्रह्म तेंचि गोकुळाशीं आलें ॥ ६ ॥ ४ ॥ सांवळें सगूण सकळा जीवांचें जीवन ॥ घनानंदमूर्ती पाहातां हरपलें मन ॥ ७ ॥ २ ॥ तयाचें करीपां स्मरण ॥ आळसू न करीं अंतःकरण ॥ ९ ॥ १ ॥ कर्मातें शंभू मानी आपण ॥ किति पळसी कर्माभेण ॥ बापरखुमादेवीवर विठ्ठला-शरण ॥ केलीं कर्में निवारी नारायण ॥ १२ ॥ ६ ॥ रंगा येइ वो ये रंगा येइ वो ये ॥ विठाई कीठाई माझे कृष्णाई कान्हाई ॥ १५ ॥ ॥ १ ॥ पंढरिचे देवते ॥ विठ्ठल नवसी येवो ॥ १६ ॥ २ ॥ अष्टांग योगें न सिणीजे ॥ यमनेम निरोधन न कीजेरया ॥ १९ ॥ १ ॥ जाइनगे माये तया पंढरपुरा ॥ भेटेन माहेर आपुलिया ॥ २२ ॥ १ ॥ सकळही माझें गोत पंढरीसी जाण ॥ बापदेवीरखुमावरा विठ्ठलाची आण ॥ २५ ॥ २ ॥ माझें जीवींचें तुह्मीं कावो नेणा ॥ माझा बळिया तो पंढरीराणा वो माये ॥ २८ ॥ १ ॥ नामरूपीं प्रीती कीं ध्यानीं सगुणमूर्ती ॥ हेंचि तुझी यशकीर्ती जाणोनियां ॥ हृदईं तुझें रूप मुखीं नामघोष ॥ ९१ ॥ १ ॥ पुत्र कलत्र संपत्ति देखोनी संतोष मानीसी ॥ घडीमाजी नासोनि जाईल जैसें कां अभ्र आकाशीं ॥१०९ ॥ ३ ॥ आह्मां सगूण निर्गूण समान ॥ नेणो जन्म जातक भान ॥ दृश्य द्रष्टा दर्शन त्रिपुटी नलगे माहावाक्यादी शब्द तत्व मत्स्यादि बोध हे ही ॥ आह्मां सकळ वाऊगेरया बापरखुमादेवीवरू विठ्ठलू चिंतिता ॥ ११७ ॥ ३ ॥ चौऱ्याशीं लक्ष योनी क्रमुनीं सायासीं ॥ नरदेहा ऐसें भांडवल पावलाशी ॥ जतन करीरे गव्हारा ॥ नभजें नभजें यासंसारा ॥ बीज सांडुनी असारा वाया झोंबतोशी ॥ ११९ ॥ १ ॥ जीवाचिया-जीवा प्रेमभावाचियाभावा ॥ तुजवांचुनीकेशवा अनूनावडे ॥ १९७ ॥ १ ॥ घरदार वोखटें त्यजूं ह्मणसी तरी शरीरायेवढें जाड ॥ मायबाप वोखटी त्यजूं ह्मणसी तरी अहंकार अविद्येचें कोड ॥ बंधुसखे त्यजूं ह्मणसी तरी काम**

क्रोध मद मत्सर अवघड ॥ बहिणी पाठिच्या त्यजूं ह्मणसी आशा तृष्णा माया अवघड रया ॥ १ ॥ त्यजिलें तें काय कासया ह्मणिजे सांगपां मजशीं ऐसें ॥ जया भेणें तूं जाशी वनांतरातें तव तुजचि सरिसेरया ॥ आपुले आश्रमीं स्वधर्मी असतां सर्वत्र एकुचि जाणा ॥ बापरखुमादेविवरू विठ्ठलु इतुकीयासाठीं नेईल वैकुंठभुवना ॥ ३ ॥ २७४ ॥ पंढरपुरिचा निळा लावण्याचा पुतळा ॥ विठो देखियला डोळा बाई येवो ॥ ३०५ ॥ १ ॥ कटावरी ठेऊनी हात जना दाऊ संकेत ॥ भवजळाब्धीचा अंत इतुलाची ॥ समचरणीच्या खुणा उभा पंढरीचा राणा ॥ तो आवडे जनामना दुर्लभगे माये ॥ ४ ॥ कैवल्याचा गाभा कीं ब्रह्मविद्येचा वालभा ॥ ३०७ ॥ यमनेम प्राणायाम प्रत्याहार हे सकळैव उपावपरी अपायरे ॥ जंव तमानीळ सांवळा हृदईं ठाण मांडुनी न व्हायेरे ॥ ३१४ ॥ ७ ॥ वेदाशास्त्रा पुराणा आणि यज्ञतपदाना ॥ श्रुतीधांडोळितां मना ठावो नुरेची मा मा ॥ ह्मणोनी गवळणी अंगोळीया धरती ॥ ५ ॥ ॥३२०॥ यमधर्म सांगे दूता ॥ तुह्मीं परिसावी निजकथा ॥ जेथें रामनामवार्ता ॥ तया देशा नव जावें ॥ १ ॥ नामें महादोषा हरण ॥ नामें पतीतपावन ॥ नामें कलिमलदहन ॥ भवबंधनमोचक ॥ ३२४ ॥ नाम प्रल्हाद उच्चारी ॥ तया सोडवी नरहरी ॥ ३२७ ॥ १ ॥ भुक्ति आणि मुक्ती नामापाशीं प्रत्यक्ष ॥ चारीवेद साही शास्त्रें देताती साक्ष ॥ २ ॥ ३२९ ॥ काशी अयोध्या कांती मथुरा माया गोमती ॥ ऐसीं तीर्थें इत्यादिकें आहेती ॥ परी सरी न परती पांडुरंगी ॥ ३४९ ॥ पूर्व जन्मीं पाप केलें तें हें बहुत विस्तारलें ॥ विषयसुखा नाशिवंत सेवितां तिमिर कोंदलें ॥ चवऱ्याशीं लक्ष योनी फिरतां दुःख भोगिलें ॥ ज्ञानदृष्टी हरपली ॥ दोन्ही नेत्र आंधळे ॥ ४३० ॥ सकळ धर्माचें कारण ॥ नामस्मरण हरिकीर्तन ॥ ४८४ ॥ ज्ञानदेव ह्मणे नामेवीण जो नरू ॥ तो होय भूमीभारू ये संसारीं ॥ ३ ॥ ५३३ ॥ चहुं वेदीं जाण षड्शास्त्रीं कारण ॥ अठराही पुराणें हरिशींगाती ॥ ५४९ ॥ नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी ॥ पापें अनंत कोडीं गेलीं त्यांचीं ॥ ५६६ ॥ ज्ञानीयासी ज्ञान ज्ञानदेवीं ध्यान ॥ कलिमलछेदन नाम एक ॥ ३ ॥ ६१७ ॥

आईबाप होते तोंपर्यंत अशा तऱ्हेची समज. यापुढें जो निवृत्तिनाथाशीं यांचा समागम झाला, त्यांत प्रथमतः ज्ञानोबास असें वाटूं लागलें, कीं, बोधाशिवाय सर्व व्यर्थ. ज्ञान, हें नामापेक्षां मोठें आहे. ह्मणून त्यांणीं वारंवार निवृत्तीची प्रार्थना केली आहे, व नानातऱ्हेचे प्रश्न विचारिले आहेत. त्यांपैकीं एक मोठा विलक्षण प्रश्न असा कीं, विश्रांतीचें स्थान हें कोठें आहे? व खरी खूण कोणती? कशी समजावी? हें सर्व या गाथ्यांतील वेंचावरून लक्षांत येईल.

वेदशास्त्र जाणितले ॥ आगमीं पूर्ण ज्ञान झालें ॥ पुराण मात्र धांडोळिलें ॥ आहे तें राहिलें वेगळेंची ॥ ३ ॥ शब्द ब्रह्मे होसी आगळा ॥ ह्मणसि न नभियेसी कळिकाळा ॥ बोधेंवीण सुखसोहळा ॥ आहे तो जिव्हाळा वेगळाची ॥ ४ ॥ ११ ॥ कवणाचे मायबाप ॥ कवणाचे गणगोत ॥ मृगजळ वाहत जाईल रया ॥ १९ ॥ वाप

रखुमादेवी वरू न विसंबे सर्वथा ॥ निवृत्तीनें सांगितलें तत्वता ॥ २ ॥ २६ ॥ निवृत्ति प्रसादें मी गोवळियो ॥ माझा भावो तो विठ्ठलून्याहाळिवो ॥ ३ ॥ ३२ ॥ ज्ञान गूढगम्य ज्ञानदेवा साधलें ॥ निवृत्तीनें दिलें माझ्या हातीं ॥ ५६४ ॥ ४ ॥ ज्ञानदेव शरण निवृत्तीच्या चरणा ॥ कासवीचा पान्हा पाजियेला ॥ ५ ॥ ५८३ ॥ ज्ञानदेव विनवी निवृत्तीस काज ॥ हरपली लाज संदेहेसी ॥ ५८९ ॥ निवृत्ती निवांत समरसें पाहात ॥ अवघाचि दिसत देहि विदेह ॥ ५ ॥ ५८८ ॥ निवृत्ती निजबोध आनंदादिकंद ॥ शाखाद्रुमभेद हरी झाला ॥ ५ ॥ ५९९ ॥ वृत्तीची निवृत्ती देखिली म्यां तुझी ॥ हरपली माझी चित्तवृत्ती ॥ ४ ॥ ५९३ ॥ सकळ तीर्थें निवृत्तीच्या पायीं ॥ तेथें गूडी देई माझ्या मना ॥ १ ॥ ६०३ ॥ ज्ञानदेव निवृत्ती पुसतसे काडें ॥ पुंडलीकें केवढें भाग्य केलें ॥ ६ ॥६२९॥ ज्ञानदेवा सार सावळीये मूर्ती ॥ निवृत्तीनें गुंती उगवीली ॥ ३ ॥ ६४८ ॥ विश्रांतीचें स्थान कोण रूप आह्मां ॥ ऐसा हा महिमा सांगा स्वामी ॥ १ ॥६६५॥ ज्ञानदेव पुसे निवृत्ती सौरसे ॥ पुंडलीकें कैसें पुण्य केलें ॥ ३ ॥ ६८४ ॥ बाप निवृत्तीराजे दावीताती खूण ॥ नाम नारायण पाठ कीजे ॥ ३ ॥ ६७८ ॥ ज्ञानदेवा गोडी हरिपदीं आवडी ॥ प्रवृत्तीची थडी उल्लंघीली ॥ ३ ॥ ७०८ ॥

निवृत्तीचा उपदेश मिळाल्यानंतर ज्ञानोबाला सगुणउपासना, ध्यान, नमन, इत्यादिकांचें वैपम्य वाटूं लागलें. मला निवृत्तीनीं ज्ञानगंगेंत बुडविलें. सर्व प्रवृत्तिमार्गापासून मुक्त करून ज्ञानमार्ग दाखविला. आतां माझें समाधान झालें. निवृत्ति माहाराजांनीं जोउपदेश केला हा एक सांप्रदायिक उपदेश होता. हा उपदेश निवृत्तिनाथाला गैनिनाथापासून प्राप्त झाला होता. हा कसा झाला व केव्हां झाला हें पूर्वीं सांगितलेंच आहे. या गुरुशिष्यपरंपरेचें नांव नाथसांप्रदाय. यांमध्यें वेदांत प्रमुख असून सगुण कृष्णभक्ति विशेष होती. या संबंधानें निवृत्तिनाथाचा एक अभंग आहे. **आदिनाथ ऊमाबीज प्रकटीलें ॥ मच्छींद्रा लाधलें सहज स्थीती ॥ १ ॥ तेची प्रेममुद्रा गोरक्षी दीधली ॥ पूर्ण कृपा केली गयनीनाथा ॥ ध्रु० ॥ वैराग्ये तापला सप्रेमे निवाला ॥ ठेवा जो लाधला शांतिसुख ॥ २ ॥ निर्द्वंद्व निःशंक विचरतां मही ॥ सुखानंद हृदयीं स्थिर झाला ॥ ३ ॥ विरक्तीचें पात्र अन्वयाचें सुख ॥ देऊनी सम्यक अनन्यता ॥ ४ ॥ निवृत्तीगयनी कृपा केली असे पूर्ण ॥ कुळ हें पावन कृष्णनामें ॥ ५ ॥** निवृत्ति गुरु व ज्ञानदेव शिष्य या अवस्थेमध्यें जे उद्गार ज्ञानोबांनीं काढिले आहेत त्यांपैकीं कांहीं खालीं लिहिल्याप्रमाणें. **तो जाणावा ज्ञप्तिरूप ॥ निवृत्तीनाथाचें स्वरूप ॥ ५ ॥८॥ श्रीगुरुप्रसादें ज्ञानबोधू झालावो ॥ नव्हतें ठाऊकें पडिलें मायेवो ॥ १७ ॥ २ ॥ निवृत्तीनें बीज सांगितलें ॥ ४७ ॥ २ ॥ निवृत्तीनें दाविला परेशु ॥४९॥३॥ श्रीगुरू निवृत्तीनें दाविलें सुख ॥ ३॥५०॥ येणें निवृत्तीराये खुणा दावोनिया ॥ सकळगुणी गुणातीत तुटली आधीरया ॥ ३ ॥५१॥ निवृत्तीराये खुण अंजन ॥ दावुनी निधान प्रकट केलें ॥ ३ ॥ ६१ ॥ निवृत्तीराये खुणा दांवुनी सकळ ॥ निजे चैत्तन्य पाहे निखळ रया ॥ ३ ॥ ८७ ॥ निवृत्तीरायें वेगीं दाखविला ॥ आदि अंतीं तोचि सबराभरितु ॥ रूपनामरहितु नीच नवा ॥ ३ ॥१००॥**

अवघड तें घडलें माझ्या अंगीं ॥ ती हीऋण चौधी मज देवविले ॥ ज्यासी दिधलें त्यासी नांव परी नाहीं ॥ १ ॥ जया रूपनाहीं त्यासी ऋण देवविलें ॥ निवृत्तिगुरूनें अधिक केलें ॥ निमिषमात्रें दाविलें धन माझें ॥ २ ॥ १३३ ॥ निवृत्तीप्रसादें म्या ब्रह्मची जेविलें ॥ २ ॥ १८१ ॥ ज्ञान देवज्ञानगंगे निवृत्तीनें बुडविलें ॥ ६२८ ॥७॥ तुज सुगुण ह्मणों कीं निर्गुणरे ॥ सगुण निर्गुण एकू गोविंदुरे ॥ १ ॥ अनुमानेना अनुमानेना ॥ श्रुती नेति नेति ह्मणती गोविंदुरे ॥ धृ० ॥ तुज स्थूल ह्मणूं कीं सूक्ष्मरे ॥ स्थूळ सूक्ष्म एकु गोविंदुरे ॥ २ ॥ तुज आकार ह्मणूं कीं निराकाररे ॥ आकारू निराकारू एकू गोविंदुरे ॥ ३ ॥ तुज दृश्य ह्मणूं कीं अदृश्यरे ॥ दृश्य अदृश्य एकू गोविंदुरे ॥४॥ निवृत्तीप्रसादें ज्ञानदेव बोले ॥ बाप रखुमादेवी वरू विठ्ठलरे ॥

ज्ञानोबाची स्वतंत्र स्थिति हा यांच्या चरित्रांतला चवथा विभाग. निवृत्ति ज्ञानोबाचे गुरू. अर्थात ज्ञानोबापेक्षां गुरूचें महत्व मोठें असावें व गुरूच्या आयुष्यमर्यादेंत तरी गुरूचा गौरव असावा. असें नसतां पैठणापासून निवृत्तीचें नांव विशेष ऐकूं न येतां ठिकठिकाणीं जें महत्व मिळालें आहे तें सर्व ज्ञानोबालाच. याला कारण एवढेंच दिसतें कीं, ज्ञानोबाची ज्ञानसंपत्ति इतकी वाढली, कीं जेणेंकरून गुरू कांहींसा लोपाप्रत पावला. तथापि या लेखनाचा अर्थ असा न समजावा कीं, ज्ञानोबाची निवृत्तीविषयींची पूज्यबुद्धी कमती झाली; अथवा, लोकांमध्यें त्यांची विटंबना होऊं लागली. जो सांप्रदायिक नाथवेदांत याच्यापुढें ज्ञानोबाची गति झाली, व सर्वत्र ऐक्य आहे असा त्यास अनुभव आला. या अश्या संधींत ज्ञानोबाचा व चांगदेवाचा आणि नामदेवाचा समागम झाला. त्यांत योग, हा अनुभवापुढें कांहीं नव्हे, हें चांगदेवपांसष्टीवरून समजून घ्यावें; व नामभक्ति ही ज्ञानापेक्षां व अनुभवापेक्षां किती कमी आहे हें तीर्थाटणांत नामदेवास समजविलें. हा प्रकार गाथ्यांतील कांहीं वेंचे देतों त्यावरून लक्षांत येईल.

ज्ञानदेव ह्मणे अवघेंची मृगजळ ॥ सांडोनी पाल्हाळ नित्य ध्याई ॥२॥७६॥ कर्मा कर्मपारुषलें ॥ देवधर्म लोपले ॥ गुरुशिष्य निमाले ॥ जाले क्षीरसिंधू ॥ तेथें गोडीवीण चाखणें ॥ जिव्हेवीण बोलणें ॥ नेत्रेंवीण पाहणें तेंचि ब्रह्म ॥ ४ ॥ ८३ ॥ मेरूपरतें एक व्योम आहे ॥ तेथें एकू पाहे तेजःपुंजू ॥ १ ॥ तेज नव्हे तेजःपुंजु नव्हे ॥ शीतळ नव्हे शांतही नव्हे ॥ धृ० ॥ बापरखुमादेवीवरू विठ्ठलही नव्हे ॥ नव्हे तो होये चतुर्देहेवीण ॥ आठवितां नुपरे मोवितां न मोववे ॥ सांगतां न संगवे गुण त्याचे ॥ १ ॥२९३॥ ध्येय ध्याता हे दोन्ही नाहीं ॥ जेथें ज्ञेय ज्ञानाउरे कांई ॥१॥ अरे मना परापर परतें पाहीं ॥ तें तूं स्वयें आपण पाहेरे मना ॥ २ ॥ ४५८ ॥ निर्जीवा दगडा काय करशील सेवा ॥ तो तुज निर्देवा देईल काय ॥ १ ॥ कवणे गुणें भुली पडली गंव्हारा ॥ तिर्थाच्या माहेरा नोळखीशी ॥ २ ॥ ४६६ ॥

साध्यसाधनसाधकरहित जें कांहीं एक, जें प्रमाणाला, मापतां येत नाहीं, जेथें मनाचा संचार नाहीं, जें कोणत्याही ज्ञानेंद्रियास गोचर नाहीं, जें कोणच्याही कर्मेंद्रियाकडून प्राप्त होत नाहीं, जें शब्दाला वाचक नव्हे, परंतु जें सर्व हें वर सांगितलेलें आहे, असें सिद्ध न करतां सिद्ध व सिद्ध असतां असिद्ध, जें अनादि सिद्ध, ज्याचा अनुवाद करणें ह्मणजे मौन, असा या अनिर्वचनीय वस्तु-

विषेशाचा जो अनुवाद यास सिद्धानुवाद असें नांव ठेवून, जें सर्वदा, सर्वांस सर्वकाळ, नित्य उपलब्ध, याचेंच नांव अमृतानुभव, त्याचा जो शब्दानें स्पष्ट भाव करणें हा, हा ग्रंथ अमृतानुभव. असे या आमृतानुभवशब्दाचे दोन अर्थ होतात. हा ग्रंथ ह्मणजे अति मोठा केलेला ज्ञानोबांनीं चमत्कार. रेड्याकडून वेद बोलवणें, मृतपितर साक्षात श्राद्धास बसविणें, प्रेतास सजीव करणें, योगबलानें पाटीस मांडे भाजण्याजोगी उष्णता आणणें, जड भिंतीस चालविणें आणि चौदाशें वर्षांच्या योग्याचा पराभव करणें, यापेक्षां सर्व जगतास एकदम अमृतत्व देणें हा केवढा मोठा चमत्कार. जसा सूर्या पुढें काजवा कांही नव्हे, तसे जे क्षुद्र चमत्कार ह्मणजे जे केवळ अर्थवाद आहेत, यांपेक्षां जें सर्व दृङ्मात्र आहे, यास अमृतत्व सिद्ध करणें हा चमत्कार केवढा मोठा बरें? या अमृतानुभव ग्रंथाचे १० विभाग केले आहेत. प्रत्येक विभागास प्रकरण अशी संज्ञा दिली आहे. प्रथम प्रकरणाचें नांव शिवशक्तिसमावेश. यांत प्रारंभीं शिष्टाचाराला अनुसरून ज्ञानोबा देवोदेवी हीं जगाचीं जीं उत्पादक द्वैताला अनुसरून आहेत यांस नमन करतात, व या नमनांतच सर्व ग्रंथाचा मुद्दा व सिद्धांचा अनुवाद व अमृताचा अनुभव हा एका पदानेंच दर्शवितात. **"एसी इये निरुपाधिके,"** एवढ्यांतच ग्रंथाचा आरंभ व समाप्ती झाली. देवास देवी उपाधि नव्हे. देवीस देव उपाधि नव्हे. जग ही अशा निरुपाधिक देवो देवीची उपाधि नव्हे. मी जगतांस उपाधि नाहीं. मग वंद्य कोण? वंदनकर्ता कोण? आणि वंदन कशाचें? जें आहे तें सर्व तोच, ह्मणजे **"सर्व खल्विदं ब्रह्म."** असा हा अमृताचा सिद्धानुवाद करण्यांत वेद, शास्त्र, श्रुति, स्मृति, पुराण, इतिहास, यांच्या सर्व व्यापारास एकदम हरकत आली. तेव्हां या सर्वांच्या ह्मणण्याचें रहस्य काय आहे, व या सर्वांचें सिद्धांत केवळ वल्गना आहेत काय? जर वल्गना आहेत तर ह्या दाखविल्या पाहिजेत. ह्मणोन या ग्रंथाची पुढें प्रवृत्ती. जगत हा सृष्ट पदार्थ नव्हे. जगत व जगदात्मा हा निराळा करतां येत नाहीं. तरमग वेद, असें ह्मणतो कीं सद् ह्मणोन एक अद्वितीय पूर्वीं होतें. त्यास इच्छा उत्पन्न झाली कीं आपण अनेक व्हावें. ह्या इच्छेच्या योगानें एकाचें एकत्व मोडून द्वैत उत्पन्न झालें. असें असतां, आपण हें सर्व तोच आहे असें कसें ह्मणता? असें पक्षकाराचें ह्मणणें पडलें. ज्ञानोबा उत्तर देतात, कीं एक ह्मणणें हेंच त्या एकास लागू नाहीं. एकासच जर गुण विशिष्टें करून एकत्व असतें, तर एक असें ह्मणतां आलें असतें. यावरून द्वैत उत्पन्न होत नाहीं. असें जर आहे, तर पक्षकार विचारतात, कीं आपणास वस्तु विशेषाचा पूर्ण निश्चय करतां येतो आहे. तर ती कशी हें सांगाबरें? ज्ञानोबा उत्तर देतात, कीं आकारानें त्याचा रूपनिर्देश करतां येणारच नाहीं. असो. पक्षकार ह्मणतात कीं, हें जें आह्मीं द्वैत ह्मणतों आहोंत हें ऐक्यांतच आहे. जग निर्माण झालें तरी हा ऐक्य भाव तुटत नाहीं. परंतु तो ऐक्यभाव द्वैताचा आहे. तें ऐक्य कसें, तर त्या द्वैतांत जीं दोघें त्यांचें अस्तित्व एकच, त्यांच्या ज्ञानाला साधन एकच, यांची नांदणूक ऐक्याचीच. असें तिसऱ्या ओवीपासून ते आठ ओवीपर्यंत द्वैतवाद्यांचा पूर्वपक्ष ज्ञानोबांनीं प्रतिपादन केला. या द्वैतपक्षाला ज्ञानोबा ९ व्या ओवींत भेदु असें नांव देतात. या द्वैतवादामध्यें मायावाद व प्रकृतिपुरुषवाद ह्मणजे बादरायण, कपिल, आणि पतंजलि यांच्या मताचा पूर्व पक्ष केला आहे. हे द्वैतवादी प्रथमतः द्वैत उभें करून अवसानीं ऐक्य सिद्ध करतात. तें द्वैत कसें, तर माया किंवा प्रकृत्यादि याशिवाय मुक्त स्वभाव ह्मणजे गोसावी जो परमा-

त्मा याला कोणते ही तऱ्हेचें महत्त्व नाहीं. या उपाधींच्या योगानें द्रष्टा दृश्य अशी मांडणी करतां येते. नाहीं तर येत नाहीं. ज्ञानोबा ह्मणतात, या द्वैतवाद्यांचा आह्मास फार उपयोग झाला. कां कीं आह्मी यांचें खंडण केलें ह्मणजे यांनीं ज्यांचें खंडण केलें आहे ते सहजच खंडित होतात. कणादादि जे परमाणुवादी किंवा पौराणिक जो प्रकृतिपुरुषवाद हा यांच्या खंडणांत सहजच खंडित होतो. आतां अंतीं हे ऐक्यस्थापन कसें करतात, तर माया ही लटकी ठरली, किंवा प्रकृत्यादि, साधनें, असीं ठरली, ह्मणजे विवेक उत्पन्न होतो. मग कैवल्यस्वरूप येतें. आतां, दोहोंचा ऐक्यभाव कसा आहे याविषयीं पक्षकाराचे दृष्टांत १७ पासून ते २० ओवीपर्यंत देतात. ज्ञानोबा ह्मणतात, कीं आपण पुष्कळ वाद केला खरा, द्वैत उभें केलें खरें, परंतु ह्या द्वैतामध्यें जीं दोन आपण उभीं केलीं तीं मुळींच दोन नाहींत, व जें आपण प्रमाणशास्त्र त्याला लाविलें तें प्रमाणच नाहीं. यास गूळ, कापूर, दिवा व सूर्य यांचीं उदाहरणें देऊन ज्ञानोबा द्वैतखंडण करतात. या द्वैतवाद्यांनीं आणखी एक उपकार केला आहे, तो हा कीं शून्यवादखंडण केला आहे. आतां पुढील ४० ओव्या पर्यंत प्रकृतिपुरुषवाद आपल्या कसा उपयोगी पडतो तें दर्शवितात. वारा आणि त्याची गती, कस्तुरी आणि तिचा परिमळ, हीं जशीं दोन नाहींत, याप्रमाणें शिव ह्मणजे वस्तु, व दृङ्मात्र, वस्तुजात, हीं दोन नव्हेत. दृङ्मात्र ह्मटलें ह्मणजे वस्तु आणि वस्तु ह्मटलें ह्मणजे दृङ्मात्र. ज्याचे वाचक ॐकार ही नव्हे. या तऱ्हेचीं हीं दोन, ज्यास शिवशक्ति, देवोदेवी, अथवा पाहिजे तें ह्मणा, हवें तें नांव द्या, हवें तें रूप कल्पा, ह्या सर्वांचा अर्थ एकच. तर असें जें सर्वत्र एक आहे, ह्यांत नमकभाव कोठून उत्पन्न होणार? आणि मीं नमन करणारा ज्ञानदेव हा त्याशिवाय दुसरा कोठून? याप्रमाणें ६९ ओवीपर्यंत ऐक्य कसें आहे तें दृष्टांतांनीं सांगून, हा नमनप्रकार कसा, तर ऐक्याच्या. शेवटीं, असें स्थापन करतात, कीं जग हा सृष्ट पदार्थ नव्हे. याचा निर्माण कर्ता अन्य नाहीं. जें सर्व कांहीं आहे तें तोच आहे. ह्मणोन या प्रकरणाचें नांव शिवशक्तिसमावेश.

यानंतर दुसरें जें प्रकरण, त्याचें नांव गुरुस्तवन. पहिल्या ओवींत गुरूचें स्वरूप वर्णन करितात. करुणेनें दयार्द्र होऊन अनेक जन्मांतरांचे येरझार भोगणारे असे जे अविद्येच्या अरण्यामध्यें सुटण्याकरितां धांवा करणारे जीव, यांचा जो पाठराखा, जो अमूर्त परमात्मा याचा मूर्तिमान अवतार, वेदविद्यासंपन्न, व अनंत जन्मांतरांत मुक्ति होण्याकरतां अनंत उपाय केलेल्या जीवरूपी झाडास वसंतच. ही गुरूची व्याख्या अगदीं वेदांतसाराच्या व्याख्येप्रमाणें आहे. **अयं अधिकारी जन्ममरणादिसंसारानलसंतप्तः * * उपहारपाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठं गुरुमुपसृत्य * * सगुरुः परमकृपयाध्यारोपापवादन्यायेनैनमुपदिशति * *। यथा वृक्षाणाम् समष्टयभिप्रायेण वनमित्येकत्वव्यपदेशः * * तथा नानात्वेन * * जीवगताज्ञानानाम्** । माझे गुरू श्रीनिवृत्ति यांचें मी वंदन करतों. यांनीं अध्यारोपापवादांच्या योगानें मला मुक्ति दिली. आतां या पुढें अनेक गुरुशिष्यसांप्रदायाचे चार ओवीपासून ते १८ ओवीपर्यंत ज्ञानोबा वर्णन करतात. गुरूला आपल्या शिष्यास सज्ञान करण्याला मार्ग, बोध करणें हाच आहे, असें प्रवृत्ति व निवृत्ति मार्गाचे सांप्रदाय सांगतात. बोध करणें याला साधन वाचा. गुरु व शिष्य भेद नसतां हा प्रकार कसा घडून येतो? जर सर्वत्र ऐक्य आहे तर गुरु व शिष्य या परंपरेला सवडच नाहीं. २१ व्या ओवीमध्यें या गुरुशिष्य सांप्रदयाचें खंडण

केलें. अहो, जो प्रकाशगहन, जो सर्वत्र प्रकाशमानच आहे, तेथें बोध कोणाला कोणीं करावा, अनेक शब्दजाल उत्पन्न करून त्याचा बोध अथवा गुणानुवाद करणारीं शास्त्रें आहेत. कित्येक शास्त्रांत प्रमाणांनीं तो साध्य झाला आहे. परंतु तथ्यांश पहातां, **"दुजयाच्या रागी रुसे ॥ एकपणाजो ॥** प्रमाणानें मापूं जाल तर शून्यवाद उत्पन्न होतो. योग साध्य ह्मणून पहावयास जावें, तर दर्शन आणि द्रष्टा असें द्वैतच नाहीं. नमन करावयाला जावें, तर ह्याला नांवच नाहीं. आत्म्यास आत्मप्रवृत्ति नाहीं. मग निवृत्ति ह्मणावें कोणाला? अशी ही अनिर्वचनीय गुरूची स्थिति. तरी व्यवहारामध्यें लटके रूढींत येत आहे. जड हें चैतन्याप्रत प्राप्त होत आहे. ज्ञानोबा ह्मणतात, अहो तुह्मीं असे अनिर्वचनीय कोणा ही सिद्धांत सांपडत नाहीं. स्वामि आणि भृत्यभाव हा तुह्मांमध्यें उभा करतां येत नाहीं. सामान्य रूपानें तर आपण अगाधच. मग आत्मा या विशेष रूपानें देखील आपला थांग लागत नाहीं. पुढें ४३ ओवीपासून ५० पर्यंत परमात्म्याला ऐक्यभावानें कसें ओळखतां येतें, हें दाखवितात, व या सर्वांचें पर्यवसान ६१ ओवींत स्पष्ट करितात. **ह्मणूनी शिष्य आणि गुरुनाथु ॥ या दाहों शब्दांचा अर्थु ॥ श्रीगुरूची होतु ॥ परी दोही ठायीं ॥** याच गोष्टीचा अनुवाद ७७ ओवी पर्यंत करून बोधानें बोध होण्याजोगता हा नव्हे. हा सिद्ध आहे. याला साधनें कोठेंच नाहींत. ह्मणून गोसावी हें पद या अर्थांत योजतात. आतां गुरूची जर अशी व्यवस्था, तर ज्या वाचेनें बोध होतो तर त्यांची व्यवस्था ह्मणजे शब्दब्रह्माची व्यवस्था ही याच तऱ्हेची, असें ह्मणून गुरुस्तवन प्रकरण संपतें.

गुरु शिष्यास बोध करतो याला साधन वाचा. या बोधें करून आत्म्याची अज्ञानरूपी निद्रा जाते व तो जागृत अवस्थेंत येतो. ज्ञानोबा ह्मणतात, ही जागृत आवस्था नव्हे. परा पश्यंती मध्यमा वैखरी, यांच्या योगानें अज्ञानाचा नाश होतो. मग या वाचा तरी कशाला रहातात. जी अज्ञानाची वाट ती यांची वाट. देहाचे, मनाचे, सूर्याचे, दृष्टांत देऊन, हेंच स्पष्ट करून दाखवितात. व ७ ओवीपर्यंत हाच विषय प्रतिपादन करितात. आतां अविद्येचें स्वरूप विलक्षण आहे. **॥ जिती अविद्या ऐसी ॥ अन्यथा बोधातें गिवसी ॥ तेची यथा बोधेसी ॥ निमाली उठी ॥** अविद्याकाळीं बंध असतो. अविद्या सरली कीं मोक्ष उत्पन्न होतो. ह्मणजे जीवाला स्वातंत्र्य नाहींच. अविद्या असली कीं अज्ञानांत असावें. गेली कीं मोक्षांत पडावें. हा विलक्षण प्रकार अज्ञान्यासारख्यालाच शोभतो. बागुलबुवाचे, घटाचें, याला दृष्टांत देतात. आतां मोक्ष जो आहे, तरी हा बंधच. अशाच तऱ्हेचे अनुवाद शिवसूत्रामध्यें व भगवद्गीतेंत सांपडतात. ज्ञानावस्था इचा पाश, ह्मणजे बंधन, सत्वगुण. सत्वगुणापासून ज्ञान. हा सिद्धांत श्रीकृष्णांनीं किंवा शिवांनीं केला, हा मोठ्यांचा सिद्धांत, ह्मणून आह्मीं त्याला मान देतों असें नव्हे. सगुणाची हीच स्थिति. पण ज्या ठिकाणीं गुणच नाहींत, तेथें हें ज्ञानाज्ञान कोठून? आतां हें मोक्ष देणारें ज्ञान जो बंध ह्मणून आह्मीं वर दाखविला, त्याच्या योगानें जर आत्मज्ञान होत आहे, तर सूर्याला दैदीप्यमान्य होण्यास प्रातःकाळाची प्रार्थना केली पाहिजे. अहो! दिव्याला कोणीं दिव्यांनीं पाहिलें आहे काय? दृङ्मात्र वस्तुजात, अखंड प्रकाशरूप आहे. त्याला ओळखण्यास नानाशास्त्रें हीं देशांतरें हिंडोन प्राप्त होईल काय? वस्तुमात्र तो स्वतःच आहे. मग कल्पित एक ज्ञान उत्पन्न करून त्या ज्ञानानें त्याला ओळखावयाचें हा

केवढा सायास. मग त्या ज्ञानाचा लय होतो. असलें हें लय पावणारें ज्ञान काय कामाचें? या कारणास्तव, ह्या ज्या चारी वाचा बोध करण्यास समर्थ आहेत असें ह्मटलें आहे हा वेदांतशास्त्राचा चार देहांचा शृंगार आहे. आतां कितीही बोध जरी झाला तथापि त्या बोधांत अज्ञानाचा लेश असतोच. याला कापूर, विभूति इत्यादिकांचीं उदाहरणें देऊन वाचेनें ह्मणजे शब्दानें बोधाचें ऋण फिटत नाहीं. व वाचांचा ज्ञान व अज्ञानाशीं निकट संबंध आहे असें ह्मणून तिसरें प्रकरण संपतें.

बोध झाल्यानंतर आत्मज्ञान झालें. हें ज्ञान अखंडज्ञानाप्रमाणें व्यवहारांत येतें. याचें महत्त्व फार वाटूं लागतें. परंतु जशी निद्रा जाऊन जागृती उत्पन्न होते. ती जागृती जशी अखंड नव्हे. ह्मणजे पुन्हा केव्हां तरी निद्रा येणारच. याप्रमाणें अज्ञानाला नाशून जें ज्ञान उत्पन्न होतें तें अखंड नव्हे. याकरितां, अशा ज्ञानाच्या योगानें **तत्वमसि** असें परमात्म्याचें व जीवाचें ऐक्य करणारें ज्ञान याचा प्रकार सुरीच्या धारेनें सुरीची धार कापते या ह्मणण्याप्रमाणें झाला. अज्ञान नाहींसें झालें ह्मणजे ज्ञानही नाहींसें झालें पाहिजे. याप्रमाणें या विषयाचा परिस्फोट १४ व्या ओवीपर्यंत करितात. दुसऱ्या कांहीं दर्शकांनीं दाखऊन उत्कर्षास यावें अशी अखंड ज्ञानाची स्थितिच नव्हे. आपल्याच डोकीला धरून आपणास ओळकंबतां येईल काय? याच तऱ्हेचीं दृष्टी, स्वाद, आकाश, नाद, सूर्य, परिमळ, फळ, इत्यादिकांचीं उदाहरणें देऊन ज्ञानाचाच ज्ञानांत व्यवहार होत नाहीं, असें दाखवितात. मग ज्ञानानेंच ज्ञानास ओळखतां येत नाहीं. तर अज्ञानाला ठिकाण कोठें? याला स्पष्ट करण्यास तेजाचें उदाहरण घेतात. तेजाला तेजत्व हें अंधारामुळें. अंधारच जर नाहीं, तर तेजाला तेजत्व कशाचें? जर ज्ञानास ज्ञानत्वच नाहीं तर शून्यवादाला मोठा ठिकाण झाला. होईना कां. ज्ञानोबा ह्मणतात, तरी शून्य ओळखायाला राहिलें कोण? मालविला दिवा, निद्रेमध्यें कोणाला मारलें, अशा तऱ्हेचीं उदाहरणें घेऊन या शून्यवादावर कोटिक्रम करितात. अखंड ज्ञान अशा तऱ्हेचें आहे कीं ज्यांत ज्ञानही नाहीं आणि अज्ञान ही नाहीं. अखंड वस्तु जी आहे तिला सद्भाव ही नाहीं आणि अभाव ही नाहीं. हें दृढीकरण करण्यास ४३ ओवीपर्यंत दृष्टांत देऊन हें प्रकरण संपवितात.

परमात्मस्वरूप सच्चिदानंद आहे. हा शास्त्रीय व मुख्यत्वें करून वेदांतशास्त्राचा निश्चय. हीं पदें कशीं उत्पन्न झालीं? एक परमात्मा त्रिप्रकारात्मक आहे, किंवा निरनिराळा तीन प्रकारचा आहे. शास्त्र ह्मणतें **"तीहीं तीहीं उणी लेख,"** हीं तीन निराळीं नाहींत असें जाणा. तीन निराळीं घेतलीं असतां अर्थनिष्पत्ती होत नाहीं. याला सोनें, दूध, व कापूर यांचीं उदाहरणें देतात. पांढरेपणा हा कापूर नव्हे. परिमळ हा कापूर नव्हे. मार्दव हाही कापूर नव्हे. एक संगतीनेंच तीन ही घेतलीं तरच कापूर होतो. याप्रकारानें सच्चिदादि पदांनीं परमार्थबोध होतो. अशीं ही सच्चिदानंद पदाची शास्त्रमांडणी ज्ञानोबा ७ ओवीपर्यंत सांगतात. साधारण प्रचारांत सच्चिदानंद भेदानें परमात्म्याची रूढी होत आहे. व ज्या वेळेस व्याख्या करण्याचा प्रकार सुरू होतो त्या वेळेस सत्तेपासून प्रकाश, प्रकाशापासून आनंद हा निवडतां येत नाहीं, व अंतीं आनंदावरच अवसान ठेवावें लागतें. असा घोटाळा शास्त्राच्या शास्त्रांतच उत्पन्न होत आहे. पृथक् पृथक् जेव्हां शब्दानें वर्णन करायाला बसलें, तेंव्हा अशी घटना झाली; परंतु एकच जर पहावयास गेलें, तर तेथें ऐक्य हें नाहींसें होतें. **थेंबी पडतां उदक ॥ थेंबा धरूं ये लेख ॥ परी पडल्या ठाईं उदक ॥ वांचूनी आहे ॥** तर

वेदांनीं जें परमात्मस्वरूप सच्चिदानंद या पदांनीं वर्णन केलेलें आहे हें कशावरून? तर केवळ अन्योन्यावृत्तीवरून केलेलें आहे. वेद, ह्याचें हें नांव आहे असें ह्मणत नाहीं. जसें एखाद्या पदार्थावर सूर्याचें तेज पडलें आहे तेवढ्याच तेजावरून जशी सूर्याचा महिमा लक्षांत यावयाचा नाहीं, त्याप्रमाणें वाचेला ह्मणजे वेदाला ज्याच्यामुळें वाचकत्व, तो वेद, त्याच्याविषयीं व्याख्या कशी करील बरें? जो मुळीं कधीं कोणाचा विषय नव्हे, जो प्रमेय या कोटींत पडतच नाहीं, मग प्रमाण कोठून? प्रमेयाचा परिच्छेद करणें हा प्रमाणशास्त्राचा मुद्दा. परंतु जें स्वतःसिद्ध, ज्याचें ज्ञान, व्हावें ह्मणून इच्छावें तर ज्ञाता, ज्ञान, ज्ञेय, ही त्रिपुटीरहित ह्मणा अथवा एकांतच ज्याची स्थिति, ह्या ठिकाणीं सच्चिदादि पदें जर लागूं पडत आहेत आणि जर हीं सर्वमान्य आहेत, तर हीं आलीं कोठून? ज्ञानोबा ह्मणतात **हे बोल वस्तुवाचक ॥ नव्हती. हें शेष विचाराचें ॥** त्या विचारांत काय दर्शन आहे हो? तर स्वसंवाद झाला ह्मणजे स्वानुभव झाला, ह्मणजे हीं नाहींशीं होतात. याला मेघ, फळ, आहुती देणारा हात, आरसा व निद्रेंतून जागा करणारा यांचीं उदाहरणें देतात. **तैसे सच्चिदानंद चोखटा ॥ पदें लागती वाटा मौनाच्या ॥** आतां या सच्चिदानंदस्वरूपासंबधी वेदांतशास्त्रांत एक मोठी भानगड आहे. ती २८ ओवीपासून ३९ ओवीपर्यंत सांगतात. व तेंच डंका याचें एक उदाहरण देऊन हा घोटाळा दाखवितात. अहो! जो कोणच्याही सिद्धांतांनीं अजूनपर्यंत ओळखला गेला नाहीं, व ज्यांचें सिद्धांत "निद्‌सुरीया," ह्मणजे झोपेंतलें चावळणें याप्रमाणें, तर पाकनिष्पत्ति नसतां जसें जेवलों ह्मणून ह्मणावें याप्रमाणें आहे. दोनप्रहरचा सूर्य पाहण्याकरतां दिवा लावावा, न जन्मलेल्या स्वरूपवतीचें लावण्य वर्णन करावें, अशातऱ्हेचा हा सिद्ध वस्तूविषयीं शास्त्रानुवाद आहे. याला कामाचें, नादाचें, अग्नीचें, दर्पणाचें व पिकाचें उदाहरण देऊन, आपलें बोलणें ज्ञानोबा स्पष्ट करतात. विशेष किंवा सामान्य अशा प्रकारानें सिद्धानुवाद होत नाहीं. येथें अनुवाद करणें ह्मणजे गप राहणें हेंच आहे. तेथें सच्चिदानंद लक्षणानें जर उपपत्ति शास्त्रें करतात, तर ती कशी असावी? उपाय करायला जावा तर उपाय होत नाहीं. प्रतितीला सोयच नाहीं. विचार करायला बसावें तर विचार नाहींसा होतो. मग हें शेष विचाराचें असें जें ह्मटलें आहे याला कशी काय तजवीज करावी? व या विचाराच्या तजविजीनें कसा घोटाळा होतो याला उदाहरण अभ्रकाचें देतात. अभ्रकाचा एक तुकडा घेऊन जर त्याचे सगळे पदर निराळे केले, तर निरनिराळ्या पदरांवरून अभ्रकाची स्थिति लक्षांत येत नाहीं, व पुन्हा पूर्वींचा अभ्रक जर पाहावयास जावें तर पदर केलेले आहेत. ह्मणोन हे जें पदत्रयानें याचें जें वर्णन तें होत नाहीं. तर हीं पदें ह्मणजे शब्द याचा उपयोग काय? तर उपयोग येवढाच, असें शास्त्र ह्मणतें कीं, जर कदाचित विचार करतांना अडचण पडूं लागली, तर या पदांनीं त्याची आठवण होते. परंतु ज्ञानोबा ह्मणतात, कीं स्मरणदानाविषयीं जरी व्यवहारांत शब्दांचा उपयोग होतो आहे, तथापि परमात्म्याविषयीं हीं अप्रयोजक आहेत. असें पुढील प्रकरणाचें अवतरण देऊन हें पांचवें प्रकरण संपवितात.

शब्द स्मरण करून देण्याच्या उपयोगीं आहे, असें जरी ह्मटलें, तरी वस्तु स्पष्ट करून दाखविणें, या विषयीं याचा उपयोग नाहीं. दिसणारा पदार्थ आहे, तो आरशांत दिसेल; न दिसणारानें आरशांत कसें दिसावें बरें? सूर्य जसा आकाशाचा प्रकाशक, त्याप्रमाणें या शब्दाच्या यो-

गानें आकाशाला अंबरत्व असें नांव मिळालें आहे. स्वतः शब्दाची स्थिति पाहिली असतां हा खपुष्प आहे; असें असून हा जग निर्माण करितो. विधिनिषेधांचे मार्ग दाखवितो. बंध, मोक्ष याच्यामुळेंच. अविद्या यानेंच उभारिली. वस्तूला नाहींशी यानेंच केली. शिव आणि जीव या वेदांतशास्त्रांतल्या खटपटी याच्याच. विरुद्ध मार्ग याच्याच योगानें रूढींत येतात. या शब्दाचे गुण काय काय वर्णन करावे! शेवटीं हा ह्मणे विसरल्याची आठवण करून देतो. अहो स्वसंवेद्य वस्तूला आठवावी कोणी व विसरावी कोणी? एकी एक. तेथें दुसरें कोठलें आणावें. जिभेला जीभ चाखते काय? याकरितां जेथें स्मरण आणि विसर हा नाहीं, तेथें शब्दाची प्रवृत्ति कशी होणार? न होईल तर न होवो, पण पक्षकार ह्मणतात, शब्दानें अविद्येचा नाश होतो, ह्मणजे बोध होऊन आत्म्याला आत्मा भेटतो. ज्ञानोबा ह्मणतात,—हें बोलणें वेडगळ आहे. याला दृष्टांत सूर्याचा व निद्रेचा देतात. अविद्या ही नाहीं. आत्म्याला आत्मस्थिती नाहीं. अविद्या आणि वांझेचें मूल हीं दोन्ही एकसारखीं. मग तर्कानें काय करावें? इंद्रधनुष्य, अगस्तीची तृष्णा, गंधर्वनगर जाळणें, दिवसा दिवा लावणें, सावलीचा शोध करणें, ओडंबरीचे दागिने घालून शृंगारणें, अशा तऱ्हेचे दृष्टांत देऊन अविद्येचा अभाव ३८ ओंवीपर्यंत सिद्ध करून दाखवितात. आतां अविद्येला सद्भाव आहे असें जर ह्मणावें, तर ज्ञानोबा ह्मणतात, अनेक सिद्धांत आहेत, त्यांपैकीं कोणाएकानें तरी तीचें स्वरूप वर्णन केलें आहे काय? जो तो ह्मणतो अविद्या मायावी आहे. ती आपलें स्वरूप लपविते. बरें मग आतां शब्दानें लपणाऱ्या वस्तूला कसें मारावें? जें नाहीं त्याला शब्दानें प्रमाणत्व कसें द्यावें? हें अनेक उदाहरणें देऊन ६७ ओंवीपर्यंत सिद्ध करून दाखवितात. आतां ज्या शास्त्रांमध्यें अविद्येविषयीं विचार केला आहे त्या बोलूनचालून वल्गना आहेत. तेव्हां अविद्येचा सद्भाव ह्मणा अथवा अभाव ह्मणा, तीला नाशून शब्द प्रमाणदशेस येईल असें ह्मणतां येत नाहीं. तेव्हां विचाराचा शेष हें जें शब्दाचें लक्षण कलें आहे हें व्यर्थ आहे. आतां आत्म्याला आत्मा, शब्दाच्या योगानें दिसतो हें ह्मणणें आणि माझें लग्न मशींच लागलें हें ह्मणणें, हीं दोन्हीं सारखीं आहेत. तसें जो अखंडवस्तूला अखंडज्ञान असतां दुसऱ्या कोणी ज्ञानानें आणून दाखवावी? ही गोष्ट घडणारच नाहीं. याला नाना दृष्टांत देऊन शंभर ओंवीपर्यंत सिद्ध करून दाखवितात. व ह्मणतात कीं जीं शास्त्रांत ज्ञान आणि अज्ञान वर्णिलीं आहेत हीं केवळ पूर्वी जो शब्द वर्णन केला यामुळें शोभतात. त्या शब्दाचें वैभव काढून घेतलें, ह्मणजे हा जो शब्दप्रलय आहे तो नाहींसा होऊन जिकडे तीकडे निभ्रांत सुदिन होतो, असें ह्मणून हें प्रकरण संपवितात.

अज्ञान या शब्दापासून येरवीं बोध होतच नाहीं. अखंडज्ञान या संबंधानें तर अज्ञान नाहींच. आतां अज्ञान अनादि आहे असा जो शास्त्रांचा सिद्धांत आहे हा सर्व शब्दामुळें. शब्द हा लटका. कुंभारानें केलेला मातीचा घोडा त्यावर बसून एकाद्या युद्धांत जय मिळवून येऊं ह्मटलें, तर साधावयाचें नाहीं. तसेंच गारुड्यानें केलेल्या दागिन्यांचा शृंगार करतां येत नाहीं. त्याप्रमाणें वेदांतशास्त्रानें उत्पन्न केलेलें अज्ञान कोण्याही तऱ्हेनें प्रवृत्ति पावत नाहीं. व्यवहारिक ज्ञानासंबंधानें अन्यव्यावृत्ती अज्ञान आहे, असें ह्मणावें, तर तेथें देखील याला ठिकाण नाहीं. कारण अधिष्ठान जर अखंडज्ञान तर ज्याच्या भासामुळें व्यावहारिक ज्ञान, त्या ठिकाणीं अज्ञान कसें असावें?

असो, अज्ञान हें एक लटकें ठरलें, ह्मणजे ज्ञान देखील त्याच कोटींत पडतें. अज्ञान याची जाती अभाव. हा नैयायिकांचा सातवा पदार्थ. अभावाची जाती अशी आहे, कीं ज्या ठिकाणीं तो असतो, त्या ठिकाणचा बोध व्हावयाचा नाहीं. तथापि, शास्त्र ह्मणतें, कीं अज्ञान हें आत्म्यामध्येंच आहे. व आत्म्याशिवाय तर दुसरा पदार्थ नाहींच नाहीं. बरें आतां याची गती काय होते ती पहा. अज्ञान हा अभाव, हा आत्म्यामध्यें. आत्माच काय तो सर्वत्र झाला कीं नाहीं नाहींसा? जर नाहींसा नाहीं, आणि अज्ञान आहे, असें समजतें, तर द्वैत उभें राहतें, आणि तें शास्त्राच्या विरुद्ध! तेव्हां जो अखंडज्ञानात्मा, त्याला अज्ञान अज्ञान करूं शकत नाहीं. तर अज्ञानवाद करणारे हो, तुह्माला मोठी लाज असावी. अथवा असें ह्मणा, कीं जें आमचें अज्ञान आहे, हें अज्ञानच नव्हे. अहो डोळ्यांवर पडदा आला आहे, आणि डोळ्यानें दिसतें आहे, तर त्याला आंधळा कोण ह्मणेल? अग्नी प्रज्वलीत आहे, आणि त्यांत सर्पण टाकलें तर तें जळेना, मग त्याला अग्नी कोण ह्मणेल? घरांत आंधार पडला आहे, आणि सर्व वस्तु जशा दिसाव्या तशा दिसतात, याला आंधार कोण ह्मणेल? त्याप्रमाणें आत्म्यांत अज्ञान आहे, आणि आत्मा जशाचा तसाच! तेव्हां अज्ञान या शब्दाला खोटेपणा आला कीं नाहीं पहा बरें! बरें हें राहूंद्या. शब्दवाद सोडून न्यायाच्याच सोईनें पाहूं. अज्ञान ह्मणजे अंधार, आत्मा ह्मणजे प्रकाश. दोन्ही एकत्र करा पाहूं. जागेपणा आणि निद्रा, आठव आणि विसर, उष्ण आणि थंडी, दिवस आणि रात्र, जगणें आणि मरणें, हीं द्वंद्वें एके ठिकाणीं नांदतात अशी कांहीं न्यायाच्यामध्यें सवड निघते का? अर्थात निघत नाहीं. तेव्हां आत्म्यामध्यें अज्ञान, अथवा आत्म्याशिवाय निराळें अज्ञान राहूं शकत नाहीं. कल्पना करा कीं, एक मिठाचा मासा केला, आणि त्यांत जीव घातला, आणि तो पाण्यांत टाकला, तर मिठाचा ह्मणून विरघळून जातो, जमिनीवर ठेविला, तर मासा ह्मणून मरून जातो. या उदाहरणावरून **अत्मेनसि विरोधी ॥ ह्मणोनी नुरेचि ये संबंधी ॥ वेगळे तरी सिद्धी ॥ जायेचिना ॥** आप्तवाक्य याची व्यवस्था याप्रमाणें होते! आतां प्रत्यक्ष आणि अनुमान हीं जीं दोन तर्कशास्त्राचीं अन्य साधनें, त्याच्या अनुरोधानें अज्ञानाची गती काय होते पाहूं. प्रत्यक्ष पहावयाला जावें, तर ज्ञानेंद्रियें हीं अज्ञानाचीं, मग अज्ञानानें अज्ञानाला कसें ओळखावें? कार्य कारण या प्रकारानें अनुमान करायला जावें तर कारणापासून कार्य अभिन्न नाहीं, असें कोण ह्मणेल? तेव्हां अनुमानाची एथें गती नाहीं. जें मुळींच नाहीं, तें पहाण्याचें वेड कां तुह्मांला? ज्ञानोबा ह्मणतातः— **तेवीं पहावया अज्ञान ऐसें ॥ हें अंगीं पिसें कायसें ॥ न पहातां अपैसे ॥ न पहाणेंचि कीं ॥** कोण्याहि शास्त्रसिद्धांतानें या अज्ञानाचा निर्धार करतां येत नाहीं. अज्ञानानें आपला शूरपणा सोडला आहे. पक्षकार ह्मणतात, हे चित्रविचित्र प्रकार आपल्या पुढें दिसताहेत, प्रत्येक वेळीं द्रष्टयाला दृश्य भासत आहे. तो द्रष्टा परंपरेनें या चित्रविचित्र दृश्याची खटपट अनुभवित आहे. येवढ्यावरूनच दृश्य आणि द्रष्टा या दोहोंमध्यें दृश्य या पासून अज्ञानाचें अनुमान होतें. एक चंद्र दोन दिसूं लागतात. पाणी जमिनींत घालावें आणि तें झाडास पोचावें. हीं दोन उदाहरणें घेऊन दृश्यास्तव अज्ञान आहे, असा पक्ष उभा होतो. ज्ञानोबा ह्मणतात, दिवा लागला ह्मणजे अंधार होतो काय? किंवा चंद्राच्या चांदण्याला कधीं कोणी काळोख ह्मटलें आहे काय? पाण्यानें कधीं आग लागली आहे काय? पुनवेच्या चंद्रानें

अमावास्या होते काय? दृङ्मात्र वस्तुजात ज्ञानपूर्ण असे अनेक सिद्धांताचे अनुवाद असतां, हा अज्ञानाचा गोंधळ कुठून आणलात? जर हें दृङ्मात्र आत्मा नव्हे, तर मग तो शून्य काय? शून्य ह्मणण्याजोगें कुठें कांहीं नसून ही व्यर्थ खटपट कां करावी? मिथ्यावाद ह्मणजे अज्ञानवाद यांत परमात्म्याविषयीं शास्त्र मौन धरतें. विशेषवाद हे तर हवें तसें बहकतात. उदाहरणास्तवः— वेद सर्व शास्त्रांची योनि, आत्मनिर्धार आहे का त्यांत? नाहीं! सौरादि षड्दर्शनें-आत्मनिर्धाराशिवाय! देहवादी, चार्वाकादि, अहंकाराला मोठें प्राधान्य देतात, होतो आत्मनिर्धार त्यांच्या हातून? बौद्ध, मोठें बुद्धीचें प्राबल्य दाखिवतात, झाला आहे आत्मनिर्धार यांच्या हातून? मीमांसक, नाना मीमांसा करतात, आत्मनिर्धार झाला आहे यांच्या हातून? विज्ञानवादी, ज्ञानेंद्रियांचें मोठे प्राधान्य सांगतात. झाला आहे आत्मनिर्धार? पुराणें व स्मृति इत्यादि अनंत शब्दजाल उत्पन्न करतात. आत्मनिर्धार आहे काय? योगी नाहीं त्या सिद्धी करतात. आत्मनिर्धार कुठें आहे? आत्मप्रत्ययाविषयीं निर्धाराचे मोठे दोन प्रकार दृष्टीस पडतात. एक शब्दानें व दुसरें दर्शनानें. दर्शनसंबंधींही नानाप्रकार आहेत. शब्दब्रह्माविषयीं पूर्वींच सिद्ध केलें आहे कीं, **शब्दाचा संचार नाहीं जेथें ॥** आतां अनेक मतांनीं त्याचें दर्शन होतें असें प्रतिपादिलें आहे. **दर्शन बीजें तेथें ॥ राणीव आणी ॥** ज्ञानोबा ह्मणतात, दर्शनाचा प्रकार ऐका, ज्याच्यामुळें दर्शनास दर्शनत्व, तेथें दर्शनाची काय महिमा? त्या अवर्णनीय ऐक्यांत दर्शनांत दर्शनत्व हा पृथक् भाव कसा होणार? व कोणास कोण भेटणार? **कोणा कोण भेटे ॥ दिठी कैंचि फुटे ॥ ऐक्यासकट पोटें ॥ आटोनि गेली ॥** तें ऐक्य असें पसरलें आहे कीं नित्य नवें अनंत तऱ्हेचें. **दृश्याचिया सृष्टी ॥ दिठीवरी दिठी ॥ उठलीया तळवटी ॥ चिन्मात्रींचि ॥** तथापि अनंत जरी आहे ह्मणून तळवटचें जें एक चिन्मात्र तें, **आनघरीं जाणिजेना ॥** त्याला दुसरे कोणी दाखवून द्रष्टाकरितां येणार नाहीं. या ऐक्यांत द्रष्टा व जे अनंत तऱ्हेचें दृश्य दर्शन हें कोण्या परीचें आहे? याला उदाहरणें, आरसा, वारू, पाणी व कल्लोळ, अग्नी व ज्वाळा, सूर्य व त्याचीं किरणें, चंद्र व चांदणें, कमळ व पांकळ्या, सहस्रार्जुन व त्याचे हात, कोष्ट्याचा माग व त्यांतील दोरे, अनंत शब्द व वाचा, गुळाची ढेप व त्याचे फुटून झालेले तुकडे, अशीं देतात, व ह्मणतात कीं, **हें दृश्य देखो ॥ किं बहु होवोनि फांको ॥ परि भेदाचा नव्हे विखो ॥ तेचि ह्मणोनी ॥ १४९ ॥ तया आत्मयाच्या भाका ॥ न पडेचि दुसरी रेखा ॥ जरी विश्वा अशेखा ॥ भरलें आहे ॥** या दर्शनसंबंधानें जे पक्षकार यापुढें उभे केले आहेत त्यांत आत्मा एक नाहीं, परंतु अनंत आहेत, अशांचा पक्ष प्रथम उभा करितात, व दृश्य व द्रष्टा हीं पृथक असल्याशिवाय शुद्ध बुद्ध मुक्तस्वभाव जो आत्मा, याच्या मुक्तस्वभावामुळें हें जें दृश्य अनंत फांकलें आहे, हें फांकूंच सकणार नाहीं, असा सांख्यवाद उभा करितात. त्याला उदाहरण ज्ञानोबाचेंच घेऊन पक्षकार आपलें मत दर्शवितात. **दुबंधी क्षीरोदकीं ॥ वाने परी अनेकी ॥ दिसती तरी तितुकी ॥ सुतेआथी ॥** यावरून आत्मभिन्नत्व दर्शवितात. व **न फुटतां बीजकणिका ॥ माजी विस्तारे वटुअम्बिका ॥ तरी अद्वैत फांका ॥ उपमा आथी ॥** ह्मणजे चिद्रूप, पुरुष, आणि जड, प्रकृती, यांचा संबंध झाल्याशिवाय हे आपण अनंत होऊनी फांको असें जें ह्मणतात तें घडत नाहीं. पक्षकार ह्मणतात,

जयाप्रियेचेंजेंआंग ॥ जोप्रियूजियेचेंचांग ॥
कालऊनिदोनीभाग ॥ जेवींतेआहार्ती ॥ ४० ॥

प्रियजोपरमात्मा ॥ तेथेंपरमात्मत्वेंजेप्रमा ॥ तेजाणावीप्रियोत्तमा ॥ जाणतजनीं ॥ ४६ ॥ ते
प्रमाजेणेंप्रमावती ॥ तोचितियेचाप्रियपती ॥ जेवींप्रभाप्रकाशवंती ॥ सूर्याचेनि ॥ ४७ ॥ असो
स्वरूपींचीस्वसंवेद्यता ॥ तोजाणावीपतिव्रता ॥ कांजेइचेनिअंगेंस्वरूपता ॥ स्वरूपासीघडे
॥ ४८ ॥ हेपतिव्रताजरीनाहीं ॥ तरीस्वरूपतेंकोणकाई ॥ आणिस्वरूपेंवीणतंवपाहीं ॥ स्वसंवे
द्यताहीकोणा ॥ ४९ ॥ अहोस्वरूपींस्वरूपत्वाचाभाग ॥ तेथेंदुजेपणाचापडलापांग ॥ ह्मणोन
आपणआपलेंअंग ॥ कल्पिलेंदुजें ॥ ४५० ॥ तेंअंगजेणेंजिये ॥ तेंअंगचिहोऊनिराहे ॥ जेवींघटा
धारेंभोये ॥ घटस्तुभूमि ॥ ५१ ॥ असोलहरीचेनिमिसें ॥ लहरिस्थजळजैसें ॥ प्रकृतिपुरुषत्वतै
सें ॥ आकाराआलें ॥ ५२ ॥ त्याउदकेंवीणलहरी ॥ असोंनशकेक्षणभरी ॥ आणिलहरीचनसेत
री ॥ लहरिस्थकैंचें ॥ ५३ ॥ तेवींआपुलीयेक्रीडेलागीं ॥ आपणजालेतन्वंगी ॥ आपणचिदोहींअं
गीं ॥ लागलेंनांदों ॥ ५४ ॥ एकमुख्यएकगौण ॥ हेनावेंकदाखऊन ॥ मगदोन्हीभागकालऊन ॥
भोगितीभोगु ॥ ५५ ॥ एकजडएकअजड ॥ एकशांतएकअखंड ॥ एकनिश्चळएकउदंड ॥ चप
ळतादावी ॥ ५६ ॥ असोएकहोऊनिबाह्यात्कारीं ॥ दुसरेंयोजिलेंअंतरीं ॥ मगदोन्हीकालऊनि
स्वीकारी ॥ आपणाआपण ॥ ५७ ॥ नातरीएकसुखाचेंअधिकारी ॥ एकसुखाचेव्यापारीं ॥ ऐ
सीदाऊनिकुसरी ॥ भोगितीभोगु ॥ ५८ ॥ त्याभोगामाजीजाण ॥ आटलेंभोगभोक्तेपण ॥ तेथें
स्वादुचिआपण ॥ आपणाचाखे ॥ ५९ ॥ जेवींसरितेचेनिमिसें ॥ सागरुचिसागरींसमरसे ॥ तें
सागरुसरिताऐसे ॥ भागचिसरले ॥ ४६० ॥ तेवींप्रकृतिमिसें ॥ स्वरूपस्वरूपाभोगीतसे ॥ से
खींभोगामाजीनसे ॥ दुसराअर्थु ॥ ६१ ॥ तस्मात्प्रकृतिकिंवापुरुषु ॥ एकुचिस्वविलासु ॥ ओ
वीचाविचारविशेषु ॥ पुढिलेहीअर्थीं ॥ ६२ ॥

जैसीकांसमीरेंसगटगती ॥ कासोनयासगटकांती ॥
तैसीशिवेंसीशक्ती ॥ अघवीचिजे ॥ ४१ ॥

वायुवायूचेंचलन ॥ येथेंभेदतेंवृथाभान ॥ येन्हवींचलनमात्रवांचून ॥ वायुतोकायी ॥ ६३ ॥
किंवासोनेचसोनयांचीकांती ॥ येथेंभेदतेंबाह्यवदंती ॥ वांचूनिकांतीमात्रपरती ॥ अर्थता
नाहीं ॥ ६४ ॥ तैसेंसत्तामात्रशिव ॥ हाचिन्मात्राचाभाव ॥ ह्मणोनिशिवरूपाचेंसर्व ॥ चित्
शक्तीचिहे ॥ ६५ ॥ एवंद्वंद्वचिजरीनाहीं ॥ तरीअवघीशक्तिचह्मणतांशंकाकाई । ह्मणोनि
अवघीशक्तीऐसेंकांहीं ॥ बोलिलामुळीं ॥ ६६ ॥ आतांभेदाचाजरीअभावो ॥ तरीशक्तीसकट
अवघाचिशिव ॥ ऐसेंसिद्धाचारावो ॥ बोलतुअसे ॥ ६७ ॥

कांकस्तुरीसकटपरिमळु ॥ काउष्मेंसकटअनळु ॥
तैसाशक्तिकेवळु ॥ शिवुचिजो ॥ ४२ ॥

कस्तूरीचापरिमळ ॥ कस्तूरीमात्रअढळ ॥ किंवाउष्णतेवांचूनिअनळ ॥ आणीककैंचा ॥ ६८ ॥
तैसेंशक्तिआणिशिव ॥ हाबोलाचाचिभाव ॥ परंतुशिवेंवांचोनिसर्व ॥ निःशेषनाहीं ॥ ६९ ॥
अहोशब्दापरतेंपहातां ॥ हाउभाचिबोलरिता ॥ अर्थाचियातत्वतां ॥ दोन्हीकैंचीं ॥ ४७० ॥
स्त्रीनव्हेनापुरुष ॥ निखळचिएकरस ॥ हेंपुढलियेओवीस ॥ दावितसे ॥ ७१ ॥

रातिआणिदिवो ॥ पातलींसूर्याचाठावो ॥
तैसींआपुल्यासाचींवावो ॥ दोघेंहीजियें ॥ ४३ ॥

दिवसआणिशार्वरी ॥ हेतंवरीचकुसरी ॥ जंवसूर्याचीनगरी ॥ देखिलीनाहीं ॥ ७२ ॥ तेवीं तात्विकदृष्टिपहातां ॥ शिवशक्तिहाबोलचिवृथा ॥ स्वरूपीचिअद्वितीयता ॥ भंगलीनाहीं ॥७३॥ अहोयाउभयांचेंअधिष्ठान ॥ तेथेंनिवडेतेंयाचेंसाचपण ॥ ह्मणोनयाचासाचियांचीखूण ॥ हारपोनिजाये ॥ ७४ ॥ जेवींसाखरेचीपुरुषनारी ॥ हेसाखरेमाजींगवसेजरी ॥ तरीयासाचा चीउरी ॥ यासीहोये ॥ ७५ ॥ याचेंसाचह्मणिजेवास्तव ॥ तेंतंवनव्हेद्विस्वभाव ॥ आतांशिव शक्तिहेंआडनांव ॥ एकासीचि ॥ ७६ ॥ तेथेंशक्तिसकटशिव ॥ किंवाशिवेंसीशक्तिभाव ॥ हेबोलअवघेवाव ॥ यांच्यासाचीं ॥ ७७ ॥ हेतंवबोलाहीपुरती ॥ दशाभेदनपावती ॥ वस्तुअ नादिआइती ॥ चिदैकरस ॥ ७८ ॥

किंबहुनातियें ॥ प्रणवाक्षरींविरूढतीयें ॥
दशेचींहीवैरियें ॥ शिवशक्ति ॥ ४४ ॥

किंवानिर्गुणींगुणरूप ॥ निर्गुणऐसासंकल्प ॥ तेंओंकाराचेंस्वरूप ॥ बीजभूत ॥ ७९ ॥ मग अकारादिअक्षरश्रेणी ॥ विरूढलाअंकुरत्रिपर्णी ॥ तोचित्रिगुणत्वेंआकारोनी ॥ वाढलीसृष्टी ॥ ४८० ॥ एवंप्रणवाच्याठायीं ॥ हेजेविकारदशाकांहीं ॥ हेययासीनसाहेपाहीं ॥ चिन्मात्रत्वें ॥ ८१ ॥ स्वरूपींजेउपलब्धता ॥ तेचिहेद्विवचनता ॥ अर्थाचीयाएकात्मता ॥ हेंहीनसे ॥ ८२ ॥ तस्मातहेंजेंशिवशक्तिपण ॥ तेथेंनमानावीजडाजडखूण ॥ चिन्मात्रचीविलासमान ॥ भेदरहित ॥ ८३ ॥ कांजेंदोंशब्दींअर्थएक ॥ हेंचिन्मात्रकौतुक ॥ ईयेंग्रंथींऐसेंदेख ॥ प्रतिपादिलेंअसे ॥८४॥

हेअसोनामरूपाचाभेदसिरा ॥ गिळीतसेएकार्थाचाउजिरा ॥
नमोतयाशिववोहरा ॥ ज्ञानदेवोह्मणे ॥ ४५ ॥

अहोहाबहुवाद ॥ नामद्वयेंभासलाजोभेद ॥ तोसहजचिजालानिर्द्वंद्व ॥ एकाअर्थुयेणें ॥ ८५ ॥ एकअर्थीदोनींअभिधानें ॥ हाभेदगिळीएकार्थेतेणें ॥ जेवींगोडीनेंचिगुळत्वायेणें ॥ नामभेदेंसीं ॥ ८६ ॥ तेवींजेयेथेंपुरुषसत्ता ॥ तेविचारितांकेवळज्ञानता ॥ एवंअन्वयेंनामद्वयता ॥ आभास तअसे ॥ ८७ ॥ कांजेआभासाचेंमूळ ॥ तोचित्स्वभावचिकेवळ ॥ ह्मणोनिनामद्वयांचारोळ ॥ एकार्थत्वेंजाला ॥ ८८ ॥ नातरीकेवळजेआवडी ॥ तिनेंकेलीनामासीसवडी ॥ एकपणेंचये व्हडी ॥ ठसावलीशोभा ॥ ८९ ॥ एवंएकार्थत्वातेंनटळती ॥ स्वसंवेद्यजेंशिवशक्ति ॥ नमोआ तांतयांप्रति ॥ ज्ञानदेवोह्मणे ॥ ४९० ॥ आतांहाजोपरस्परानुभावो ॥ तोचिनमस्कारासीठावो ॥ आणिउभयांसीपडतांखेवो ॥ नमस्कारआटे ॥ ९१ ॥ ह्मणोनिउभयांचेंआलिंगन ॥ तेंचिएकार्ण वाचीखूण ॥ येणेंचिअन्वयेंकरून ॥ बोलतुअसे ॥ ९२ ॥

जयांदोघांच्याआलिंगनीं ॥ विरोनिगेलींदोन्ही ॥
अवघियाचीरजनी ॥ दिठीचजें ॥ ४६ ॥

चिदत्वाचेंअवसान ॥ सदत्वींहोतांजाण ॥ हारपोनिवाचारंभण ॥ आलिंगनजालें ॥ ९३ हेदोन्हीमिळोन ॥ एकार्थशोभतीजाण ॥ एवंअर्थचिजालापरिपूर्ण ॥ अभासेंसी ॥ ९४ ॥ आ

दुसरेनवीन ॥ एकत्वतेंरूपहीन ॥ ह्मणोनविरालींनिपटून ॥ दोघेंहीजेणें ॥ ९५ ॥ जेवींकल्पांतजळाच्याठायीं ॥ पूर्णापूर्णतानाहीं ॥ तेंपूर्णताजेंकांहीं ॥ पूर्णत्वेंचिनसे ॥ ९६ ॥ आतांजेंकांहींभासमान ॥ तयारजनीचीकेलीखूण ॥ तेरजनीगेलीहारपोन ॥ दिठीचिमाजी ॥ ९७ ॥ पहातांद्रष्टृत्वाकडूनि ॥ रजनीतेनव्हेचिरजनी ॥ सगळीहीगेलीविरोनी ॥ दिठीचिमाजीं ॥ ९८ ॥ असोययाचेंआलिंगन ॥ तेथेंआटलीरजनीचीखूण ॥ अवघीरजनीभरोन ॥ द्रष्टृत्वेंभरलें ॥ ९९ ॥ नातरीतात्पर्यार्थुऐसापाहीं ॥ उभयांतेंनिर्धारितांकांहीं ॥ सत्स्वरूपेंवीणनाहीं ॥ उरलेंयेथें ॥ ५०० ॥ तऱ्हीचिदत्वाचीखूण ॥ सत्स्वरूपींचअसेजाण ॥ ह्मणोनहेंबाधितभान ॥ दिसोंचिलागे ॥ १ ॥ ह्मणोनिहेंजेंकांहींआभासे ॥ तेंशोभेलेंचिद्विलासे ॥ नानासत्स्वरूपदुसरीयेदशे ॥ आलेंचिनाहीं ॥ २ ॥ एवंशिवशक्तिसमावेश ॥ असोनिहाअवघाचिद्विलास ॥ येथेंययानिर्धारास ॥ नदिसेवाढी ॥ ३ ॥

जयाच्यारूपनिर्धारीं ॥ गेलीपरेसींवैखरी ॥
सिंधूसीप्रळयनीरीं ॥ गंगाजैसी ॥ ४७ ॥

ऐसायाचाजोनिर्धार ॥ येथेंनिर्धाराहीनव्हेथार ॥ कांजेंपरादिकांचेंबिढार ॥ येथूनउठिलें ॥४॥ याचाभावऐसाकांहीं ॥ स्वरूपींदुसरेंनिपटूननाहीं ॥ तेंस्वसंवेद्यतेच्याप्रवाहीं ॥ वर्णिलींदोघें ॥ ५ ॥ हेहीजेमिरवणी ॥ तेशब्दाचीचजोगावणी ॥ परंतुवस्तुमात्रेंवांचूनी ॥ अर्थतानाहीं ॥ ६ ॥ तेंहीजेंकांहींविलासतां ॥ येथेंचिहारपलीनिर्धारिता ॥ परादिकांचीवार्ता ॥ नसांपडेयेथें ॥ ७ ॥ जैसेंप्रळयनीराच्याठायीं ॥ गंगासिंधुत्वउरलेंनाहीं ॥ तेवींचिदसदत्वेंवीणकांहीं ॥ आनंदमात्र ॥ ८ ॥ आतांयाचेंचिविशेषण ॥ विषयींकीजेनिरूपण ॥ तेंहीबोलिजेलअवधान ॥ निकेंदीजें ॥ ९ ॥

जेवींवायुचळबळेंसी ॥ जिरालाव्योमाचीयेकुसी ॥ आटलाप्रळयप्रकासी ॥ सप्रभभानू ॥ ४८ ॥ तेवींन्याहाळितांयियातें ॥ गेलेंपहाणेनसींपाहातें ॥ पुढतीघरौतेंवरौतें ॥ वंदिलींतीयें ॥ ४९ ॥

हेजैंजगाचीमिरवणी ॥ तैंजगभरोनीहेंचिदोन्हीं ॥ हेंचिपाहिजेन्याहाळूनि ॥ तंवऐसेंहोये ॥ ५१० ॥ जेवींस्थिरावतांपवन ॥ गेलागगनींजिरोन ॥ किंबहुनामोड्डनपवनपणाचीखूण ॥ गगनमात्र ॥ ११ ॥ प्रळयोप्रकाशोद्भवीं ॥ हारपलाप्रभेसीरवी ॥ तेवींहारपलेंप्रत्ययार्णवीं ॥ पहाणेंनसींपाहातें ॥ १२ ॥ हेंचिययाचेंवंदन ॥ येहींचययालागून ॥ वंदितांहीनिपटून ॥ नुठीभेदु ॥ १३ ॥ जाणोजातांजयातें ॥ नुरेचिजाणवेसीजाणतें ॥ ऐशानिहीकांतें ॥ वंदिलींमियां ॥१४॥ ह्मणिजेप्रत्ययाचेनिमिसें ॥ जोकाहींभेदभासे ॥ तोयाप्रत्ययरसें ॥ पुसोनिगेला ॥ १५ ॥ सुखाचेनभरे ॥ आपआपणयास्फुरे ॥ तयेचिसंधिहेभरे ॥ प्रत्ययसृष्टी ॥ १६ ॥ मागुतेंसुखावरी ॥ सुखाचीघडेजैंफरारी ॥ तैंहेप्रत्ययनगरी ॥ सुखेंचिदाटे ॥ १७ ॥ असोतयासुखाकांहीं ॥ आपणेवीणदेखिलेंनाहीं ॥ तऱ्हींसुखरूपतापाहीं ॥ नलोपेचि ॥ १८ ॥ तेवींजेसुखाचीरीती ॥ स्वसंवेद्यतातेचिपुढती ॥ ह्मणोनिवधूवरेंइयेंमागुतीं ॥ वंदिलींमियां ॥ १९ ॥ परीययातेंवंदितां ॥ नव्हेतीहेचंघनामीवंदिता ॥ ऐसेंचकांहींआतां ॥ बोलतुअसे ॥ ५२० ॥

जयाचावाहाणी ॥ वेदकुवेद्याचेंपाणी ॥
नपियेपणसांडणी ॥ अंगाचिहीकरी ॥ ५० ॥

जेथेंनाहींद्विधाभान ॥ स्वरूपचिस्वतांसंपूर्ण ॥ दुसरेनवीण ॥ जेंकांहींअसे ॥ २१ ॥ तऱ्हीं आपणेंचिकरून ॥ आपणअसेजेंआनंदघन ॥ ऐसीजेकांहींखूण ॥ तेलोपातेंनपावे ॥ २२ ॥ ह्मणो निज्ञेयज्ञातृत्वेंवीण ॥ ज्ञानतानचुकेजाण ॥ हाअनादिप्रवाहखंडण ॥ नपवेकधीं ॥ २३ ॥ याला गींईयेसुखप्रवाहीं ॥ अंगेंचिआंगपाहीं ॥ वेद्यवेदकतानाहीं ॥ सुखरूपताअसे ॥ २४ ॥ तेंचिहें सत्ताज्ञान ॥ द्विवचनद्वंद्वहीन ॥ जेंस्वताचिआपण ॥ सुखरूपेंअसती ॥ २५ ॥ यालागींहेवितृ ष्णें ॥ नेघेतीवेद्यजीवनें ॥ आतांअसतीवेदकपणें ॥ हेंहीनघडे ॥ २६ ॥ वेदनमात्रअसोन ॥ जेथें नरिघेवेदकपण ॥ अंगींचअंगजाण ॥ सांपडलेंअसे ॥ २७ ॥ निखळचिन्मात्रचिसर्वांगीं ॥ नाहीं अंगत्वनाअंगी ॥ सांडणीकरीयालागीं ॥ अंगचीही ॥ २८ ॥ एवंस्वविलासेंविलासे ॥ नयेवेद्यवे दकदशे ॥ तेंनमस्कारासीकैसें ॥ योग्यहोईल ॥ २९ ॥ हेंप्रमेयधरून ॥ अवधाराअग्रवचन ॥ जे येथेंउरलेंकोण ॥ नमस्कारासी ॥ ५३० ॥

तेथेंमीनमस्कारा ॥ लागींउरोंदुसरा ॥
तरीलिंगभेदिपऱ्हां ॥ जोंडूंजावों ॥ ५१ ॥

ऐसायेनिजैक्यपदीं ॥ जरीमजअसेनमकबुद्धी ॥ तरीआतांलिंगभेदी ॥ मीचिजालों ॥ ३१ ॥ पऱ्हाह्मणिजेमजपरता ॥ जोडावानलगेलिंगभेदिता ॥ जरीअसेनमस्कारितां ॥ नमकबुद्धी ॥ ३२ ॥ आतांजेंकरावेंनमन ॥ तेंतंवअभेदेंहीन ॥ येचविषयींवचन ॥ ऐकावेंनिकें ॥ ३३ ॥

परीसोनेनसेदुजें ॥ नव्हेतुंलेणेंसोनेयाभजे ॥
हेंनमनकरणेंमाझें ॥ तैसेंआहे ॥ ५२ ॥

ऐसेंजेंनिजात्मैक्य ॥ जेथेंनाहींनम्यनमक ॥ नमस्कारतोस्वाभाविक ॥ तेथेंचिअसे ॥ ३४ ॥ स्वरूपप्रत्ययोहोतां ॥ जुरेप्रमेयआणिप्रमाता ॥ प्रत्ययमात्रचिआतां ॥ स्वरूपतेंचि ॥ ३५ ॥ न सतांप्रत्ययाचीहाणी ॥ संचरेतेथेंकेवींकरणी ॥ आतांप्रत्ययाचिलागुनी ॥ प्रत्ययअसे ॥ ३६ ॥ तें तंवकरणीहीन ॥ तऱ्हींदिसेकर्मभान ॥ जेवींसुवर्णीभूषण ॥ नभजोनिभजे ॥ ३७ ॥ तैसेंमाझेंन मन ॥ करितांहीकरणीहीन ॥ येचविषयींवचन ॥ आणीकऐका ॥ ३८ ॥

सांधतांवाचेतेंवाचा ॥ ठाऊवाच्यवाचकांचा ॥
पडतांकायभेदाचा ॥ विडाळहोये ॥ ५३ ॥

वाचाऐसाजोशब्द ॥ वाचावदेविशद ॥ तरीयेथेंवाच्यवाचकभेद ॥ कैसाहोये ॥ ३९ ॥ वा चातंवद्विधानाहीं ॥ शब्दतरीउठिलाचपाहीं ॥ दिसेवाच्यवाचकताही ॥ तऱ्हीभेदहीन ॥५४०॥ तैसेंप्रत्ययरूपचिजेंकांहीं ॥ तयाचाप्रत्ययहोतांही ॥ प्रमेयप्रमातृत्वतानाहीं ॥ त्याचेंत्यासी॥४१॥ तैसेंचिनमस्कारहीकरितां ॥ आपलीजेनम्यनमकता ॥ येथेंभेदाचीवार्ता ॥ नसरेकधीं ॥ ४२ ॥ नकरितांजेंनमन ॥ तेंकेलियाहीकरणीहीन ॥ नकरितांकरितांआन ॥ होऊंचिनशके ॥ ४३ ॥ ते थेंनकरिणियाचाभाव ॥ धरावाहेंचिमाव ॥ आतांकरणेंचिस्वयमेव ॥ नकरावेंकां ॥ ४४ ॥ त सात्प्रत्ययासीप्रत्यये ॥ हेंतंवनव्हेसद्वय ॥ तेंतेंचिभजकभजनीय ॥ उमटतअसे ॥ ४५ ॥ तेंचिदृ ष्टांतेंसहित ॥ पुढेंऐसेंचिबोलत ॥ भावेंभावपेलत ॥ नविसंचोनी ॥ ४६ ॥

सिंधुआणिगंगेचीमिळणी ॥ स्त्रीपुरुषनामाचीमिरवणी ॥
दिसतसेतरीकायपाणी ॥ द्वैतहोईल ॥ ५४ ॥

स्त्रीपुरुषनाममिसें ॥ गंगाआणिसिंधुहेंऐसें ॥ मिळालेंचिमिळतसे ॥ द्वंद्वहीन ॥ ४७ ॥ हेतं वमिळणियाचीआधीं ॥ उदकींद्वंद्वनव्हेतेंचिकधीं ॥ स्त्रीपुरुषनामभेदीं ॥ भेदवलेंनाहीं ॥ ४८ ॥ परींगंगेचाप्रवाह ॥ सिंधूसिमिळावाहास्वभाव ॥ मिळतांहीद्वंद्वभाव ॥ उठिलाकायी ॥ ४९ ॥ तैसेंप्रत्ययमात्रचिअसे ॥ याचाचिप्रत्ययोहोतसे ॥ नमस्कारहीयेणेंच्चिविशेषें ॥ त्याचात्यासी ॥ ५५० ॥ एवंअनुभवहोतां ॥ नयेचिप्रमातृत्वप्रमाणता ॥ हेच्चिखूणआतां ॥ नमस्काराची ॥ ५१ ॥ पुढेंस्पष्टवचन ॥ मूळओवीअसेजाण ॥ श्रोताद्यावेंअवधान ॥ त्रिपुटिगिळूनी ॥ ५२ ॥

पाहेंपांभास्यभासकता ॥ आपल्याठायींदाविता ॥
एकपणाकायसविता ॥ मोडितअसे ॥ ५५ ॥

सूर्यप्रकाशेंसूर्यदेखवा ॥ परीसूर्यतंवनयेभेदभावा ॥ किंवाप्रकाशमोडावा ॥ लागलानाहीं ॥ ५३ ॥ मोडूनिदुखंडआटणें ॥ मगएकपहावाएकानें ॥ हेंनघडेतेवींनम्यनमने ॥ नुठेचिद्वंद्व ॥५४॥

चांदाचीयादोंदावरी ॥ होतचांदिणीयाचीविखुरी ॥
काईउणेंदीप्तीवरी ॥ गिवसोपांदीपु ॥ ५६ ॥

चंद्राचेंचांदिणें ॥ चंद्रशोभायमानतेणें ॥ तरीचंद्राचेंचंद्रपण ॥ उणेंहोईलकाई ॥ ५५ ॥ भे देंवीणचंद्रचांदिणें ॥ असोनीचिदिसेवेगळालिपणें ॥ तैसेंनम्यआणिनमने ॥ उठेनाभेदु ॥५६॥ किंवादीप्तीसीदीपपूर्ण ॥ तेवींनम्यजेंतेंचिनमन ॥ करणीदिसेपरीनिपटून ॥ करणीहीन ॥५७॥

मोतियांचीकीळ ॥ होयमोतियावरीपांगुळ ॥
अगळेंनिर्मळ ॥ रूपायेकीं ॥ ५७ ॥

मोतीयेनसींकीळ ॥ भेदलीनसोनसमूळ ॥ तऱ्हींमोतींसुढाळ ॥ कीळेंनेंदिसे ॥ ५८ ॥ तेवीं प्रत्ययमात्रस्वरूप ॥ नसोनिकदाचिविक्षेप ॥ तऱ्हींप्रत्ययाचेंमाप ॥ प्रत्ययेंचिघेईजे ॥ ५९ ॥ स्वताचजेंनम्यकनमितें ॥ तेंऐसेंफावलेंनमस्कारातें ॥ परीअभेदआतें ॥ भेदवेना ॥ ५६० ॥

मात्राचीयात्रिपुटीया ॥ प्रणवुकायकेलाचिरटिया ॥
किंणकारतिरेघटियां ॥ भेदवलाकाई ॥ ५८ ॥

अकारउकारमकार ॥ एवंजोओंकार ॥ तोनव्हेत्रिप्रकार ॥ मात्रात्रयेंयेणें ॥ ६१ ॥ किंवाति हींरेघींणकारएकु ॥ नुठेयेथेंभेदतर्कु ॥ तैसेंवेद्यआणिवेदकु ॥ वेदनचितें ॥ ६२ ॥ ॥ आशंका ॥ स्वतावेदनमात्रचिजाण ॥ तेथेंवेदकेंकायप्रयोजन ॥ आणिवेद्यकहीहोआवेंकोण ॥ वेदकता तया ॥ ६३ ॥ ॥ उत्तर ॥ ॥ तरीवेदनमात्रजेंआपण ॥ तेंतंवनव्हेअवेदन ॥ तस्मात्आपणया आपण ॥ सर्वदावेद्य ॥ ६४ ॥ हेचियेथेंवेद्यवेदकता ॥ नसोनिचिअसेसर्वथा ॥ आतांनम्यआ णिनमिता ॥ नह्मणिजे ॥ ६५ ॥ स्वरूपआहेतेंचिआहे ॥ हेंस्वरूपेंचिपडतसेठायें ॥ येथेंउणी वतंवनये ॥ स्वरूपासीकांहीं ॥ ६६ ॥ लाभासीचलाभलाभे ॥ शोभाचिआलीशोभे ॥ येणेंचि समारंभें ॥ पुढेंहीबोलें ॥ ६७ ॥

अहोऐक्याचेंमुदलनढळें ॥ आणिसाजिरेपणाचालाभमिळे ॥
तरीस्वतरंगाचीबुकुळें ॥ तुरंबूकांपाणी ॥ ५९ ॥

स्वरूपनिजअस्तिक्यत्वेंआहे ॥ तेणेंचिअस्तिक्यत्वप्रत्ययाये ॥ साजिरेपणाचालाभहोये ॥ आपलाचिआपणा ॥ ६८ ॥ नमोडतांचिउदकपण ॥ तरंगींउदकशोभायमान ॥ तरीतरंगमाळा जीवन ॥ तुरंबीनाकां ॥ ६९ ॥ उदकाचीरेखानमोडे ॥ आणिस्वकल्लोळींस्वताचिक्रीडे ॥ येथें कायउणीवघडे ॥ किंशोभादावी ॥ ५७० ॥ राजयासीजेंराजेपण ॥ तेणेंचिकरीराजआज्ञाविशेषण ॥ तरीकायहोयराज्यहीन ॥ किंशोभादावी ॥ ७१ ॥ तेवींस्वरूपप्रत्ययमात्रचिआहे ॥ ऐसें जरीप्रत्ययाये ॥ तेथेंस्वरूपहानीनव्हे ॥ आणिदुणावेसुख ॥ ७२ ॥ जेवींआपुलेंसभाग्यपण ॥ आपणासन्मुखहोयेजाण ॥ तरीकायहोयभाग्यहीन ॥ कींदुणावेसुख ॥ ७३ ॥ एवंनम्यआणिनमन ॥ भज्यआणिभजन ॥ हाभेदकांहींनसोन ॥ प्रवाहनखंडे ॥ ७४ ॥ उपरोधेप्रवाहखंडितां ॥ भेदुचिदुणावेपुरता ॥ तेथेंअनुभवाचीवार्ता ॥ बोलोंचिनये ॥ ७५ ॥ तस्मात्याप्रत्ययाचीधरून सोये ॥ नमस्कारआहेतोचिहोये ॥ भेदतमतसेंसहजनराहें ॥ प्रत्ययार्कीं ॥ ७६ ॥

ह्मणोनिभूतेशुआणिभवानी ॥ वंदिलींनकरोनसिनानी ॥
मीरिगालोंनमनीं ॥ तेंहीऐसें ॥ ६० ॥

सिनानीह्मणिजेवेगळालीं ॥ हेंवधुवरेंनाहींकेलीं ॥ तेवींनमकबुद्धिमालवली ॥ मीपणेंसीं ॥ ७७ ॥ मुळींनाहींसद्वयता ॥ तेथेंमीपणाठाऊकेउता ॥ नमनजेंयेथेंआतां ॥ हेंचिमाझें ॥ ७८ ॥

दर्पणाचेनित्यागें ॥ प्रतिबिंबबिंबींरिगे ॥
कांबुडीदीजेतरंगे ॥ वायुचाठेला ॥ ६१ ॥

ऐसेंजेंअद्वयानंद ॥ अहंप्रत्ययेंहेंचिमीसिद्ध ॥ येथेंभेदद्दष्टिद्वंद्व ॥ मीचिमज ॥ ७९ ॥ येथेंपालटतंवकदानघडे ॥ परीमीमजद्दश्यत्वेंआवडे ॥ जैसीघृतकणिकाघृतेंचिघडे ॥ सद्वयतेंसी ॥५८०॥ तेंभेदबुद्धिमात्रतुटे ॥ स्वरूपएकटेचितेंप्रगटे ॥ नमस्कारआईताघडे ॥ नकरितांचि ॥ ८१ ॥ दर्पणत्यागेंप्रतिबिंब ॥ पावेआपलेंस्वयंभ ॥ कांजाऊनिवायुतरंगभांब ॥ उदकींशमे ॥ ८२ ॥ तेवीं सुखाचीघडली ॥ बुद्धिजेभेदेंगिवसिली ॥ तेउकलूनसुखींमुराली ॥ सुखेंकरून ॥ ८३ ॥ आतां सुखावांचूनिकांहीं ॥ दुसरेंउरलेंचिनाहीं ॥ आणिऐसियेंचिठायीं ॥ वंदनहीमाझें ॥ ८४ ॥

नातरीनिदजातखेवों ॥ पावेआपलाठावो ॥
तैसेंबुद्धित्यागेंदेवीदेवो ॥ वंदिलींमियां ॥ ६२ ॥

आपणआपणयानविघडे ॥ तेणेसीनिद्रेसुरवाडे ॥ तेनिदजातांआपणाकडे ॥ पावलाचिपावे ॥ ८५ ॥ ह्मणिजेजागरींजोएकला ॥ तोचिस्वप्नींबहूजाला ॥ तोनिद्राजातांआला ॥ आपणयामाजीं ॥ ८६ ॥ तेआपणयाआपण ॥ पावावेंनलगेजाण ॥ तेवींबुद्धित्यागेंजाणवंदन ॥ तेणेंचितया॥८७॥ असोबुद्धीचात्याग ॥ सहजप्रत्ययींहोसांग ॥ आतांदेवोदेवीहेभाग ॥ वंदिलींतुरोनी ॥ ८८ ॥ राहिलेंबुद्धिप्रतारण ॥ मगशिवशिवातंवशंभुचिजाण ॥ मीशांभवीआपण ॥ ऐसाजालों ॥ ८९ ॥

सांडूनमीठपणाचालोभु ॥ मिठेंसिंधुपणाचाघेतलालाभू ॥
तेवींअहंजाऊनिमीशंभु ॥ शांभवीजालों ॥ ६३ ॥

मिठेंजरीसिंधुहोणें ॥ तरीमीठपणासीहारपणें ॥ तैसेमीपणेंवीणशंभुहोणें ॥ माझेंमज ॥ ५९० ॥ हेंमाझेंशांभवीपण ॥ शोभलेंअसेअहंवीण ॥ याचेंचिआतांविशेषण ॥ पुढेंहीअसे ॥ ९१ ॥

शिवशक्तिसमावेशें ॥ नमनकेलेंम्यांऐसें ॥
रंभागर्भआकाशें ॥ रिगालाजैसा ॥ ६४ ॥

शिवशक्तीचेंअवसान ॥ तैसेंचिहीमाझेंनमन ॥ मीपणाचीहीखूण ॥ तेथेंचिहोती ॥ ९२ ॥ तैंपरस्पराप्रवेशें ॥ सर्वथाआतांनदिसे ॥ तेचिदोनीएकरसें ॥ लोपोनिगेलीं ॥ ९३ ॥ असोया चाजोप्रवेशकांहीं ॥ तोप्रवेशाऐसानाहीं ॥ रंभागर्भाच्याठायीं ॥ आकाशजैसें ॥ ९४ ॥ रंभागर्भ आणिआकाश ॥ हाजैसावाग्विलास ॥ तैसासुखाचाचिभास ॥ दोनामींउमटे ॥ ९५ ॥ तेंवचन मात्रगेलें ॥ वांचूनिसुखातेंनाहींघडिलें ॥ मियांहीनमनकेलें ॥ यियाचिरीति ॥ ९६ ॥ सांडूनश ब्दाचेंकवच ॥ नमस्कारघडलासाच ॥ सुखमात्रतंवआहांच ॥ पहिलेंचिअसें ॥ ९७ ॥ एवंहेंमा झेंनमन ॥ क्रियाभागानयेवोन ॥ प्रकृतिपुरुषींऐक्यपण ॥ नकरितांअसें ॥ ९८ ॥ एवंप्रकृतिपुरु षाचेंवंदन ॥ जहालेंयेथेंसंपूर्ण ॥ एतावत्कालनिरूपण ॥ मिशेंकरूनि ॥ ९९ ॥ स्वरूपसत्यज्ञाना नंद ॥ प्रपंचाचाआयिताबाध ॥ आतांजोकांहींदिसेभेद ॥ तोप्रकृतिपुरुषमिशें ॥ ६०० ॥ स्वरू पस्वरूपींचिलभ्यमान ॥ हेंतंवअसेकरणीवीण ॥ प्रकृतिपुरुषातेंजाण ॥ इतुलींचियेथें ॥ १ ॥ तें चिसत्ताज्ञानस्वरूपें ॥ रूपाआलींचिअरूपें ॥ आतांभेदयाचेनिआरोपें ॥ तोजालाचिनव्हे ॥ २ ॥ तस्मात्स्वरूपासीखंडण ॥ काळींकवणेहीनव्हेजाण ॥ आतांमाझेंनमन ॥ येणेंचिबोधें ॥ ३ ॥ हातातपर्यार्थधरून ॥ येथवरीआलेंनिरूपण ॥ प्रकृतिपुरुषाचेंवंदन ॥ ऐसेंझालें ॥ ४ ॥ पुढेंश्रीगु रुवंदन ॥ तेंहीकीजेलनिरूपण ॥ नित्यानंदकृपापूर्ण ॥ लाधेजरी ॥ ५ ॥ ॥ इतिश्रीअनुभवामृ तविवरणेप्रकृतिपुरुषवंदनंनामशिवकल्याणकृतप्रथमप्रकरणंसमाप्तं ॥

प्रकरण द्वितीय.

ओंपरमात्मनेनमः ॥ यावरीसद्गुरुवंदन ॥ वंदनींउठेक्रियाभान ॥ कांजेंचिन्मात्रैकचैतन्य घन ॥ सत्यानंदस्वरूप ॥ १ ॥ स्वताजेंस्वसंवेद्य ॥ दाऊनिभेदजेंअभेद्य ॥ ऐसेंविशदजेंअविच्छेद्य ॥ निरूपिलेंमागें ॥ २ ॥ केवळचिन्मात्रैक्यघन ॥ प्रकाशकआपलेंचिआपण ॥ ह्मणोनितेंचिआगुतें गुरुलक्षण ॥ करूनवंदिजेतें ॥ ३ ॥ नसोनिगुरुशिष्यभेद ॥ सर्वकाळआत्मास्वबोध ॥ ह्मणोनि गुरुस्तवनींप्रबंध ॥ योग्यतापावे ॥ ४ ॥ कांजेंआचार्यवान्पुरुषोवेद ॥ हेंजेंवेदींप्रतिपाद्य ॥ त्या वेदार्थासीअभेद्य ॥ गुरुस्वरूपें ॥ ५ ॥ ह्मणोनिस्वरूपानुभवप्रकटीकरण ॥ तेंचिहेंगुरुस्तवन ॥ श्रोतादीजेअवधान ॥ विवरणासीयया ॥ ६ ॥

आतांउपायवनवसंतु ॥ जोआज्ञेचाआहेवतंतु ॥
जोअमूर्तचिमूर्तु ॥ कारुण्याचा ॥ १ ॥

नाहींगुरुलघुतेचास्पर्शु ॥ सुखस्वरूपजेंसावकाशु ॥ तेथेंनावेकदाविलाविलासु ॥ स्तव्यस्तु तित्वें ॥ ७ ॥ नभंगोनएकपण ॥ दाविलेंस्वभोगींसादरपण ॥ साध्यआणिसाधन ॥ दाविलें जऱ्हीं ॥ ८ ॥ तऱ्हींसाध्यसाधनेंसहित ॥ सद्गुरुचिअनुस्यूत ॥ नखंडेअखंडित ॥ सत्तामात्रजो ॥ ९ ॥ तोचिउपायवनवसंतु ॥ तोचिआज्ञेचाआहेवतंतु ॥ तोचिकारुण्याचामूर्तु ॥ अमूर्तत्वें ॥ १० ॥ स्वसुखासीनहोनीभंग ॥ मांडलामागुताभोग ॥ जेवींजळाचावेग ॥ जळाचिवरी ॥११॥ त्याभोगाचेउपाय ॥ आपणचिद्योतीतजाय ॥ तेथेंफळोन्मुखताहीहोय ॥ आपणचिस्वयें ॥ १२ ॥

ह्मणोनउपायवनउद्यान ॥ तेथेंवसंतहोऊनआपण ॥ फलोन्मुखतालाहोन ॥ निजफळींफळे ॥१३ येथेंउपायाचेंअवसान ॥ उपायेंचिपावलेंजाण ॥ आत्मातंवसुखघन ॥ पहिलेंचिआर्थीं ॥ १४ ॥ असोगुरुशिष्याचेंऐक्य ॥ हेंतंवपहिलेंचिस्वाभाविक ॥ येथेंउपाधियोतिलानावेक ॥ तोचिनिमाला ॥ १५ ॥ जेवींपावतांसिंधुजळ ॥ बोधत्वेंचिवेगळेंकेवळ ॥ वांचूनिउदकउदकपणासीविकळ ॥ पहिलेंचिनाहीं ॥ १६ ॥ ह्मणोनिउपायवनवसंतु ॥ सद्गुरुराजासमर्थु ॥ जोआपुलीआज्ञा वर्तवीतु ॥ अत्रुटितपणें ॥ १७ ॥ ज्याचीआज्ञावर्तेसर्वत्र ॥ परीहाअहेवसूत्रमात्र ॥ कांजेंकेवळ चिन्मात्र ॥ तेथेंसर्वत्रताकैंची ॥ १८ ॥ अहोआहेवपणाचीदोरी ॥ तेणेंचिवर्ततआज्ञासुंदरी ॥ तियेसुंदरीचाव्यापारीं ॥ अकर्ताकांतु ॥ १९ ॥ असोज्याचीयेआज्ञेकरी ॥ उपायनिजबळातेंवरी ॥ तेअज्ञाहीबळधरी ॥ गुरुकरुणेचें ॥ २० ॥ असोस्वविलासाचीयाकुसरी ॥ साध्यसाधकत्वातें विस्तारी ॥ मगकौतुकेंचिप्रेरी ॥ निजकरुणेतें ॥ २१ ॥ ह्मणोनमूर्तकारुण्याचा ॥ परंतुहाअमूर्तचिसाचा ॥ जेवींरवाकापुराचा ॥ कापुरेंचिभरला ॥ २२ ॥ अहोहेंजेंमूर्तपण ॥ तेंकरुणामात्रचिजाण ॥ परंतुअमूर्तत्वाचीखूण ॥ संचलीअसे ॥ २३ ॥ उपायवनआणिवसंतु ॥ आज्ञाआणिआहेवतंतु ॥ हेनविकरूनीचिदावितु ॥ आपलारूपीं ॥ २४ ॥ तेंजेंचिन्मात्रअमूर्त ॥ तेणेंसीचमूर्तिमंत ॥ होऊनिकरुणावोपित ॥ निजसाधकासी ॥ २५ ॥ नदेखोनिसाध्यसाधनासी ॥ नेणोनिगुरुशिष्यभेदासी ॥ निखळकारुण्याचाचिरासी ॥ अमूर्तचिजो ॥ २६ ॥ तयाचेंकेलेंवंदन ॥ हासंबंधुपुढिलेंपदींजाण ॥ तेंहीआतांनिरूपण ॥ कीजेलऐका ॥ २७ ॥

अविद्येचेंअडवें ॥ भुंजीतजीवपणाचेंभवें ॥ तयाचैतन्याचा
धावे ॥ धावेकारुजो ॥ २ ॥ मोडूनिमायाकुंजरु ॥ मुक्तिमो
तियाचावोगरु ॥ जेववितांसद्गुरु ॥ श्रीनिवृत्तिवंदु ॥ ३ ॥

होतांजयाचास्वरूपानुभव ॥ तुटेअविद्येचेंअडव ॥ चैतन्यासीजीवभाव ॥ हेमातुचिसरे ॥२८॥ स्वरूपानुभवलक्षण ॥ याचीधावणीहेंचिजाण ॥ आतांचैतन्यासीजीवपण ॥ कधींहीनाहीं ॥२९ एवंअविद्येचाअभाव ॥ ह्मणोनिसहजचिबंधुवाव ॥ तेथेंमुक्तिसीहीठाव ॥ केउताउरे ॥ ३० ॥ ह्मणोनमायाकुंजरमोडून ॥ मुक्तिमुक्ताफळातेंकाढऊन ॥ तोचिवोगरुभक्षऊन ॥ सांतविलेंजेणें ॥ ३१ ॥ ह्मणिजेमायामिशेंमुक्तिमिरवे ॥ अन्यथामुक्तित्वकैंचेंसंभवे ॥ तरीज्याचेनिस्वरूपानुभवें ॥ मायाचिमिथ्या ॥ ३२ ॥ तेथेंमुक्तितेकिंलक्षण ॥ स्वरूपसर्वदाअविलक्षण ॥ एवंज्याचेकरुणेकरून ॥ ऐसीस्थिती ॥ ३३ ॥ तोसद्गुरुश्रीनिवृत्ति ॥ वंदिजेतयाचेचिप्रतीती ॥ जेणेंबंधमोक्षाचीगुंती ॥ खंडूनजाय ॥ ३४ ॥

जयाचेनिअपांगपाते ॥ बंधमोक्षपाणींआतें ॥
भेटेजाणतयाजाणतें ॥ जयापासीं ॥ ४ ॥

येणेंअळुमाळहीअवलोकितां ॥ बंधमोक्षजालेवृथा ॥ कांजेयाचेस्वरूपींवार्ता ॥ दोहींचीनाहीं ॥ ३५ ॥ अपांगपातह्मणिजेऐसें ॥ नेणोंकायपाहातुचनसे ॥ कांजेदृश्याचेनिमिशें ॥ नपाहिजेयेणें ॥ ३६ ॥ याचेलीलाचिअवलोकन ॥ तेंस्वस्वरूपींसंस्थान ॥ मुक्तत्वआणिबंधन ॥ यामाजीं कैंचें ॥ ३७ ॥ ह्मणोनययाचीहोतांकृपादृष्टी ॥ सुखेंचिकोंदलीसृष्टी ॥ बंधमोक्षाचीराहाटी ॥ तुटोनगेलें ॥ ३८ ॥ याचेंपावतांअवलोकन ॥ बंधमोक्षतोमुळींचशून्य ॥ परंतुअवलोक्यअवलोकी

पण ॥ तुटोनिगेलें ॥ ३९ ॥ जाणतयाजाणतेंभेटे ॥ ह्मणिजेज्ञेयज्ञानज्ञातेतुटे ॥ ज्ञानमात्रचिप्रगटे ॥ आपेआप ॥ ४० ॥ असोज्याचेयेदृष्टीकरून ॥ भेटिजेआपणयाआपण ॥ तुटोनविशेषसामान्य ॥ कैवल्यतायें ॥ ४१ ॥

कैवल्यकनकाचीयादाना ॥ जोनकडसीथोरुसाना ॥
द्रष्टयाचेदर्शना ॥ पाटाउजो ॥ ५ ॥

कैवल्यकनकजेमहादानदाता ॥ जेंपदार्थेंवीणअस्तिक्यता ॥ तेथेंकेंचीथोरसामान्यता ॥ चिन्मात्रत्वें ॥ ४२ ॥ असोज्याचेंरूपकैवल्यपूर्ण ॥ तेथेंकेंचेंथोरसामान्यकोण ॥ ह्मणोनकडसणीनसेजाण ॥ रूपींजयाचे ॥ ४३ ॥ आतांसागरींकल्लोळन्यायें ॥ जोकोण्हीपात्रतालाहे ॥ तरीकैवल्यसुखआहे ॥ स्वांगींचसिद्ध ॥ ४४ ॥ किंवासागरींचेंलवण ॥ सागरींयेतांशरण ॥ तेंकडसणीनकरितांचिजाण ॥ सागरत्वलाभे ॥ ४५ ॥ तेवींसमविषमतेवीण ॥ कैवल्यकोंदलेंसेजाण ॥ तेंआपेआपउल्हासोन ॥ शरणाधिकारी ॥ ४६ ॥ तरीतेथेंकायअनुहोय ॥ परीकैवल्येंनेणिजेहे सोये ॥ सिद्धकैवल्यताचिलाहे ॥ कैवल्यचिस्वयें ॥ ४७ ॥ ह्मणोनसामान्यथोरनकडसूनी ॥ गुरुराजकैवल्यदानीं ॥ किंबहुनाद्रष्टयाच्यादर्शनीं ॥ सहाकारीचहा ॥ ४८ ॥ असोविशेषसामान्यतेवीण ॥ जोद्रष्टामात्रगुरुपूर्ण ॥ त्याद्रष्टयाचेंदर्शन ॥ दृष्टत्वेंचिलाभे ॥ ४९ ॥ जेवींरवितेजेंरवीपाहिजे ॥ किंदीपेंचिदीपनिहाळिजे ॥ किंबहुनाद्रष्टयानेंलाहिजे ॥ दृष्टत्वआपुलें ॥ ५० ॥ नानाद्रष्टयादृष्टेंभेटे ॥ तेंदृष्टत्वींहूनिचिउमटे ॥ तेंद्रष्टुत्वचिगोमटें ॥ सद्गुरुरूप ॥ ५१ ॥ एवंद्रष्टत्वाचाअनुभव ॥ व्हावयाहाचिठाव ॥ ह्मणोनहागुरुराव ॥ हाचिपाटाउ ॥ ५२ ॥ अगाद्रष्टयानेंसिद्धदर्शन ॥ तेंदृष्टत्वचिअसेकरणीवीण ॥ ययाअनुभवाचेंद्वारपूर्ण ॥ गुरुकृपाचीपकी ॥ ५३ ॥ मगपावतांआपणाआपण ॥ तेथेंदर्शनगेलेंहारपोन ॥ याअनुभवाआश्रोजाण ॥ गुरुकृपाचिपकी ॥ ५४ ॥ एवंभूतजाण ॥ सद्गुरूचेंमहिमान ॥ पुढेंहीनिरूपण ॥ ईयेंचिविषयीं ॥ ५५ ॥

सामर्थ्याचेंनिबिकें ॥ जोशिवाचेंहीगुरुत्वजिंके ॥
आत्माआत्मसुखदेखे ॥ आरिसाजिये ॥ ६ ॥

जयाचेंनिसामर्थ्यबळें ॥ शिवाचेंथोरपणमावळें ॥ जेनावेकअनुभवाचेडोळे ॥ लागूनजालें ॥ ५६ ॥ आत्मत्वींआत्माभिमान ॥ एतल्लक्षणजोदर्पण ॥ जेथेंआपलाचिआपण ॥ दोंठायींजाला ॥ ५७ ॥ आत्माएकाकींपरिपूर्ण ॥ दर्पणींदेखीलेंजीवपण ॥ त्याचानियंताआपण ॥ जालाशिवु ॥ ५८ ॥ देखोनिजीवाचीसामान्यता ॥ शिवींतत्काळजडलीगुरुता ॥ परीहेगुरुपणेंचिगौणत ॥ आलीशिवासी ॥ ५९ ॥ आतांसद्गुरुप्रसादेंकरून ॥ यथार्थजैंस्वरूपज्ञान ॥ तेंअटोनगेलेंजीवपण ॥ मगशिवत्वतैंकिमात्मक ॥ ६० ॥ एवंगुरुकृपेचियातत्वता ॥ जिंकिलीशिवींचीगुरुता ॥ जेआपआपणपाहतां ॥ जालीहोती ॥ ६१ ॥ तस्मात्आनंदचिआनंदे ॥ जयाचीयाकृपाप्रसादें ॥ पुढेंऐसेंचिविशदें ॥ बोलतुअसे ॥ ६२ ॥

बोधचंद्राचीयाकळा ॥ विखुरलीएकवेळा ॥
कृपापुणीवलीळा ॥ करीजयाची ॥ ७ ॥

चंद्रत्वासीनहोनीहानी ॥ कळाविभागतीप्रतिदिनीं ॥ त्याकळांचीमेळवणी ॥ पौर्णिमाकरी

सूर्याचेनिप्रकाशें ॥ जेंकांहींजडआभासे ॥ तयातोगिवसे ॥ सूर्यकायी ॥ १४ ॥ तेंवींजेणेंतेजें ॥ वाचेसीवाच्यसुजे ॥ तें वाचाप्रकाशिजे ॥ हेंकेंआहे ॥ १५ ॥

सूर्याचेनिप्रकाशें ॥ पदार्थजातआभासे ॥ तेंपदार्थींकैसें ॥ प्रकाशिजेसूर्ये ॥ ९२ ॥ सूर्याचें अवलोकन ॥ तेंसूर्यप्रकाशेंचिकरून ॥ वांचूनिजडपदार्थींकेवींजाण ॥ प्रकाशिजेसूर्यें ॥ ९३ ॥ तेवींसिद्धसच्चिदानंद ॥ जेणेंप्रकाशिलाहाशब्द ॥ तरीशब्देंकेवींसिद्ध ॥ साधिजेपाहें ॥ ९४ ॥ वाचाजेणेंवावडे ॥ तेंकेवींआलेंवाचेपुढें ॥ तस्मात्वाचानघडे ॥ वाच्यसूचक ॥ ९५ ॥ अर्थी अर्थमगशब्द ॥ हेंतंवदिसेप्रसिद्ध ॥ तेथेंकेवींसच्चिदानंद ॥ वाचेचाविषय ॥ ९६ ॥

विषोनाहींकोणहाही ॥ जयाप्रमेयत्वचिनाहीं ॥ तयास्वप्रकाशाकायी ॥ प्रमाणहोये ॥ १६ ॥

तेवींचिद्घनानंदएकलें ॥ नाहींदुजयातेंजेंप्रसवलें ॥ किंवाठायींचेंनाहींजालें ॥ त्याहूनिस्वतंत्र ॥ ९७ ॥ ह्मणोनिविषयकोण्हाचानव्हे ॥ जेंकींस्वप्रकाशेंचिआहे ॥ ऐसेंतेंकेवींसाहे ॥ प्रमाणासी ॥ ९८ ॥ जरीप्रमाणासीविषयनव्हे ॥ तरीप्रमाणवृथाहोये ॥ तेंजैसेंतैसेंआहे ॥ स्वताचिसिद्ध ॥९९॥ एवंप्रमेयप्रमाणातीत ॥ निखळआत्माचिसतत ॥ तेंप्रमाणींसाधिजेत ॥ ऐसेंनव्हे ॥१००॥

आतांसच्चिदानंदशब्द ॥ येथेंनकरितांअसेशब्दबाध ॥ वांचूनिजेंअसेस्वतःसिद्ध ॥ तेंठायींचे ठायीं ॥ १ ॥ ॥ आशंका ॥ ॥ स्वतःसिद्धवस्तुच्याठाईं ॥ प्रमेयप्रमाणत्वनाहीं ॥ तरीवस्तु चिहेकायी ॥ प्रमाणनव्हे ॥ २॥ आतांप्रमाणजरीअसे ॥ तरीप्रमेयत्वकासयानसे ॥ येआशंकेस्त वऐसें ॥ बोलिलेंपुढें ॥ ३ ॥

प्रमेयपरिच्छेदें ॥ प्रमाणत्वनांदे ॥
तेंकांहींस्वतःसिद्धे ॥ वस्तूच्याठाईं ॥ १७ ॥

वस्तूसीवस्तुहेंप्रमाण ॥ येथेंप्रमाणचिविरालेंवस्तुत्वेंजाण ॥ तेथेंप्रमेयतेंकोठून ॥ आणावें दुजें ॥ ४ ॥ प्रत्ययमात्रवस्तुपूर्ण ॥ हेंचिप्रमेयहेंचिप्रमाण ॥ आतांप्रमेयपूर्णघन ॥ प्रमाणशून्य ५ आतांप्रमाणजरीनाहीं ॥ तरीप्रमेयतेंकोणकाई ॥ असोनठाईंच्याठाईं ॥ उभयातीत ॥ ६ ॥ प्रमेय चिप्रमाणजरीनोहे ॥ तरीकायप्रमाणत्वसाहे ॥ मगप्रमेयत्वेंप्रमेये ॥ कासयाअसे ॥ ७ ॥

एवंवस्तूसीजाणोंजातां ॥ जाणणेंचिवस्तुतत्वता ॥
मगजाणणेंआणिजाणता ॥ कैंचाउरे ॥ १८ ॥

नातरीप्रमेयपरिच्छेदे ॥ ह्मणिजेप्रमेयवेगळेंनांदे ॥ हेंनघडेस्वतःसिद्धे ॥ वस्तूच्याठाईं ॥ ८ ॥ अर्थेंशब्दत्वआलेंशब्दीं ॥ परीशब्देंनव्हेचिअर्थसिद्धी ॥ एवंप्रत्ययमात्रींअर्धीं ॥ मावळेशब्दु ॥९॥

ह्मणोनिसचित्सुख ॥ हेबोलवस्तुवाचक ॥
नव्हेतिहेशे ॥ विचारांचें ॥ १९ ॥

ह्मणोनिसच्चिदानंदत्रय ॥ याशब्दासीवस्तुनव्हेविषय ॥ होतांस्वरूपप्रत्यय ॥ शब्दुचिवृथा ॥ ११० ॥ विचाराच्याआंतु ॥ तोहाशब्दसंकेतु ॥ परीस्वरूपासीप्रकाशितु ॥ ऐसानव्हे ॥ ११ ॥ वाचाजेथेंनिवर्तती ॥ तेचिजाणावीआत्मानुभूती ॥ येणेंचिभावेंश्रुति ॥ बोलिलीअसे ॥ १२ ॥ विचाराच्याआंतु ॥ शब्दहीतेथेंचिविरमतु ॥ पुढेंहीयाचिहेतु ॥ बोलिलेंअसे ॥ १३ ॥

ऐसेंनिश्चयेंप्रसिद्धें ॥ चालिलींसच्चिदानंदपदें ॥ मगद्रष्टयास्व
संवादे ॥ भेटतीजेव्हां ॥ २० ॥ तेव्हेंळींवरिसोनिमेघु ॥
समुद्रहोऊनिओघु ॥ सरेदाऊनिमाघु ॥ राहेजैसा ॥ २१ ॥

स्वरूपींशब्दुनाहीं ॥ हेंदावावयाचेप्रवाहीं ॥ चालिलींअसतींपाहीं ॥ सत्तादिकेंहें ॥ १४ ॥ स्वरूपमात्रींनिर्गुणीं ॥ उमटलीसत्तादिवाणी ॥ परीउमटतांचिहानि ॥ शब्दाचीजाली ॥ १५ ॥ द्रष्टाद्रष्टृत्वींयिये ॥ त्रिविधविशेषणींएकुप्रत्यये ॥ परीप्रत्ययींविरोनिजाये ॥ त्रिविधविशेष ॥ १६ ॥ जेवींमेघाचेप्रवाहें ॥ सिंधुजळचिओघजालेंहे ॥ मगओघत्वमोडोनिगेलेंहे ॥ पावतां सिंधु ॥ १७ ॥ मेघद्वारावर्षलें ॥ तेंसिंधुजळत्वींओघजालें ॥ मगओघत्वमोडोनिगेलें ॥ पावतां सिंधु ॥१८॥ सिंधुजळसिंधुत्वेंसंचलें ॥ परीओघपणचिमिथ्याजालें ॥ तेवींसच्चिदानंदयेणेंबोलें ॥ बोलचिमिथ्या ॥ १९ ॥ स्वरूपासजेंसंचलें ॥ तेंप्रत्ययमेघेंप्राशिलें ॥ मगतेंह्मणेमेघेंवर्षिलें ॥ स च्चिदानंदत्वें ॥ १२० ॥ तेंचिहेंप्रत्ययओघ ॥ स्वरूपींमिळालेंअमोघ ॥ परीमिळतांचिओघभाग ॥ हरपलेंजाण ॥२१॥ तेथेंप्राशिताआणिजीवन ॥ हेंजीवनमात्रचिसंपूर्ण ॥ आणिओघरूपहीजाण ॥ अभेदेंतेंचि ॥ २२ ॥ एवंविभागींअविभाग ॥ येकचिस्वरूपसांग ॥ दुसरयाचालाग ॥ लागला

नाहीं ॥ २३ ॥ तेथेंशब्दींदिसेशब्दपण ॥ तेंचियेथेंव्यर्थजाण ॥ येऱ्हवींस्वरूपमात्रपूर्ण ॥ संचलें असे ॥ २४ ॥ सिद्धचिचिद्धनानंद ॥ प्रत्ययतोचिसिद्ध ॥ येथेंनकरितांचिबाध ॥ शब्दासी आला ॥ २५ ॥ बोलेंअर्थद्योतिला ॥ सेखींअर्थेंशब्दुचिपुसिला ॥ मगसच्चिदानंदहेबोला ॥ विष यहोयकेवीं ॥ २६ ॥ जेणेंअर्थेंशब्दरूपासीआला ॥ तेणेंचिअर्थेंशब्दअर्थिला ॥ ह्मणोनिअर्थबोला॥ नव्हेचिविषय ॥ २७ ॥

फळविऊनिफूलसुके ॥ फळनाशेरसपाके ॥ तोंहीरसउपखे ॥ तृप्तिदानीं ॥ २२ ॥ कांआहुतिअग्निआंत ॥ घालूनिवोसरे ह्यात ॥ सुखचेववूनिगीत ॥ उगाराहे ॥ २३ ॥ नानामुखामु खदाऊनि ॥ आरिसाजायनिगोनि ॥ कांनिदैलेंचेवऊनि ॥ चेववितेंजैसें ॥ २४ ॥ तैसेंसच्चिदानंदचोखटा ॥ दाऊनिद्रष्ट याद्रष्टा । तिन्हींपदेंलागतीवाटा ॥ मौनाचिया ॥ २५ ॥

पुष्पेंफळद्योतिलें ॥ सेखींपुष्पत्वासीचिमुकलें ॥ किंवाफळरसत्वाआलें ॥ फळपणामुके॥२८॥ किंवारसेंतृप्तिजाली ॥ तिणेंरसपणाहानीकेली ॥ अंगेंअंगनिवटली ॥ तृप्तिचिएकी ॥ २९ ॥ किं वाआहुतिहवनींसमर्पली ॥ तेथेंहस्तक्रियाचिहरपली ॥ अंगेंअंगसंचली ॥ आहुतीचिअग्नि ॥१३०॥ अथवागीतेंसुखठसावलें ॥ जेथेंगीतत्वहरपलें ॥ अंगेंअंगभरलें ॥ सुखचिसुखीं ॥ ३१ ॥ सुखेंचिसुखचेइलें ॥ गीतहेंमिसच्चिजालें ॥ सेखींसुखाचिसुखींभरलें ॥ गीतलोपें ॥ ३२ ॥ किंवा आरिसादेखिलेंमुख ॥ येथेंआरिसाजालाअप्रयोजक ॥ आपेआपमुख ॥ मुखींचिअसे ॥ ३३ ॥ आरिसादेखिलेंनावेक ॥ परीसंतोषासीमुखचिजनक ॥ यालागींआरिसियाचेलेख ॥ संतोषीं नाहीं ॥ ३४ ॥ किंवानावेकजेंनिदैलें ॥ तेंदुसरियानींजऱ्हींउठविलें ॥ तऱ्हींतेंव्यर्थजालें ॥ चेववि तेपण ॥३५॥ निःशेषजोनिदैला ॥ तोनवचेचिजागाकेला ॥ तस्मात्‌जागाचिजागाजाला ॥ हेंचि मुख्य ॥ ३६ ॥ अवघयाचातात्पर्यार्थु ॥ सिद्धचिअर्थसिद्धहोतु ॥ कार्यकारणाघातु ॥ नकरितां चिअसे ॥३७॥ ह्मणोनिसुखमात्रसच्चिदानंदु ॥ येथेंत्रिपदत्वेंजऱ्हींअनुवादु ॥ तरीप्रत्ययींबाधु ॥ शब्दासीजाला ॥ ३८ ॥ स्वरूपप्रत्ययमात्रचिअसे ॥ प्रत्ययचिप्रत्ययहोतसे ॥ येथेंशब्दशब्दत्वा सीरुसे ॥ सहजेंचिमौन ॥ ३९ ॥ फळेंबीजाचेनिमिसें ॥ पुष्पआणिलेंपुष्पदशे ॥ ह्मणोनिफळचि कारणअसे ॥ फळासीपैं ॥ १४० ॥ इत्यादिदृष्टांतेंकरूनी । कार्यचिसूचककारणीं ॥ ह्मणोनिचि कारणत्वाहानी ॥ सिद्धार्थी ॥ ४१ ॥ यालागींदृष्टचिजालेंद्रष्टें ॥ सच्चिदानंदींचोखटें ॥ त्रिपदें लागलींवाटे ॥ मौनाचिया ॥ ४२ ॥ प्रत्ययाचेनिविलासें ॥ स्वरूपींपदत्रयहेंउल्हासे ॥ तेणेंचिप्र त्ययसमरसे ॥ स्वरूपप्रत्ययस्वरूपीं ॥ ४३ ॥ एवंसच्चिदानंदपदमिसें ॥ स्वरूपींस्वरूपचिसम रसे ॥ येथेंशब्दाचिलिहीपुसे ॥ सिद्धचिमौना ॥ ४४ ॥ ह्मणोनिदाऊनिद्रष्टयाद्रष्टा ॥ तिन्हींपदें मौनाचियावाटा ॥ लागलीनिजनिष्ठा ॥ स्वरूपाचिया ॥ ४५ ॥ अर्थीचिअर्थुभेटला ॥ शब्दुअश ब्दत्वेंउडाला ॥ येचिअर्थींपुढिला ॥ ओवियाअसती ॥ ४६ ॥

जेंजेंबोलिजेतेंतेंनव्हे ॥ होयतेंतंवनबोलावें ॥ साउलीवरीन मववे ॥ मवितेंजैसें ॥ २६ ॥ मगआपलियाकडे ॥ मवितया सांपडे ॥ तैंलाजहिलाजोआखुडें ॥ मवितेंजैसें ॥ २७ ॥

शब्दाअर्धीजेंआहे ॥ जेणेंशब्दत्वलाहे ॥ तेंकेवींहोऊनिराहे ॥ शब्दाचाविषय ॥ ४७ ॥ आतां जैंस्वरूपज्ञान ॥ तेथेंशब्दुचिनिमालासंपूर्ण ॥ ह्मणोनिशब्दनव्हेकारण ॥ प्रत्ययासी ॥ ४८ ॥ जरीशब्दुप्रत्ययासीसाधी ॥ तरीसाचनव्हेप्रत्ययासिद्धी ॥ स्वरूपप्रत्ययींअधीं ॥ बुडावाशब्दु ४९ शब्दाचेनिअनुमानें ॥ स्वरूपज्ञानजालेंह्मणणें ॥ जेवींसाउलीवरीमवणें ॥ स्वशरीरातें ॥ १५० ॥ साउलीवरीमवणेंघडे ॥ तैंसाउलीचिपैंनातुडे ॥ असतुचिभ्रंशींपडे ॥ आपेआपु ॥ ५१ ॥ मग स्मरणींचिजालेंविस्मरण ॥ साउलीचिनव्हेप्रमाण ॥ लाजेसीजाण ॥ लाजजाली ॥ ५२ ॥ आप लीसोयसांडिली ॥ तैंलाजहीपैंअंतरली ॥ लाजजेणेंधरली ॥ तोअंतरेकाह्या ॥ ५३ ॥ धरूनि साउलीचेंअनुमान ॥ नव्हेआपआपणाप्रमाण ॥ स्वतःसिद्धअसोन ॥ आपणस्वयें ॥ ५४ ॥ ते वींमानूनिशब्दप्रमाण ॥ जहालेंजैंतत्वज्ञान ॥ तोप्रत्ययचिजाण ॥ असंबद्ध ॥ ५५ ॥ ॥ आशंका ॥ जरी[illegible]त्ययाच्याठायीं ॥ शब्दप्रमाणनाहीं ॥ तरीमहावाक्यकाई ॥ अप्रमाण ॥ ५६ ॥ जरीमहावाक्यअसंबंध ॥ तरीगुरूवचनेंकैंचाबोध ॥ ऐसाजरीतर्कवाद ॥ कीजैलकोण्हीं ॥५७॥ तरीप्रत्ययाचीखूण ॥ महावाक्यचिस्वरूपपूर्ण ॥ येथशब्दींशब्दपण ॥ असेनापैं ॥ ५८ ॥ घटप टादिवादु ॥ तेथेंघटुचिनव्हेशब्दु ॥ जेथेंप्रमेयपरिच्छेदु ॥ वर्ततअसे ॥ ५९ ॥ यालागींअर्थेश ब्दाह्ननिभिन्न ॥ तरीशब्दींअसेशब्दपण ॥ महावाक्यतंवजाण ॥ ऐसेंनव्हे ॥ १६० ॥ महावाक्या चाअर्थ ॥ तेंमहावाक्यचिसमर्थ ॥ यालागींयेथ ॥ शब्दत्वनघडे ॥ ६१ ॥ महावाक्यहेंवचन ॥ गुरूच्याठायींमूर्तपण ॥ भाविजेतरीजाण ॥ अनुभवुकैंचा ॥ ६२ ॥ शब्दसारूनिबोलुजोजाण ॥ तेथेंकैंचेंबोलिकेपण ॥ हेअनुभवाचीखूण ॥ अनुभवामृतीं ॥ ६३ ॥ मागेंएकओवीअसे ॥ जेंप्रमे यपरिच्छेदेंप्रमाणनसे ॥ एवंस्वरूपप्रत्ययींकाइसें ॥ शब्दमात्रासीशब्दत्व ॥ ६४ ॥ तेथमहावा क्यहाशब्दु ॥ तर्कुचियेथेंअबद्धु ॥ असोआतांप्रबंधु ॥ प्रकरणार्थ ॥ ६५ ॥ आइतासच्चिदानंदु ॥ तेथेंप्रमाणनव्हेशब्दु ॥ प्रत्ययेंवीणअर्थवादु ॥ वाउगाहोय ॥ ६६ ॥ येऱ्हवींनसोनितिन्हीभाग ॥ सच्चिदानंदुचिअभंग ॥ उपचाराचालाग ॥ लागेनायेथें ॥ ६७ ॥ अधींत्रिविधभागमानिले ॥ मगयाचेंऐक्यदेखिलें ॥ ऐसेंनव्हेसंचलें ॥ आइतेंअसे ॥ ६८ ॥

सत्ताचिस्वभावें ॥ असत्तातंवनव्हे ॥ मासत्तात्वनसंभवे ॥
सत्तेसीकाई ॥ २८ ॥ आणिअचिद्[illegible]ें ॥ आलेंजेंचि
न्मात्रदरे ॥ आतांचिन्मात्रचिमाकैसें ॥ चिन्मात्रींये ॥ २९ ॥
निद्प्रबोधाच्याठाईं ॥ नसेतैसेंजागणेंही ॥ तेवींचिन्मात्र
[illegible]ई ॥ चिन्मात्रियें ॥ ३० ॥ ऐसेंययासुखपणें ॥ नाहीं
दुःखकीरहोणें ॥ मासुखहेंगणणें ॥ सुखासीकाई ॥ ३१ ॥

स्वभावेंसत्ताअसे ॥ तेंतंवकदानभ्रंशे ॥ परंतुहेतुसरिसें ॥ संभवणेंनघडे ॥ ६९ ॥ आइतास च्चिदानंद ॥ यासीतंवसर्वथानघडेबाध ॥ तरीशब्देंकेवींसिद्ध ॥ करावेंयासी ॥ १७० ॥ आतांअ चिन्मात्राचानाशदेखावा ॥ मगआणावेंचिन्मात्रभावा ॥ तरीचिन्मात्रींस्वयमेवा ॥ अचिन्मा त्रकैंचें ॥ ७१ ॥ आतांअचिन्मात्रजरीनाहीं ॥ तरीशब्देंकीजेकायी ॥ असोनिठायठाईं ॥ दशा हीन ॥ ७२ ॥ जेवींनिडारलेंप्रबोधीं ॥ निद्राचिअसावीअधीं ॥ मगजागृतीयेहीशब्दीं ॥ जागृ तीमिरवे ॥ ७३ ॥ तेवींचिन्मात्रजेंआइतें ॥ अचिन्मात्रकैंचेंतेथें ॥ ह्मणोनिचिन्मात्र[illegible]तें ॥ चि

न्मात्रनेघे ॥ ७४ ॥ तैसेंचिनसोनिदुःखसंबंधु ॥ स्वसुखेंचिसुखसिद्धु ॥ तेथेंसुखासीसुखहेद्वंद्वु ॥ कासयाअसे ॥ ७५ ॥ स्वरूपसुखरूपअनादिवंत ॥ तेंअसेगणनेरहित ॥ एवंसच्चिदानंदसंबंधा तीत ॥ नसोनिअसे ॥ ७६ ॥ स्वरूपमात्रचिअभंग ॥ येथेंशब्दींदिसतीतीनभाग ॥ तेचिवावयेर अव्यंग ॥ जैसेंतैसें ॥ ७७ ॥

ह्मणोनीसदसदत्वेंगेलें ॥ चिदचिदत्वेंमावळलें ॥ सुखासुखजालें ॥ कांहींनाकीं ॥ ३२ ॥

सदसदत्वाचेनिसदपणें ॥ शब्दशब्दत्वेंउरोंनेणें ॥ आतांसंदेहेंकोणें ॥ सदत्वाआणावें ॥७८॥ ह्मणोनीसदसदत्वेंनसे ॥ बोलिलातेंहेंऐसें ॥ तेवींचिन्मात्रत्वींनसें ॥ चिदत्वेंचिद् ॥ ७९ ॥ चिन्मात्राचेनिपूर्णपणें ॥ चिन्मात्रउमगावेंकोणें ॥ ह्मणोनिचिन्मात्रगणणें ॥ चिन्मात्रासी ॥१८० तैसेंचिसुखेंसुखत्वनेलें ॥ आतांकायबोलिजेबोलें ॥ दुःखेंवीणसंचलें ॥ आइतेंजें ॥ ८१ ॥ या सुखाचेंगणिजेस्वरूप ॥ तरीगणनाचीसुखरूप ॥ येथेंसहजचिलोप ॥ गणनेसीजाला ॥ ८२ ॥ किंवासत्तादिकांचेनिनित्यपणें ॥ असतादिभावउपजोंचिनेणें ॥ मगरूपासीचिनघडेयेणें ॥ सत्ता दिकां ॥ ८३ ॥ आतांक्रियाआणिउगेपण ॥ यादोहिंसीगाळून ॥ सुखासुखनसोन ॥ सुखरूप चिजें ॥ ८४ ॥

आतांद्वंद्वाचेलवंचक ॥ सांडूनिदुणीचेकंचुक ॥ सुखमात्रचि एक ॥ स्वयेंआथी ॥ ३३ ॥ वरीएकपणेंगणिजे ॥ तेंगणितेंन सीदुजें ॥ ह्मणोनिहेंहीगणिजे ॥ ऐसेंएक ॥ ३४ ॥

आतांसुखदुःखद्वंद्वनघडे ॥ मासुखकायसुखत्वेंवाढे ॥ यालागींदुणीनाद्वंद्वपाडे ॥ नव्हेजेंएक ॥ ८५ ॥ सुखरूपींदुःखहेंलवंचक ॥ हेंनाहींह्मणोनिसुखमात्रचिएक ॥ किंवादुणीचेकंचुक ॥ हेंही नाहीं ॥ ८६ ॥ ह्मणिजेलाधतांयासुखरूपासी ॥ वृद्धिनाहींज्यासुखासी ॥ पूर्वेआणिअपरतेसी ॥ देखिलेंनाहीं ॥ ८७ ॥ लाधतांयासुखाचीगोडी ॥ हरपलीवृद्धिक्षयाचीपरवडी ॥ कांजेकाळा चीसवडी ॥ नपडेयेथें ॥ ८८ ॥ तस्मात्सुखदुःखातीत ॥ वृद्धिक्षयाविरहित ॥ गणनाविवर्जित ॥ जेंकांहींअसे ॥ ८९ ॥ श्रुतिः ॥ नकर्मणालिप्यतेपापकेननवर्धतेनोकनियान् ॥ एवंएकपणजेंऐसें ॥ तेंगणावयाचेनिदोषें ॥ दुजेंकेंचेंअसे ॥ एकपणींइये ॥ १९० ॥ ह्मणोनियेथेंगणनेवीण ॥ एकचि असेएकपण ॥ एवंगणनायेथेंशून्य ॥ वांचूनिअसणेंचिअसे ॥ ९१ ॥

सुखआंतोनिनिघणें ॥ तेंसुखियेसुखेतेणें ॥ हेंसुखमा त्रचिमाकोणें ॥ अनुभवावें ॥ ३५ ॥

ज्यासुखासीसंभवआहे ॥ तेणेंसुखेंसुखीकोणहीहोये ॥ परंतुस्वतःसिद्धसुखमात्रींइयें ॥ संभ उचिनाहीं ॥ ९२ ॥ तेधर्मुधर्मित्वविहीन ॥ निखळसुखमात्रचिपूर्ण ॥ तेणेंसुखेंकरून ॥ सुखि याकवणु ॥ ९३ ॥ एकसुखियाएकसुख ॥ हेंद्वंद्वनाहींजेथेंदेख ॥ तयासुखाचेलेख ॥ करवी कवणें ॥ ९४ ॥ तयेसुखमात्रींअभंगे ॥ दिठीकोणाचीनलगे ॥ वाचाराहावयाजोगें ॥ नाहींजें सुख ॥ ९५ ॥ एवंग्राह्यग्राहकतेवीण ॥ सुखमात्रचिअभिन्न ॥ ह्मणोनियांसुखासीसुखपण ॥ नसोनिअसे ॥ ९६ ॥

जैंप्रकृतिडंकुअनुकरे ॥ तैंप्रकृतिडंकेअवतरे ॥ माडंकुचितैं
भरे ॥ कोणकोणा ॥ ३६ ॥ तैसेंआपुलेनिसुखपणें ॥ नाहींज
यासुखावणें ॥ आणिनाहींहेंहीजेणें ॥ नेणिजेसुखें ॥ ३७ ॥

डंकुसंबंधींनादु ॥ तोप्रकृतिडंकुऐसाशब्दु ॥ याडंकाचासंबंधु ॥ प्रकृतीसीघडे ॥ ९७ ॥ मग डंकाचेघोषगति ॥ अवतरोंलागेप्रकृति ॥ मागुतीतेडंकुनिवृत्ति ॥ निवांतराहे ॥ ९८ ॥ मगते प्रकृतीचेनिअभावें ॥ डंकुतोअडंकुनव्हे ॥ परीअवतरणेंचिनसंभवे ॥ कोण्हासीतेथें ॥ ९९ ॥ तैसें[illegible]पूर्ण ॥ तेणेंसुखीहोईलपैंकोण ॥ परीसुखआपुलेंसुखपण ॥ नसंडीकधीं २०० सुखाचेनिसद्भावें ॥ सुखींसुखत्वनसंभवे ॥ परीआपणचिअभिभवे ॥ हेंतंवनघडे ॥ १ ॥ हेंएक लेंदिसे[illegible]चक ॥ परीसच्चिन्मात्रहेंचिएक ॥ शब्दाचेंकंचुक ॥ फिटोनिआहे ॥ २ ॥ सुखासु खद्वंद्वनाहीं ॥ एकलेंसुखचिअसेपाहीं ॥ आतांऐशियेठायीं ॥ अभावकैंचा ॥ ३ ॥ सुखासुखद्वंद्व नाहीं ॥ एकलेंसुखचिअसेपाहीं ॥ सुखसुखातेंही ॥ सुखजेणें ॥ ४ ॥

अ[illegible]पाहतांमुख ॥ स्वयेंसन्मुखनाविन्मुख ॥
तेवींनसोनिसुखासुख ॥ सुखचिजें ॥ ३८ ॥

आरिसानपाहतां ॥ नघडेमुखाचीसन्मुखता ॥ तरीकायविमुखता ॥ मुखाचीमुखा ॥ ५ ॥ स्वतासन्[illegible]ख ॥ तरीअभावानयेचिमुख ॥ तेवींनसोनिसुखासुख ॥ सुखमात्रजें ॥ ६ ॥ येथेंनसतांहेतूदर्पण ॥ नबिंबेआपणयाआपण ॥ तरीसुखचिनाहींजैंजाण ॥ घडेलकायी ॥ ७ ॥ यासुखमात्रसंधीअसावा ॥ मगसुखत्वेंआणावेंभावा ॥ नित्यानंदस्वभावा ॥ भावनानरिघे ॥ ८ ॥ आतांस्वतःसिद्धासिद्धांतकीजे ॥ मगसुखहेंरूपाआणिजे ॥ ऐसेंनाहींसहजें ॥ आपण चिअसे ॥ ९ ॥

सर्व[illegible]चियाउजरिया ॥ सांडूनियांनिदसुरिया ॥
आपलियाह ताचोरिया ॥ आपणचिजो ॥ ३९ ॥

स्वरूपींपूर्वपक्षचिनाहीं ॥ तेथेंसिद्धांतायेईलकायी ॥ आतांसिद्धांतेंपाडिजेठायीं ॥ तेंतंनव्हे ॥२१०॥ स्वरूपजेंआपुलें ॥ तेंउपपत्तीनेंसिद्धकेलें ॥ तरीउपपत्तीसीप्रकाशिलें ॥ कवणेंपाहें॥११ आतांजरीउपपत्तिसिद्धकेलें ॥ तऱ्हींस्वरूपतंवहोयआपुलें ॥ हेंनचुकेपरीजालें ॥ निदसुरिया ऐसें ॥ १२ ॥ सिद्धअसोनिअन्यथाजाला ॥ मगआपआपणाभेटला ॥ तेव्हांविसरुनव्हेसंचला ॥ नाआठउहीनव्हे ॥ १३ ॥ निद्राजेजागृती ॥ तेनिदसुरेऐसेंह्मणती ॥ तेवींआपणासीसिद्धांतीं ॥ साधोनघ्यावें ॥ १४ ॥ मुळींअन्यथानाहींजाला ॥ ह्मणोनिविसरुविसरींबुडाला ॥ मगआठउ निमाला ॥ आठवामाजीं ॥ १५ ॥ तेथेंजोजोसिद्धांतकीजे ॥ तोनिदसुराऐसेंजाणिजे ॥ स्वरूप सिद्धांताआणिजे ॥ ऐसेंनाहीं ॥ १६ ॥ आपल्याठायींआपण ॥ असेआपणयाचोरून ॥ आतांते थेंकायशून्य ॥ ह्मणोयेपां ॥ १७ ॥ स्वताचिजेंकींसिद्ध ॥ तयाकायद्योतीलशब्द ॥ निखळसच्चि दानंद ॥ नसोनिअसे ॥१८॥ आपलेंआपणग्रहण ॥ नकरितांअसेजैंजाण ॥ ह्मणिजेहेतूविहीन ॥ चोरिलेंअसे ॥ १९ ॥ नलगतांहेतूचाहात ॥ स्वयेंचिअसेजोसिद्धांत ॥ तेचिअसतांहातेंहात ॥ चोरलेदेखा ॥२२०॥ तेंकैसेंहेंघेवोंजातां ॥ जंवसिद्धांतचिराहेरिता ॥ आणिअस्तिक्यतेसीतंवअ न्यथा ॥ होऊंनसके ॥ २१ ॥ ह्मणोनिचोरूनिचिआहे ॥ तेंयेणेंअभिप्रायें ॥ परंतुअभावासीनये ॥

नसोनिचिअसे ॥ २२ ॥ तेचिअसोनियांनसती ॥ कैसीपांअसेरीति ॥ पुढेंइयाउपपत्ति ॥ बोलिलाअसे ॥ २३ ॥

नलवितांऊंस ॥ तोजैसेनिअसेरस ॥ तेर्थींचामिष्टांश ॥ तोचिजाणे ॥ ४० ॥ कांनसज्जितांवीणा ॥ तोंनादजोआबोलणा ॥ तयातेणेंचिजाणा ॥ होआवेंलागे ॥ ४१ ॥ नानापुष्पांचियाउदरा ॥ नयेतांपुष्पसारा ॥ आपणचिभवरा ॥ होआवेंपडे ॥ ४२ ॥ नानानरंधितांरससोये ॥ तेगोडीकैसीपांआहे ॥ हेंपहाणेंतेंनोहे ॥ आणीकाजोगें ॥ ४३ ॥ तैसेसुखपणायेवों ॥ लाजेआपुलेंसुखपावों ॥ तेंआणीकाचाखोसुवों ॥ येईलकायी ॥ ४४ ॥

ऊंसनसतांरसुअसे ॥ तेचिगोडीउंसींप्रवेशे ॥ परीउंसाचेनिनसे ॥ रसपणरसीं ॥ २४ ॥ तो रसपणेंवीणरसु ॥ त्याचातोचिचाखेमिष्टांशु ॥ तेवींग्राह्यग्राहकतेवीणचिद्रसु ॥ नसोनिअसे२५ किंवाअनादिजोअसेनादु ॥ जेणेंवीणाउमटेशब्दु ॥ तोजरीनव्हेविशदु ॥ श्रोत्रांसीविषय॥२६॥ तोवीणाजरीनवाजे ॥ तऱ्हींआपआपणासीगाजे ॥ तेथीलश्रोत्रहोइजे ॥ तयाचेंतेणें ॥ २७ ॥ आपआपणासीजाणु ॥ तोनादुपैंविचक्षणु ॥ अभावासीहीग्रासुनु ॥ राहिलाअसे ॥ २८ ॥ परिमळु जोपुष्पसार ॥ जोनसतांपुष्पअसार ॥ जेणेंद्योतिलैंनिपरिकर ॥ बहकेपुष्प ॥ २९ ॥ जेथेंपुष्प आहेनाहीं ॥ हेवार्तानसेकांहीं ॥ तेथिंचाभ्रमरूपाहीं ॥ तोचिहोये ॥२३०॥ ह्मणिजेभोग्यभोक्ता तोचित्याचा ॥ संबंधुनसेआणीकाचा ॥ एवंत्याआमोदाचा ॥ अभावनघडे ॥ ३१ ॥ पुष्पसंबंधीअसतां ॥ तरीपुष्पनाशेतोननाशता ॥ एवंपुष्पेंवीणआइता ॥ स्वताचिअसे ॥ ३२ ॥ तेवींचि रसुजोअधीं ॥ जेणेंपाकासीयेस्वादसिद्धि ॥ तोतयातेंनरंधी ॥ परीस्वादींनचुके ॥ ३३ ॥ तोपदार्थेनाशेंनासता ॥ तरीदुसरेपदार्थीकोठूनअसता ॥ ह्मणूनिरूपेंवीणआयितां ॥ असतुचि असे ॥ ३४ ॥ त्याचीतोदेतसेगोडी ॥ परीघेणेंनघेणेंदेशधडी ॥ तेवींनसोनिपरवडी ॥ सुखमात्रजें ॥ ३५ ॥ जेंसुखपणाअधींअसें ॥ जेणेंसुखऐसेंप्रकाशे ॥ जेथेंसुखासुखपणनसे ॥ माभोगिजेकोणें ॥ ३६ ॥ एवंकरणियावीण ॥ जेंएकलेंचिन्मात्रपूर्ण ॥ तेंचाखावेंध्यावेंकवणेंजाण ॥ तें चितेंह्मणोनी ॥ ३७ ॥ तस्मातूरूपारूपविहीन ॥ चिन्मात्रस्वरूपपूर्ण ॥ शब्दासीहीसारून ॥ नसोनिअसे ॥ ३८ ॥

दिहाचियादुपारीं ॥ चांदुजैसाअंबरीं ॥ तेंअसणेंचांदाचिवरी ॥ जाणावेंकीं ॥ ४५ ॥

दिवसादोंप्रहरां ॥ आकाशींचंद्रमाखरा ॥ परीदेखावानेत्रद्वारा ॥ ऐसानव्हे ॥ ३९ ॥ तेंचंद्राचेंआस्तिक्यपण ॥ चंद्रचिअसेजाण ॥ जऱ्हींनदेखतीनयन ॥ जनाचेतया ॥ २४० ॥ तेवींवस्तु वांचूनिकांहीं ॥ असणयाउरीनाहीं ॥ आतांकोणापडेठायीं ॥ असणेंतेथींचें ॥ ४१ ॥ तऱ्हींसुखमात्रजेंआहे ॥ तेंतंवनाहींनव्हे ॥ नघेतांचिसोये ॥ असेजेंपैं ॥ ४२ ॥ स्वप्रकाशेंप्रकाशमान ॥ तेथेंअनुद्योतिलकवण ॥ विषयविषयीविहीन ॥ स्वतांचिजेंअसे ॥ ४३ ॥ तेंकैसेंअसे ॥ तेंमागुतें

सांगतुसे ॥ अनुभवाचेनिपैसें ॥ जाणोनिघ्यावें ॥ ४४ ॥ घेणयादेणयावीण ॥ अनुभविजेऐसी खूण ॥ हेंअसोआतांनिरूपण ॥ अवधारिजोजी ॥ ४५ ॥

रूपनाहींतैंलावण्य ॥ अंगनुठीतैंतारुण्य ॥ क्रियानफुटेतैं पुण्य ॥ कैसेंअसे ॥ ४६ ॥ जैंमनाचाअंकुरनुपजे ॥ तेथिलेंनि मकरध्वजें ॥ तोचिह्नमाजे ॥ तरीचिघडे ॥ ४७ ॥ कांवाद्य विशेषाचीसृष्टि ॥ जैंजन्मनेघेदृष्टि ॥ तैंनादुऐसीगोष्टी ॥ नादाचिजोगी ॥ ४८ ॥ नानाकाष्ठांचियाविटाळा ॥ वोस रलियाहीअनळा ॥ लागणेंकेवळा ॥ अंगासीचि ॥ ४९ ॥ दर्पणाचेनिनियमें ॥ वीणचिमुखप्रेमें ॥ आणितीतेचिवर्में ॥ वर्मतीयेणें ॥ ५० ॥ नपेरितांपीकजोडे ॥ तेमुडाचिआहेरो कडें ॥ ऐसियासोईउघडे ॥ बोलणेंहें ॥ ५१ ॥ एवंविशेषसा मान्य ॥ दोहींजाहलेंचैतन्य ॥ तेंभोगिजेअनन्य ॥ तेणेंसी सदा ॥ ५२ ॥

रूपाअधींलावण्य ॥ जेणेंलावण्यरूपशोभायमान ॥ तेंरूपेंवीणआपण ॥ आपणपेंअसे ॥४६॥ किंवाशरीराअधींतारुण्य ॥ तरुणकाळींतरुणजेणेंकरून ॥ जेवींवर्षाकाळपावतांजाण ॥ मेघ वृष्टि ॥ ४७ ॥ तेणेंशरीरअसतांनसतां ॥ त्याचीत्यासीचतरुणता ॥ शरीरभाववृथा ॥ त्याच्या ठायीं ॥ ४८ ॥ अथवाकेलेंनिधर्माचरण ॥ फळासीनेतसेजेंपुण्य ॥ तेंधर्मोपार्जितनव्हेजाण ॥ अधींचिअसे ॥ ४९ ॥ आपेंआपपुण्यवंत ॥ याअर्थासीजेंनढळत ॥ क्रियाकरणेंतेथें ॥ आगमा पायीं ॥२५०॥ किंवामदनुजोजाण ॥ जेणेंमदेंउन्मत्तपण ॥ आतांमनजैंविकारहीन ॥ तैंहीअसे जो ॥ ५१ ॥ तोआपुलेनिअंगबळें ॥ मन्मथहेंतंवनटळे ॥ कीजेलकायमनमेळे ॥ उन्मत्तत्यासी ॥५२॥ किंवावाद्याचेनिअभावें ॥ पाहेंनादाअंगींनादुआहे ॥ वाद्याचेनिनव्हे ॥ वाजणाजो ॥५३॥ तऱ्हींवाद्याचेनिवाजणादिसे ॥ परंतुवाद्यत्वाचेनिवाजतअसे ॥ आणिवाद्यनसतांअभावनसे ॥ नादपणासीत्याचे ॥५४॥ किंवाकाष्ठस्पर्शजैंनाहीं ॥ तैंअग्निचिनसेलकायी ॥ तोआपुल्याठायीं ॥ अग्नित्वेंचिअसे ॥ ५५ ॥ परीआपुलेउष्णत्वेंकरून ॥ संततनव्हेतोजाण ॥ हेंचिनाहींवांचून ॥ जैसातैसा ॥ ५६ ॥ किंवानशिवतांदर्पण ॥ मुखप्रेमाअसेभोगेंवीण ॥ भोग्यभोक्तृत्वविहीन ॥ मुखप्रेमाअसे ॥ ५७ ॥ दर्पणाचेनिमिसें ॥ तोचिप्रेमास्पष्टहोतसे ॥ तऱ्हींदर्पणकारणनसे ॥ मुखप्रेमेसीं ॥ ५८ ॥ हेंवर्महाताचढे ॥ तैंदर्पणजालाचिकारणनघडे ॥ ऐसियेनिसुरवाडे ॥ बोलिलाअसे ॥ ५९ ॥ दर्पणव्याजेंमुखजालें ॥ हेंतंवअवघेंयेथेंक्रमलें ॥ तेंप्रेमअसेसंचलें ॥ दर्पणाअधीं ॥२६०॥ जऱ्हींदर्पणमिसेंजालें ॥ तऱ्हींदर्पणव्याजक्रमलें ॥ जेव्हांवर्मसांपडलें ॥ संचलेंपणाचें ॥ ६१ ॥ मुखप्रेमेसीप्रसवलें ॥ कींप्रेमेसीमुखआवडलें ॥ हेंवर्मजैंजाणितलें ॥ तैंप्रेमेसीप्रेमा ॥ ६२ ॥ किंवापेरणीवीण ॥ पीकपिकलेंचिअसेआपण ॥ तेंजरीपाहिजेजाण ॥ तरीमुडाचिअसे ॥ ६३ ॥ जेंजेंपेरणीअधींचिअसे ॥ पेरणीजेणेंप्रकाशे ॥ पेरणीदोषें ॥ फळत्वानयेपैं ॥ ६४ ॥ एवंअसतेपणेंवीण ॥ असेचिन्मात्रैकघन ॥ येथेंदृष्टांतउपलक्षण ॥ मात्रकेलें ॥ ६५ ॥ येथेंदृष्टांत

हेमिस ॥ परीसंबंधेंवीणचिद्रस ॥ जेणेंसकळसंबंधास ॥ द्योतिलेंअसे ॥ ६६ ॥ तेंचिलावण्या चेंलावण्य ॥ तेंचितारुण्याचेंतारुण्य ॥ पुण्याचेंपुण्य ॥ अकृत्रिम ॥ ६७ ॥ तोचिरसाचारस ॥ नादींनादतोचिसुरस ॥ एवंजेणेंसकळास ॥ सकळपण ॥ ६८ ॥ श्रुतिः ॥ येनवापश्यतियेन वाशृणोति ॥ येनवागंधानाजिघ्रतियेनवाचंकरोतियेनवास्वादुविजानाति ॥ इत्यादि ॥ ॥ येन शब्दंरसंरूपंगंधंजानासिराघव ॥ तमात्मानंपरंब्रह्मजानीहिपरमेश्वरं ॥ ॥ एवंसकळांचेंअधि ष्ठान ॥ जेथूनिसकळासीसकळपण ॥ परीसकळनहोनिआपण ॥ सकळींअसे ॥ ७९ ॥ जेथेंस कळींसकळत्वनसे ॥ ऐसेंहीतेंचिअसे ॥ सकळसकळत्वेंदिसे ॥ तऱ्हींयेकुचिअंशु ॥ २७० ॥ ए कांशेनस्थितोजगत् ॥ इतिभगवद्वचनं ॥ एवंसंबंधेंवीण ॥ असेपूर्णचिद्धन ॥ विशेषआणिसामा न्य ॥ दोहींसीअगाध ॥ ७१ ॥ तयाचाभोगुत्यासीचिअसे ॥ तेथेंधर्मूधर्मित्वचिनसे ॥ परंतुस्व खरूपींनस्पर्शे ॥ विलोपुकधीं ॥ ७२ ॥ स्वविलासेंविलासमान ॥ परंतुनचुकेजेथिंचेंएकपण ॥ चिद्विलासपरिपूर्ण ॥ हेलावतअसे ॥ ७३ ॥ इंद्रियद्वाराक्रियाभान ॥ वर्ततांदिसेअनान ॥ परंतु तेंइंद्रियसंबंधेंवीण ॥ चिन्मात्रैक ॥ ७४ ॥ जेणेंरसाचेंस्वादन ॥ तेणेंचिगंधाचेंग्रहण ॥ रूपातें अवलोकितजाण ॥ एकिचिकळा ॥ ७५ ॥ तेंचिशब्दातेंशब्दवित ॥ तेथेंचिस्पर्शेहीउमटत ॥ एवं विभागेनपवत ॥ विभागांतें ॥७६॥ पावतांतेथिंचीखूण ॥ तेंसगळेंचिविरेहेंभान ॥ तेथेंशब्दुतो जाण ॥ किमात्मक ॥७७॥ नव्हेविषयनाविषयी ॥ शब्दुचिनसेजयेठायीं ॥ परंतुआपणयाकधीं ही ॥ लोपातेंनपवी ॥ ७८ ॥ येथेंसरलाशब्दुजाण ॥ तरीकांपडेलमौन ॥ वरीमौनासीहीमौन ॥ जाणपडतसेयेथ ॥ ७९ ॥ हाचिभावधरून ॥ अवधाराअग्रेंमूळवचन ॥ हेअनुभवाचीखूण ॥ अ नुभवेंघ्यावी ॥ २८० ॥

आतांयावरीजेंबोलणें ॥ तेंयेणेंचिबोलेंशहाणें ॥
जेंमौन चेंहीनिपटणें ॥ पिऊनिगेलें ॥ ५३ ॥

स्वरूपींबोलुचिनसे ॥ तरीहाचिबोलुकैंचादिसे ॥ हेंमानेलह्मणोनिऐसें ॥ बोलिलाअसे॥८१॥ आतांहेंजेंबोलणें ॥ तेंयेणेंचिबोलेंशहाणें ॥ ह्मणोनिप्रत्ययेंयाचेखूणें ॥ हरपेबोलु ॥ ८२ ॥ प्रत्य याचेपूर्णत्वेंजाण ॥ शब्दींचिनुरेशब्दपण ॥ तेथेंमौनआणिबोलकेपण ॥ दोन्हींहीनसती ॥ ८३ ॥ शब्दासीदेखोनिमौन ॥ तरीमौनींचिउठेशब्दपण ॥ तस्मात्अनुभवाचीखूण ॥ अनारिसीअसे ॥ ८४ ॥ मौनाचेंनिपटणेंजाण ॥ ह्मणिजेसरलेंजेथेंमौन ॥ तेंसरलेहीपण ॥ प्रत्ययींनुरे ॥ ८५ ॥ आतांप्रमाणेंकाजजाणावें ॥ प्रमेयत्वकोणेंघ्यावें ॥ पुढेंयाचिभावें ॥ बोलणेंअसे ॥ ८६ ॥

एवंप्रमाणेंअप्रमाण ॥ दृष्टांतींवाइलीआण ॥ प्रमेयकेलेंअप्र माण ॥ दिसावयाची ॥ ५४ ॥ अंगाचियाअनुपपत्ति ॥ आ टलियाउपपत्ति ॥ येथेंउठिलींपांथीं ॥ लक्षणांची ॥ ५५ ॥ उपायमागीलपाय ॥ घेऊनिजालेंवाय ॥ प्रतीतिसांडिली सोय ॥ प्रत्ययाची ॥ ५६ ॥ येथेंनिर्धारेंसीविचारू ॥ निमो निजालासारू ॥ स्वामीच्यासंकटींशूरू ॥ सुभटुजैसा ॥५७॥ नानानाशुसाधूनिआपुला ॥ बोधुबोधेलाजिला ॥ नुसुधे पणेंथोंटावला ॥ अनुभउजेथ ॥ ५८ ॥

नाहींजेथेंज्ञानाज्ञान ॥ दृश्यमात्रजेंदृष्टेपण ॥ तेथेंप्रमाणकरीकोण ॥ आणिप्रमेयतेंकाई ॥ ८७ ॥
येथेंजरीकरावेंप्रमाण ॥ तरीप्रमेयासीपडेशून्य ॥ आतांप्रमेयचिजरीपूर्ण ॥ तरीप्रमाणनुरे ॥८८॥
स्वरूपजेणेंजाणिजे ॥ तेंजाणणेंचिस्वरूपसहजें ॥ तरीप्रमाणासीदुजें ॥ प्रमेयकैंचें ॥ ८९ ॥ जरी
प्रमेयत्वनघडे ॥ तरीप्रमाणत्वसहजेंचिबहुडे ॥ आतांस्वरूपासांगडे ॥ स्वरूपचिअसे ॥ २९० ॥
ऐसेंप्रमेयप्रमाणातीत ॥ तेथेंदुजयाचानिःशेषनिःपात ॥ तेथेंद्यावादृष्टांत ॥ कोठूनिकोणा ॥९१॥
स्वताचिजेअनुपपत्ति ॥ तेथेंकैंच्याअसाव्याउपपत्ति ॥ सहजचितेंदृष्टांतीं ॥ साधणेंसरलें ॥९२॥
उपपत्तिह्मणिजेउपचार ॥ स्वरूपींनसेनिरंतर ॥ आतांवेगळीचिथार ॥ उपचाराकैंचि ॥ ९३ ॥
एवंस्वरूपींउपपत्तिनाहीं ॥ तरीनिपजाव्याकोणेंठाईं ॥ नाटिताचीपाहीं ॥ निमाल्याअसती
॥ ९४ ॥ केवळजेंचिन्मात्रपूर्ण ॥ तेथेंकायिसेंपैंलक्षण ॥ आणिअंगेंचिसिद्धजाण ॥ ह्मणोनिउ
पायाहानी ॥ ९५ ॥ स्वरूपउपायाचेंआद्य ॥ स्वताचिअसेजेंसिद्ध ॥ तेंउपायासीसाध्य ॥ होईल
कैसें ॥ ९६ ॥ त्यास्वमूळाससांडोन ॥ घेतलेंउपायींरान ॥ मगनिहाळितांनिजात्मखूण ॥ पर
तलेउपाय ॥ ९७ ॥ नानापरतलेकायी ॥ निमोनिचिगेलेंठायीं ॥ निखळप्रत्ययोचिप्रत्ययीं ॥ पुंजा
ळलापैं ॥ ९८ ॥ आतांस्वताचिजेप्रत्ययमात्र ॥ तेथेंकेउतेंप्रतीतिचित्र ॥ दुजेनवीणस्वतंत्र ॥
आपणचिअसे ॥ ९९ ॥ पहातांप्रत्ययाचीसोये ॥ प्रतीतिचिप्रत्ययोआहे ॥ ह्मणोनिपोटींरिघोनि
पाये ॥ राहिलीप्रतीति ॥ ३०० ॥ येथेंविचारुअसारजाला ॥ जैंविचारणामुकला ॥ तोविचारु
चिपरीबोला ॥ भागुनाहीं ॥ १ ॥ जेवींमहाशूरजोकोण्ही ॥ आपणवेंचोनिरणरंगणी ॥ आपणा
सीसुभटत्वआणी ॥ जनांमाजीं ॥ २ ॥ स्वामीच्यामृत्युसंकटीं ॥ आपणबैसोनिमृत्युपाठीं ॥
मगवाणिजेवोटी ॥ भलाभलाह्मणोनी ॥ ३ ॥ तेवींजेणेंविचारें ॥ अंगेंविचारुचिविरे ॥ नसोनि
सरलीअसारे ॥ सारपणेंज्याचें ॥ ४ ॥ मुळींअसारचिनाहीं ॥ यालागींसारणेंनलगेकांहीं ॥
ह्मणोनिविचारेवीणपाहीं ॥ विचारुसारू ॥ ५ ॥ अंगनभिरवीविचारु ॥ ह्मणोनिहाविचारुसारु ॥
मुरडलानिर्धारु ॥ निर्धार्येंवीण ॥ ६ ॥ तेवींचिबोधुनयेबोध्यदशे ॥ थितयाबोधपणासीचिरुसे ॥
आतांअनुभउमात्रचिअसे ॥ अनुभव्यहीन ॥ ७ ॥ ह्मणोनिअनुभउथोंटावला ॥ अंगेंअंगींचिभ
रला ॥ पूर्वापरतेचागेला ॥ पांगुआतां ॥ ८ ॥ स्वरूपमात्रींकायसांडावें ॥ मगसांडूनिकायमां
डावें ॥ येथेंसांडणेंमांडणेंचिनव्हे ॥ येरजैसेंतैसें ॥ ९ ॥ हेचिअनुभवाचीखूण ॥ अनुभवींनुरे
जालेपण ॥ पूर्वदशेतेंजाण ॥ देखिलेंनाहीं ॥ ३१० ॥ अपरअनुभाव्यकांहींएक ॥ तेंअनुभउचि
आपणअनुभाविक ॥ ऐसेंतंवयेथेंदेख ॥ उपजलेंनाहीं ॥ ११ ॥ एवंजडभागातेंसांडावें ॥ अजडा
नुभवेंअजडव्हावें ॥ हेंसांडीमांडीनसंभवे ॥ स्वरूपींइयें ॥ १२ ॥ येथेंजडभागसांडिजेकांहीं ॥
तरीअजडत्वासीभेटीचिनाहीं ॥ येविषयींपुढेंपाहीं ॥ बोलिलेंअसे ॥ १३ ॥

भिग[illegible] ॥ पदराचापुंजवेगळा ॥ करितांजैसा
निफळा ॥ अंगाचाहोय ॥ ५९ ॥ कांगजबजिलाउबा ॥ पांगु
रणेंकेळीचागाभा ॥ सांडीतेव्हेळींउभा ॥ कैंचाकीजे ॥६०॥
तैसेंअनुभाव्यअनुभाविक ॥ इहींदोहींअनुभूतिक ॥ तेंगेलि
याकैंचेएक ॥ एकासीचि ॥ ६१ ॥

भिंगाचेंशुद्धत्वपहावया ॥ पदराकिजतीकाढूनियां ॥ मगभिंगासीअसावया ॥ ठावोचि
नाहीं ॥ १४ ॥ जंवजंवकाढावेपदर ॥ पुढेंपुढेंपदराचाचिथार ॥ मगकैंचेनिरोपचार ॥ उरेभिंग

॥ १५ ॥ मगपदरएकवटकीजेती ॥ तन्हींनचुकेपदराचीआकृती ॥ भिंगाचीएकात्मस्थिती ॥ पावणेंचिराहिलें ॥ १६ ॥ अथवाकर्दळीगर्भउबेजोन ॥ सांडीसालींचेंपांघरुण ॥ तरीव्यर्थपडिलें जिणेंजाण ॥ तयाचेंचि ॥ १७ ॥ थितेंएकत्वफेडिजे ॥ सालीअसाराह्मणोनिसांडिजे ॥ तरीसा लीचेनिव्याजें ॥ गर्भचिविघडे ॥ १८ ॥ मगसालीएकवटूनी ॥ गर्भसाधावाकैसेनी ॥ नतुटेसा लीचीवाणी ॥ माघेजेंकाई ॥ १९ ॥ तैसेंस्वरूपमात्रएक ॥ तेथेंयोजूनिअनुभाव्यअनुभूतिक ॥ मगकैंचेंअनुभवसुख ॥ पाविजैल ॥ ३२० ॥ स्वरूपएकलेंचिन्मात्रघन ॥ तेथजरीहेंवर्तेत्रिविध पण ॥ तरीस्वरूपानुभवाचीखूण ॥ लाधलीकैसी ॥ २१ ॥ हेतिन्हींएककीजेती ॥ हेंहीनव्हेअ नुभवरीति ॥ मुख्यअनुभवाचीअनुभवस्थिती ॥ वांचूनअसे ॥ २२ ॥ अनुभवींअसेअनुभव स्थिती ॥ तरीतिन्हींभागनकरितांचिहोती ॥ तेथेंअनुभवेंसीअनुभूती ॥ दुर्लभहोये ॥ २३ ॥ अ नुभाव्यत्वेंअनुभविजे ॥ तेंस्वरूपेंसीपडेदुजें ॥ जाणतजाणतनेणिजे ॥ जाणणयातें ॥ २४ ॥ येथज्ञस्यंज्ञुनचुकेकांहीं ॥ परंतुनेणनयाऐसेंपाहीं ॥ ह्मणोनिअनुभवासीनाहीं ॥ अनुभवपण॥२५॥

अनुभवहाठाववरी ॥ आपुलिचिअवसरी ॥
येथेंअक्षराचीहारी ॥ वाईलकायी ॥ ६२ ॥

ह्मणोनिअनुभउअनुभवपणें ॥ आपणचिजोनटोनेणें ॥ माअक्षरींकेवींसाधणें ॥ तयाअक्षरातें ॥ २६ ॥ स्वरूपस्थितीच्याठाईं ॥ अनुभवींअनुभवलेंऐसेंनाहीं ॥ तेथेंअक्षराचींपाहीं ॥ कायि सीमातु ॥ २७ ॥ ह्मणिजेसत्यानंदज्ञान ॥ तेथेंशब्दासीठायींचेंचिशून्य ॥ अनुभवींनाहींअनु भवपण ॥ तेथहाकैंचा ॥ २८ ॥ जयाक्षरणेंचितंवनाहीं ॥ माअक्षरींरचैलकाई ॥ ह्मणोनिइये ठायीं ॥ नसरेशब्दु ॥ २९ ॥ जेथेंपरेचाउगउनाहीं ॥ तेथेंवैखरीवदेलकाई ॥ ह्मणोनियेवि षयीं ॥ पुढेंहीबोले ॥ ३३० ॥

कापरेसीपडेमिठी ॥ तेथेंनादसळुनुठी ॥
मावावरीजैलहोठी ॥ हेंकेंआहे ॥ ६३ ॥

पराजेथउगउनेघे ॥ ह्मणिजेजाणणेंजाणिवेनरिघे ॥ मगनादुहीकोणेंबागे ॥ ध्वनीतेंधरी ॥ ३१॥ जेथेंध्वनिनाहींउगवला ॥ तेथेंवचनाचामागुमोडला ॥ अंगेंआइतासाधला ॥ असेजोअर्थु ॥३२॥ घृतमंथनींप्रवर्तला ॥ तोमथुलाचिव्यर्थपडला ॥ तेवींस्वतःसिद्धस्वरूपबोला ॥ नव्हेचिमागु ॥ ३३ ॥ स्वतःसिद्धासाधन ॥ उपजलेंनाहींजाण ॥ ह्मणोनिबोलिकेपण ॥ उपेगानयेचि ॥ ३४ ॥

चेइलियाहीपाठीं ॥ चेवणयाचागोठी ॥ किंधालाबैसेपाठीं ॥
रंधनाच्या ॥ ६४ ॥ उदैजलियादिवसपती ॥ तेकींदिवेसेजे
येती ॥ वांचूनिपिकल्यासेतीं ॥ सुजतातीनांगरकाई ॥६५॥

जागतयाजागवण ॥ व्यर्थजैसीपडलीजाण ॥ किंवाधालेंयावरीरंधन ॥ तेंहीव्यर्थ ॥ ३५ ॥ किंवासूर्योदयींदीपकेजैसे ॥ उजियेडुहोयनातमनासे ॥ शब्दासीजालेंतैसें ॥ स्वरूपींइयें ॥ ३६॥ किंवापिकल्याक्षेत्रींनांगर ॥ तोजैसाव्यर्थोपचार ॥ तेवींस्वरूपसाधनींअसार ॥ शब्दजाला॥३७॥ सिद्धचिस्वरूपस्थिती ॥ येथेंनाथिलीप्रपंचनिवृत्ति ॥ मानूनिसिद्धचिसाधनींसाधनवृत्ति ॥ आणूनियां ॥ ३८ ॥ बद्धमोक्षसाचकेलें ॥ पूर्वापरतेसीद्योतिलें ॥ मगहेंजन्हींनिवारिलें ॥ निवृ त्तिनपर्वे ॥ ३९ ॥ जेवींशुद्धासीलेपुकलिपजे ॥ मगशोधलेंऐसेंमानिजे ॥ तेथेंशोधकेंपणमिरविजे॥

व्यर्थजालें ॥ ३४० ॥ मोतींफोडूनिसांधादिधला ॥ तोआयासुचिव्यर्थगेला ॥ तेवींपूर्वपक्षेंसाधिला ॥ सिद्धांतव्यर्थ ॥ ४१ ॥ स्वरूपासीलाऊनिसाधन ॥ कीजेभोजनिरूपण ॥ शब्देंशब्दखंडण ॥ केलेंजऱ्हीं ॥ ४२ ॥ तरीशब्दाचीप्रवृत्ति ॥ येथेंकेलियाहीनव्हेंनिवृत्ती ॥ याभावाअंतर्वर्ती ॥ बंधमोक्ष ॥ ४३ ॥ एवंबंधमोक्षस्फुरती ॥ तंववरीशब्दप्रवृत्ति ॥ येऱ्हवींनिखळसंविती ॥ नव्हेंशब्दविषय ॥ ४४ ॥ एवंशब्दाचेंकाजनाहीं ॥ हेचिपाडावयाठायीं ॥ पुढेंयेचिप्रवाहीं ॥ बोलतुअसे ॥ ४५ ॥

ह्मणोनिबंधमोक्षाचेंव्याज ॥ नाहींनिमालेंकाज ॥
आतांनिरूपणभोज ॥ वोळगेजऱ्हीं ॥ ६६ ॥

नजोडतांअनुभवखूण ॥ शब्दींभोजनिरूपण ॥ ह्मणिजेनिःशेषप्रपंचनिरसून ॥ प्रतिपादिजे वस्तु ॥ ४६ ॥ वाङ्मनसावधकरून ॥ प्रतिपादिजेअतिनिर्वाण ॥ अतिप्रत्ययाचेंजालेपण ॥ अंगासीआलें ॥ ४७ ॥ तेणेंप्रत्ययेमोक्षजाला ॥ बंधुहोतातोसारिला ॥ हाभावअसेभरला ॥ निरूपणींतिये ॥ ४८ ॥ एवंजंववरीबंधमोक्षव्याज ॥ तंववरीशब्दाचेंकाज ॥ येऱ्हवींस्वरूपींसहज ॥ शब्दुचिनसे ॥ ४९ ॥ एवंवेद्यवेदकपण ॥ हेंचिशब्दाचेंरूपजाण ॥ जऱ्हींभोजनिरूपण ॥ कीजत असे ॥ ३५० ॥ यालागींबंधआणिमोक्षता ॥ पूर्वआणिअपरता ॥ आठवतांकाविसरतां ॥ सार्थक्यशब्दु ॥ ५१ ॥ ययावांचूनिकांहीं ॥ शब्दाचियेप्रवाहीं ॥ आणीककाजनाहीं ॥ जाणावेंकीं ॥ ५२ ॥

आणिपुढीलाकाआपणापें ॥ वस्तुविसराचेनिहातें[illegible] ॥
मगशब्देंचिघेपें ॥ आठऊनियां ॥ ६७ ॥ येतुलीयाहीपरौतें ॥
चांगावेंनाहींशब्दातें ॥ जऱ्हींस्मारकेपणेंकीर्तितें ॥ मिरवीहाजगीं ॥ ६८ ॥

आपआपणियाविसरिजे ॥ तैंपुढिलाहीअर्थुनसुजें ॥ मगआठवेघेइजे ॥ साधूनियां ॥ ५३ ॥ आपणआपल्याचुकिजे ॥ मगइतस्तताधाविजे ॥ तैंपुढीलयागतिनेणिजे ॥ स्वस्थतेचि ॥ ५४ ॥ आपआपणाजाणावें ॥ हेंविसरेनेलेंअघवें ॥ धर्मांतराचेहावें ॥ भरलाअसे ॥ ५५ ॥ मगस्मरणें होयेसिद्धि ॥ तेथेंशब्दाचीप्रसिद्धी ॥ आतांस्वरूपेंतंवविसरुकधीं ॥ देखिलाचिनाहीं ॥ ५६ ॥ ॥ श्रुतिः ॥ नहिद्रष्टुर्दृष्टेर्विपरिलोपोविद्यतेअविनाशित्वात् ॥ स्मृतिरपि ॥ अजोनित्यःशाश्वतोयंपुराणो० ॥ ॥एवंदेशकाळाद्यनवच्छिन्न ॥ आत्मानित्यज्ञानघन ॥ तेथेंविसराचीखूण ॥ कैसीअसेल ॥ ५७ ॥ आतांयेथेंविसरुनाहीं ॥ तरीआठवावेंतेकायी ॥ एवंस्वरूपाच्याठायीं ॥ शब्दुनसरे ॥५८॥ एवंआठवानामशब्दु ॥ विसराचाहीयेथेंचिसंबंधु ॥ ह्मणोनिआठवींविसरींप्रसिद्धु ॥ जालासेबोलु ॥ ५९ ॥ ययापरौतेंकांहीं ॥ शब्दाचेंकाजनाहीं ॥ जऱ्हींस्मारकत्वेंपाहीं ॥ कीर्तिमंतुशब्दु ॥ ३६० ॥ आतांआठवाविसरापरौतें ॥ नित्यचिन्मात्रआइतें ॥ येथेंयाशब्दातें ॥ उगउचिनाहीं ॥ ६१ ॥ एवंयेथेंप्रकणार्थु ॥ सिद्धसच्चिदानंदसततु ॥ तेथेंजोत्रिधाहेतु ॥ शब्देंकेला ॥ ६२ ॥ असताचाउगउनाहीं ॥ ह्मणोनिसतासीसतत्त्वनसेपाहीं ॥ आतांजेंसतत्त्वकांहीं ॥ तेसंबंधेंवीण ॥ ६३ ॥ आतांजेसंबंधेंवीण ॥ तेप्रकाशरूपचिजाण ॥ प्रकाशह्मणालकोण ॥ तरीआनंदरूप ॥ ६४ ॥ एवंसच्चिदानंदाहानीनाहीं ॥ परीस्वरूपमात्रचिपाहीं ॥ येथेंत्रिपदत्वाचातव

कांहीं ॥ भावचिनसे ॥ ६५ ॥ येथभागतेशब्दें केले ॥ तरीशब्दत्वचियेथेंनाथिलें ॥ चिन्मात्रसं चलें ॥ जैसेंतैसें ॥ ६६ ॥ ऐसेनिप्रत्ययेवीण ॥ शब्दींघडलेंशब्दपण ॥ तेणेंशब्दें जेकीर्तिजाण ॥ ते अप्रयोजक ॥ ६७ ॥ हेअनुभवामृतींचीखूण ॥ तेअनुभवामृतींलाधेजाण ॥ पूर्णासीचिपूर्ण ॥ प्राप्तहोये ॥ ६८ ॥ श्रुतिः ॥ ब्रह्मैवसन्ब्रह्माप्नोति ॥ ब्रह्मविदाप्नोतिपरं इति ॥ एवंब्रह्मरूपेंअनुभवा मृतीं ॥ ब्रह्मासीब्रह्मप्राप्ति ॥ ऐसेंनहेसमाप्ति ॥ पावलेंप्रकरण ॥ ६९ ॥ परंतुआरंभुनायेथही ॥ तेथेंसमाप्तितेकाई ॥ ह्मणोनिसंपवितांही ॥ नसंपेचि ॥ ३७० ॥ ह्मणोनिप्रांतेंवीणप्रांतुजाला ॥ प्रसंगेंअवरुकेला ॥ तोनाहींदेखिला ॥ अनुभवेंयेणें ॥ ७१ ॥ जेवींघृतींकणिकासंधी ॥ तोघृ तासीनकरीअवधी ॥ तेवींप्रकाणिंहाचिन्मयाब्धि ॥ अवसाननपवे ॥ ७२ ॥ पुंजाळलेंज्ञानींज्ञान ॥ तेंचिज्ञानेश्वरऐसीखूण ॥ तद्रूपहाचिजाण ॥ अनुभवामृत ॥ ७३ ॥ ययाअमृतींजोस्वाद ॥ तो चिस्वयंनित्यानंद ॥ जेणेंहाविशद ॥ विवरिलाप्रसंगु ॥ ७४ ॥ विवरतांनयेविवरणपंथा ॥ सि द्धार्थनव्हेचिअन्यथा ॥ ह्मणोनिकल्याणचिआतां ॥ शिवरूपसदा ॥ ७५ ॥ आतांयेथूनिप्रसंगआ णीक ॥ शब्दासीकरूनिरूपक ॥ रूपकरूनिनिरर्थक ॥ दाविजैल ॥ ७६ ॥ तेनित्यानंदकृपाजीव न ॥ कीजैलग्रंथार्थविवरण ॥ जेथेंनित्यानंदआपण ॥ अतुडेनिका ॥ ७७ ॥ असोआतांबहुकथा ॥ नित्यानंदचरणींमाथा ॥ ठेऊनिपुढेंपाहातां ॥ देखिजैलजें ॥ ७८ ॥ तेंनित्यानंदेंकरून ॥ कीजैल कांहींविवरण ॥ दीजेश्रोताअवधान ॥ कृपादृष्टि ॥ ७९ ॥ तुमचाकृपाकीरणीं ॥ उत्फुलैलहृदयन लिनी ॥ आमोदाचीधणी ॥ सद्भावभ्रमरा ॥ ३८० ॥ इतिश्रीअनुभवामृतविवरणेसच्चिदानंदनि रूपणंनामपंचमप्रकरणंसमाप्तं ॥

प्रकरण षष्ठ.

ॐपरमात्मनेनमः ॥ जयजयजीप्रबोधतरणी ॥ सिवतलियांतुमचाकिरणीं ॥ दिवसुआणि रजनी ॥ दोन्हींहीगेलीं ॥ १ ॥ हृत्पद्मिणीपरागप्रसवली ॥ उकलतांसंकोचतांविसरली ॥ अनु भवचआमोददिवाळी ॥ सद्भावभ्रमरांतें ॥ २ ॥ काळहोवायाचामासला ॥ अवघामोडूनिगेला ॥ ब्रह्मांडाहीपैलाडिला ॥ प्रकाशिलेंतुवां ॥ ३ ॥ निद्राआणिजागेपण ॥ हेंअसोंचिविसरलींजाण ॥ प्रकाश्यप्रकाशतागिळोन ॥ सुदिनुचिकेला ॥ ४ ॥ महातेजपुंजाळलें ॥ शीताउष्णातेंग्रासिलें ॥ ऐसेंकांहींपाहिलें ॥ जेथेंअस्तुचिनाहीं ॥ ५ ॥ अथवाउदयाचीहीखूण ॥ तेहीगेलीहरपोन ॥ ऐसेंतवकृपासुदीन ॥ लाधलेंनिजाले ॥ ६ ॥ प्रभूतुझेंनित्यानंदनाम ॥ हेंअनामाचेंधाम ॥ पातलें निसुवर्म ॥ उदयोजाला ॥ ७ ॥ तेंउदयतेजपुंजाळलें ॥ तेणेंचिमीमाझेंतमपुसलें ॥ तेजत्वतेजही गेलें ॥ तुजमाजींदेवा ॥ ८ ॥ एवंमीतूंपणवेगळें ॥ प्रगटलेंजेंतेजागळें ॥ तयात्वत्तेजेंधवळिलें ॥ तेजोमयासी ॥ ९ ॥ तयाश्रीगुरुप्रभाकरा ॥ पूर्णआनंदसागरा ॥ तुझीहेलावाहेअवधारा ॥ विन वणीमाझी ॥ १० ॥ तुझीयाअनुभवाचीखूण ॥ तेंहेंअनुभवामृतपूर्ण ॥ तुवांचिनिगदिलेंजाण ॥ ज्ञानेश्वररूपें ॥ ११ ॥ तेंमाझ्याहृदयींविसावलें ॥ विसावोनिउद्गारलें ॥ उद्गारोनिलागलें ॥ तुझीयेसोई ॥ १२ ॥ तेंहीतुजमाजींसांठवलें ॥ तेथूनिप्रत्ययमेघेंपोसिलें ॥ वि[illegible]षलें ॥ माझीयाकृपा ॥ १३ ॥ तेंनावेकसुरसकरावें ॥ जैसेंप्राप्तजनींस्वीकारावें ॥ आरोचकहीफेडावें ॥ अनुतापियांचें ॥ १४ ॥ असोइतरांचीकासयाकथा ॥ प्रस्तुतमाझियाफावेवाक्पंथा ॥ ऐसीकी जेजीआतां ॥ करुणाकांहीं ॥ १५ ॥ मजविनवावयाचीयोग्यता ॥ जऱ्हींनाहींजीताता ॥ तऱ्हीं मियाबाळकेंआतां ॥ कवणावोळगावें ॥ १६ ॥ तूंबापुआणिआमुचीमाये ॥ निपटूनिनेणेंआनु

ठाये ॥ यालागींसलगीकरूंलाहें ॥ योग्यतेवीण ॥ १७ ॥ असोआतांहेबहुकथा ॥ मियांतुझिया पाईंमाथा ॥ ठेवणेंयाह्ननिआतां ॥ आनुनेणें ॥ १८ ॥ यामाझियाबोबड्याबोला ॥ श्रीनित्या नंदतोषला ॥ संतोषोनिराहिला ॥ हृदयवोवरां ॥ १९ ॥ तेथेंवाइलीम्यांसुमनोमाळा ॥ तेणें प्रभूमाझाउचिताआला ॥ महाप्रसादलाधला ॥ तोदावीनसज्जनां ॥ २० ॥ ह्मणोनिसज्जनांच्या चरणीं ॥ माथाठेऊनिविनवणी ॥ जीअवधानाचीधणी ॥ द्यावीमज ॥ २१ ॥ तुमचेंजेंअवधान जीवन ॥ तेणेंमाझावाग्दीपुदीप्यमान ॥ ह्मणोनिसाष्टांगींलोटांगण ॥ अवधानार्थ ॥ २२ ॥ यापरी सज्जनींदयाकेली ॥ अवधानवृष्टिमोकलिली ॥ तेमाझियावाक्पंथाआली ॥ विवरणसरिता ॥ २३ ॥ जेवींहिमालईप्रकटदेखिलें ॥ परीविष्णुपादोदकचिहेंपहिलें ॥ पूर्वापरतेवीणआलें ॥ जगींतेंचि ॥ २४ ॥ तेवींमाझ्यावाक्पंथींहेंदेखिलें ॥ परीनित्यानंदींचिहेंसंचलें ॥ पूर्वापरतेवीण आलें ॥ संतसन्निधाना ॥ २५ ॥ यालागींआपुलेचिह्मणोनि ॥ संतस्वीकारितीप्रियकरूनि ॥ येथेंमाझीविनवणी ॥ मुरडोनिठेली ॥ २६ ॥ आतांअनुभवामृतींचीखूण ॥ लाधलाशिवक ल्याण ॥ नित्यानंदआपण ॥ वाखाणीतुसे ॥ २७ ॥ मागिलेप्रसंगेंकरून ॥ केलेंसच्चिदानंदक थन ॥ आत्माशब्दातीतपूर्ण ॥ त्रिपदारहित ॥ २८ ॥ सत्चित्आनंदभेदें ॥ रूपींनाहींततत्पदें॥ भेदतोशब्दसंबंधें ॥ ऐसेंकेलें ॥ २९ ॥ शब्दींदिसतीजडाजडभाग ॥ स्वरूपींतोंनाहींलाग ॥ एकलीअव्यंग ॥ चिन्मात्रवस्तु ॥ ३० ॥ येथसत्ताआणिप्रकाशता ॥ तेवींचिदुःखाहीवार्ता ॥ नाहींह्मणोनिस्वभावता ॥ सच्चिदानंदु ॥ ३१ ॥ हेहीवेदींचीखूण ॥ असदादिकेंनसतीनिपटून॥ यालागींस्वभावस्फुरण ॥ वेदवाणी ॥ ३२ ॥ वेदनमात्रवेदु ॥ आत्मासच्चिदानंदु ॥ येथेंशब्दीं देखिलाभेदु ॥ तोचिनघडे ॥ ३३ ॥ स्वरूपींस्वरूपहेंस्फुरण ॥ हाचिशब्दाचाठावुजाण ॥ येथें वेद्यवेदकपण ॥ नावेकजालें ॥ ३४ ॥ येथेंदेखिलाविक्षेप ॥ हेंचिआठवाविसराचेंस्वरूप ॥ शब्दाचेंहीरूप ॥ येथेंचिजाणा ॥ ३५ ॥ तस्मात्विक्षेपाच्याठाईं ॥ शब्दाचीअसेनवाई ॥ ह्मणिजे स्वरूपानुभवनाहीं ॥ तैंसार्थक्यशब्दु ॥ ३६ ॥ आतांशब्दप्रसक्तपण ॥ करूनिकीजेखंडण ॥ जेश्रीज्ञानेश्वरोदितखूण ॥ अनुभवामृतीं ॥ ३७ ॥ तेणेंप्रसंगेंकरून ॥ अविद्येचेंखंडण ॥ आत्मा संबंधहीन ॥ निरोपिजेल ॥ ३८ ॥ प्रस्तुतशब्दाचाउपयोग ॥ सांगतुसेउक्तिअव्यंग ॥ तेंअवधा रावेंसुभग ॥ श्रोतेजनींहो ॥ ३९ ॥

बापुउपेगीवस्तुशब्दु ॥ जियाधरासधरनादु ॥
अमूर्ताचाविशदु ॥ आरिसानव्हें ॥ १ ॥

नादुअसेनिर्विवादु ॥ मगशब्देंकीजेसविवादु ॥ मगश्रवणासीविशदु ॥ विषयेहोये ॥ ४० ॥ जैंशब्दुहेतुनाहीं ॥ तैंनादुकैंचाकाई ॥ तोजन्हींआपुल्याठाईं ॥ नादत्वेंअसे ॥ ४१ ॥ येशब्दभूमि केवरी ॥ नादुनादत्वातेंधरी ॥ मगतेणेंनादेंवैखरी ॥ वांजटहोये ॥४२॥ एवंशब्ददर्पणपाहातां ॥ ह्मणिजेस्वरूपेंस्वरूपहेतुधरितां ॥ अमूर्तचिमूर्तपंथा ॥ येवोनिठाके ॥ ४३ ॥ अव्यक्तजालेंव्यक्त मंत ॥ हाशब्दींचाचिसिद्धांत ॥ वांचूनिअव्यक्तव्यक्तअतीत ॥ स्वरूपमात्रअसे ॥ ४४ ॥ एवंश ब्ददर्पणपाहातां ॥ आत्माअमूर्तचिहोत्साता ॥ नाथिलीमूर्तता ॥ देखोंलागे ॥ ४५ ॥ ह्मणोनिअ मूर्तीमूर्तपण ॥ येथशब्दचिहोयकारण ॥ पुढेंआणीकवचन ॥ इयेचिविषईं ॥ ४६ ॥

पाहा[illegible] आरिसांपाहें ॥ येथेंकांहींचिन[illegible]व्हें ॥
परीदर्पणेंयेणेंहोये ॥ नपाहातेंपाहातें ॥ २ ॥

इतरेंजेंदर्पणें ॥ तेथेंपाहातेनिकरावेंअवलोकन ॥ परीयेणेंशब्ददर्पणेंजाण ॥ नपाहातेंचिपाहातें ॥ ४७ ॥ दृश्यद्रष्टृत्वेंवीण ॥ आत्मादृङ्मात्रद्रष्टाजाण ॥ एवंदृश[illegible]ण ॥ नपाहाणाचिपाहाणा ॥ ४८ ॥ ह्मणोनिऐसाहीनपाहाणा ॥ तोशब्ददर्पणेंकीजेपहाणा ॥ पाहातांचिजाणा ॥ दृश्यद्रष्टृत्वेंउठे ॥ ४९ ॥ दृश्येंवीणदेखणाआहे ॥ त्याचेंदृश्यतोचिहोये ॥ मगआपणासीपाहे ॥ देखतेपणें ॥ ५० ॥ एवंद्रष्टृत्वींदृश्यभान ॥ तेंशब्दमात्रजाण ॥ अन्यथाकैंचेंदृश्यपण ॥ दृश्यासीअसे ॥ ५१ ॥ मुळींचीस्वसंवेद्यखूण ॥ दृश्यद्रष्टाहीआपण ॥ येथजोभेदुजाण ॥ तोशब्दबडिवार ५२ याचिविषयींसविस्तर ॥ पुढेंहीशब्दबडिवार ॥ बोलतसेचतुर ॥ सिद्धशिरोमणी ॥ ५३ ॥

वडीलाअव्यक्ताचियावंशा ॥ उद्योतक रू[illegible] ॥
येणेंएकेगुणेंआकाशा ॥ अंबरत्व ॥ ३ ॥

मायेच्यावंशायेऊनी ॥ मायासत्यत्वेंह्मणोनी ॥ नाथिलीचिजनीं ॥ रूढीकेली ॥ ५४ ॥ आणिआकाशजेंनिरावेव ॥ तेंशब्दमात्रेंचिसावेव ॥ अन्यथागगनाठाव ॥ कैंचाहोता ॥ ५५ ॥ मायाहेंजाणोंजावें ॥ तरीमायाचिनसेस्वभावें ॥ आतांवाउगेंचिमिरवावें ॥ हेशब्ददावी ॥ ५६ ॥ तैसीचिआकाशाचीवर्णव्यक्ति ॥ हेशब्दाचीचवदंती ॥ आकाशासीदाविती ॥ शब्दखूण ॥ ५७ ॥ येऱ्हवींशब्दप्रवृत्तीवीण ॥ पुसेआकाशाचीखूण ॥ तेवींचिन्मायेचेंहीजाण ॥ शब्दचिरूप ॥ ५८ ॥ आकाशाचाशब्दगुण ॥ परीशब्दुचित्याचीखूण ॥ अन्यथात्यावीण ॥ आकाशतेंकिमात्मक ॥ ५९ ॥

आपणतंवखपुष्प ॥ परीफळदेजगद्रूप ॥
शब्दमवीतैंअमूप ॥ कोणआहे ॥ ४ ॥

मुळींशब्दासीपाहातां ॥ शब्दपणेंचिहोयवृथा ॥ आणिनसतांठायींभाविता ॥ दाखवीजगद्रूप ॥ ६० ॥ शब्दाचाजरीअभाव ॥ तरीजगहेंकासयानांव ॥ आणिवास्तव्येंपाहातांवाव ॥ आपणचिअसे ॥ ६१ ॥ शब्दासीजेंशब्दपण ॥ तेंअर्थाचेनिघडतसेजाण ॥ तोअर्थुचिपरिपूर्ण ॥ कोंदलाअसे ॥ ६२ ॥ तियेवस्तूच्याठायीं ॥ शब्दासीठाउचिनाहीं ॥ ह्मणोनिखपुष्पपाहीं ॥ बोलिलेंअसे ॥ ६३ ॥ तियेवस्तुप्रत्ययेंवीण ॥ शब्दींठसावलेंशब्दपण ॥ मगशब्देंचिजाण ॥ प्रसवलीसृष्टि ॥ ६४ ॥ सूर्यरश्मीच्याठायींजाण ॥ जरीजालेंअसेजळभान ॥ तरीकल्लोळींसाचपण ॥ सहजचिअसे ॥ ६५ ॥ तेवींशुद्धवस्तूच्याठायीं ॥ शब्दासीठाउनाही ॥ आतांभाविलाचिपाहीं ॥ तरीशब्दसृष्टिसत्य ॥ ६६ ॥ एवंशब्दाचीसृष्टि ॥ वांचूनिनाहींआनगोठी ॥ मृत्तिकेत्येवसत्यमितिश्रुति ॥ हेठीकेलीअसे ॥ ६७ ॥ ॥ स्मृतिः ॥ अतःसर्वैविकाराश्चवाचाकेवलमास्तिकाः ॥ इतिसूतसंहितायां ॥ एवंजगहेंपूर्ण ॥ शब्दुचिजालाअसेआपण ॥ तोतात्पर्यार्थुजाण ॥ ओवीचाइये ॥ ६८ ॥ ह्मणोनिजेंजेंनाहीं ॥ तेंशब्देंचिपडेठायीं ॥ अमूपहीजेंकांहीं ॥ तेंशब्दुचिमवी ॥ ६९ ॥ चिद्विलासअपरिमित ॥ तोशब्देंचियेणेंमविजेत ॥ असंकेतींसंकेत ॥ शब्देंकेला ॥ ७० ॥ अमूपींअसेअमूपपण ॥ तरीशब्देंकेलेंप्रमाण ॥ अमूपहेंचिजाण ॥ कायप्रमाणनव्हे ॥ ७१ ॥ ह्मणोनिअमूपजऱ्हींजालें ॥ तऱ्हींशब्देंयेणेंमविलें ॥ निराकारींहीआणिलें ॥ आकारत्व ॥ ७२ ॥ शब्दींशब्दत्वराहे ॥ तरीनिराकारींचिआकारआहे ॥ वांचूनिआकाराचीसोये ॥ वेगळीकैंची ॥ ७३ ॥

विधिनिषेधाचियावाटा ॥ दाविताहाचिदिवटा ॥
बंधमोक्षकळिकाटा ॥ शिष्टुहाचि ॥ ५ ॥

विधिविधित्वेंनदिसे ॥ निषेधासहीरूपनसे ॥ हेनसतेंचिठायींवैसे ॥ शब्दाचेनि ॥ ७४ ॥ एकाचाजोविधि ॥ तोद्रुसऱ्यासीपडेनिषेधीं ॥ एवंविधिवर्तेनिषेधीं ॥ निषेधविधीं ॥ ७५ ॥ एकुचिजोविधि ॥ हाकाळविशेषअवधीं ॥ एवंविधितोनव्हेविधि ॥ निषेधुहीनिषेधुनव्हे ॥ ७६ ॥ करितांतैलाभ्यंगस्नान ॥ संन्यासियासीनिषेधुजाण ॥ तेचिनरकचतुर्दशींदूषण ॥ नव्हतांहोये ॥ ७७ ॥ किंवाअजामांसभक्षण ॥ तेणेंब्राह्मणातत्काळपतन ॥ तेंचिसेव्यजालेंजाण ॥ यागप्रसंगीं ॥ ७८ ॥ तस्मात्स्वरूपेंजेंनाहीं ॥ तेंशब्दुचिपाडीयाठायीं ॥ ह्मणोनिशब्दसमर्थपाहीं ॥ विधिनिषेधाध्यक्ष ॥ ७९ ॥ वचनेंचिहोयेप्रवृत्ति ॥ वचनमुळेंचिनिवृत्ति ॥ शिष्टांचीहीउक्ति ॥ ऐसीचिअसे ॥ ८० ॥ जियाधर्मीनाहींवचन ॥ तोधर्मुचिमानीलकवण ॥ एवंशब्दुचिप्रकाशीजाण ॥ विधिनिषेधासी ॥ ८१ ॥ आतांबंधआणिमोक्ष ॥ हाजेवींविरुद्धपक्ष ॥ तेथेंशिष्टुएकदक्ष ॥ शब्दमात्रचि ॥ ८२ ॥ बंधींमोक्षविरोधी ॥ मोक्षायाबंधस्पर्धी ॥ परीशब्देंयेणेंसंधी ॥ उभयांसीकेला ॥ ८३ ॥ बंधआणिमोक्ष ॥ शब्देंकेलेप्रत्यक्ष ॥ परीउभयांचापक्ष ॥ एकुचिअसे ॥ ८४ ॥ स्वरूपदोहींअतीत ॥ तेथमोक्षासीशब्दुउठवित ॥ त्यामोक्षामाजींहोत ॥ बंधासीठावो ॥ ८५ ॥ ह्मणोनिएकेचिउल्लेखेंपाहाहो ॥ केलाशब्देंउभयांसीठावो ॥ येऱ्हवींशब्देंवीणवावो ॥ तेदोन्ही ॥ ८६ ॥ शब्देंमोक्षसाधिला ॥ तोबंधनेंनाहींसांडिला ॥ एवंएकेशब्दींजडला ॥ उभयपक्ष ॥ ८७ ॥ मोक्षासीबंधकारण ॥ अन्यथामोक्षींकैंचेंमोक्षपण ॥ ह्मणोनिविरुद्धाचाशिष्टुजाण॥ शब्दुचिएकु ॥ ८८ ॥ अथवाबंधमोक्षातीत ॥ आत्माजोसतत ॥ तेथेंउठविलेंकल्पित ॥ विरोधीउभय ॥ ८९ ॥ ययांच्याभांडणीं ॥ शब्देंकेलीबुझावणी ॥ दोघांसीहीदोन्हीं ॥ स्थानेंनेमिलीं ॥९०॥ ज्ञानींआणिअज्ञानीं ॥ दोघांसीनेमिलींदोन्हीं ॥ वस्तुतातंवकडसणी ॥ दोहींचिमिथ्या ॥ ९१ ॥ येथेंज्ञानीमोक्षासीमिरवी ॥ अज्ञानाबंधकत्वचिदावी ॥ सेखींउभयतांपदवी ॥ एकिजाली॥९२॥

हाअविद्येचाअंगींपडे ॥ तैंनाथिलेंऐसेंरूढे ॥
नल्हायजेतीनकवडे ॥ साचवस्तु ॥ ६ ॥

स्वरूपींअविद्यानघडे ॥ तेअविद्याशब्देंघडे ॥ मगनाथिलेंचिरूढे ॥ अविद्याजनित ॥ ९३ ॥ अविद्यासदसद्विलक्षण ॥ अनास्तिक्यत्वइचेंलक्षण ॥ तेसत्यत्वाआणिलीजाण ॥ शब्देंयेणें॥९४॥ मगनाथिलेंजगींजगपण ॥ मानूनिअविद्याकेलीकारण ॥ वस्तूचेंसाचारज्ञान ॥ तरीअवघाचिमिथ्या ॥ ९५ ॥ नलाहेतिनकवडेह्मणिजेऐसे ॥ जयासीवस्तुद्रष्टयाकोण्हीचनपुसे ॥ तेसत्यत्वेंरूढविलेंऐसें ॥ शब्देंयेणें ॥ ९६ ॥

शुद्धशिवाच्याशरीरीं ॥ कुमारुचिहाजीउभरी ॥
जेवींअंगेंपंचाक्षरी ॥ तेवींचिबोलु ॥ ७ ॥

शिवाचेंहेंचिशुद्धपण ॥ जेंशिवेंअसिजेशिवपणेंवीण ॥ तेथआरोपोनिजीवत्वपण ॥ भोगवीशिवींशिवत्व ॥ ९७ ॥ जीउशिवाचाकुमरू ॥ परीशिवपणासीजालाआधारू ॥ जीवेंवांचूनिनिर्धारू ॥ शिवाचानघडे ॥ ९८ ॥ ह्मणोनिजीउशिवाच्याअंगीं ॥ भरूनिशिवत्वभोगी ॥ हेवस्तुतानघडेपरीजगीं ॥ शब्दप्रवृत्ति ॥ ९९ ॥ जीवाचेंशिवकारण ॥ तोजीउहोऊनिशिवाचेंजीवन ॥ शिवासीशिवपण ॥ मिरवलेंजगीं ॥ १०० ॥ हेतुरूपजोशब्दु ॥ तोसिद्धासीसाधूनिबाधु ॥ मगसिद्धांतबोधु ॥ प्रसवोंलागे ॥ १ ॥ जेवींअंगेंपंचाक्षरी ॥ भूतांचेंआवाहनकरी ॥ मगमंत्राचिये

कुसरी ॥ निवारीहीत्यातें ॥ २ ॥ तेवींचिहाशब्दु ॥ शुद्धिजीवाचासंबंधु ॥ करूनियांकरीबाधु ॥ आपणचित्याचा ॥ ३ ॥ शिवासीशिवपणनाहींघेणें ॥ परीचतुरेंशब्दें येणें ॥ जीवपणाचेनिगुणें ॥ भोगविलेंशिवत्व ॥ ४ ॥ एवंशब्दावेगळेंकांहीं ॥ शुद्धाशुद्धनाहीं ॥ पुढेंहीनवाई ॥ अवधारायाची ॥ ५ ॥

जीउदेहेंबांधला ॥ तोबोलेंएकेंसुटला ॥
आत्माबोलेंभेटला ॥ आपणयां ॥ ८ ॥

जेंशुद्धचैतन्य ॥ तेंजीवभावायेऊन ॥ होऊनिपरिच्छिन्न ॥ देहींवाटे ॥६॥ हेंशब्दाचेंचिकरणें ॥ वांचूनिदैन्यभोगिजेचैतन्यें ॥ तरीचैतन्यत्वकोणें ॥ दिधलेंयासी ॥ ७ ॥ जरीचैतन्यासीचैतन्यपण ॥ असेलऔपाधिकगुणें ॥ तरीआपलीखूणचुकोन ॥ वाटतेंदेही ॥ ८ ॥ मगशब्दविचार दावी ॥ देहेतादात्म्यसांडवी ॥ तरीवस्तुमात्रींहेठेवाठेवी ॥ असेनाकीं ॥ ९ ॥ उत्पत्तिविनाशा अतीत ॥ आत्मासर्वदाअखंडित ॥ तेथशब्दुचिहाकरित ॥ भागाभाग ॥ ११० ॥ ह्मणोनिजीवरूपेंदेहीवांटला ॥ मगसुटोनिआपणभेटला ॥ ऐसाअर्थुघडला ॥ बोलेंचिकरूनि ॥ ११ ॥ हेवेदोक्तीचीखूण ॥ जाणतीअनुभवीसुजाण ॥ पुढेंहीसमर्थपण ॥ शब्दाचेंआइका ॥ १२ ॥

दिवसातेंउगोंगेला ॥ तंवरात्रिचाद्रोहोआला ॥ ह्मणोनिसूर्योयाबोला ॥ उपमानव्हेचि ॥ ९ ॥ जेप्रवृत्तिआणिनिवृत्ति ॥
विरुद्धाइयाहातुधरिती ॥ मगशब्देंचिचालती ॥ एकलेंनि ॥ १० ॥

याशब्दाचेंमहिमान ॥ सूर्येंहीनपवेउपमेनें ॥ जेंदिवानिशिसमान ॥ पाळूंनेणे ॥ १३ ॥ दिवसाचीहोतांप्रवृत्ति ॥ रात्रिकींपावेनिवृत्ति ॥ उभयांसीअविरोधस्थिती ॥ वागऊंनेणें ॥ १४ ॥ शब्दींअसेहेयुक्ति ॥ नढळतांअविरोधवृत्ति ॥ प्रवृत्तिआणिनिवृत्ति ॥ एकसरेंवागवी ॥ १५ ॥ शाब्दिकजेनिवृत्ति ॥ तिचेचिअंगिंचीप्रवृत्ति ॥ आणिशब्देंकरिजेप्रवृत्ति ॥ जेथेंनिवृत्तित्वनढळे ॥ १६ ॥ शब्देंप्रवृत्तिजाली ॥ शब्देंचिनिवृत्तिद्योतिली ॥ एवंशब्देंचिदेखिली ॥ प्रवृत्तिनिवृत्ति ॥ १७ ॥ सूर्यअस्तेंरात्रिजाली ॥ परीसूर्येंनाहींदेखिली ॥ अस्तमानाचीआली ॥ कुटीलया ॥१८॥ शब्दुअस्तमानेंवीण ॥ करीप्रवृत्तिनिवृत्तिप्रतारण ॥ ह्मणोनिबोलासमान ॥ सूर्यहीनव्हे ॥ १९ ॥ अकर्तैजेंसंचलें ॥ तेंकरणीभागासशब्देंआलें ॥ परीअकर्तृत्वसांडवलें ॥ नाहींतेथें ॥ १२० ॥ संमतिः ॥ ॥ अभिन्नमेवभेदस्यासंभवादेववस्तुतः ॥ भेदाभेदसमारंभात्सुतरांनैवसिध्यति ॥ इतिब्रह्मगीतायां ॥ ॥ मुळींभेदाचाअसंभव ॥ ह्मणोनिअभेदगौरव ॥ वांचूनिभेदमोडूनिअभेदभाव ॥ वस्तुमात्रींनसे ॥ २१ ॥ यालागींभेदआणिअभेद ॥ शब्दींचिअसेद्विवाद ॥ वस्तुमात्रीं अबद्ध ॥ दृढआख्या ॥ २२ ॥ एवंभेदमूळप्रवृत्ति ॥ तरीभेदाचीचअसंभूती ॥ ह्मणोनिनमोडे निवृत्ति ॥ ठायींयेचिखूण ॥२३॥ किंवाएकुचिपदार्थु ॥ तोशब्देंनिषेधुपावतु ॥ मागुतावंदितु ॥ त्यासीचशब्दु ॥ २४ ॥ शूद्राचाजोधर्मु ॥ विप्राचाअधर्मु ॥ एकचिकर्मु ॥ द्विधर्मत्वपावे ॥२५॥ ह्मणोनिजियेकर्मींप्रवृत्ति ॥ तेचिकर्मींअसेनिवृत्ति ॥ एवंशब्दाचीयुक्ति ॥ आणीकांनटके ॥२६॥

साह्यआत्मविद्येचे ॥ करावयाआपणवेचे ॥
गोमटेंकायशब्दाचें ॥ एकैकवाणूं ॥ ११ ॥

आत्मापरोक्षमानूनि ॥ शब्दुमिरवेशब्दपणीं ॥ मगआपणचिवेचोनि ॥ आत्मत्वसाधी ॥२७॥

आत्मत्वींहोवावाहेतुशब्दु ॥ मगशब्दाठावपावेभेदु ॥ तोशब्दुसारूनिशुद्धु ॥ आत्मानिवडावा ॥ २८ ॥ शब्दींशब्दत्वकल्पून ॥ मगशब्दोदितजीवशिवपण ॥ सत्यमानिलेंजऱ्हींजाण ॥ सत्यत्वानये ॥ २९ ॥ ह्मणोनिभेदाचेंउपपादन ॥ शब्देंकेलेंजाण ॥ सेखींत्याशब्दासीखंडण ॥ आत्मत्वेंसाधावें ॥ १३० ॥ शब्दुनुरोनिआत्मस्थिती ॥ हेशब्दाचीचप्रवृत्ति ॥ आत्मत्वींमागुती ॥ ऐक्यत्वनचले ॥ ३१ ॥ जऱ्हींकीजेभेदनिरूपण ॥ तऱ्हींभेदाभेदनसतीजाण ॥ कींजेकारणाचि अनित्यतेथून ॥ कार्यचिनसंभवे ॥ ३२ ॥ एकमेवाद्वितीयंब्रह्म ॥ तेथेंभेदाभेदअनागम ॥ ह्मणोनिऐक्यत्वाचेंवर्म ॥ खंडलेंनाहीं ॥ ३३ ॥ तेथेंशब्दातेंनिवर्तऊन ॥ आत्मानुभवभोगिजेजाण ॥ हेंअतिशयेंकुशळपण ॥ शब्दाचेंचिइया ॥ ३४ ॥

किंबहुनाशब्दु ॥ स्मरणदानींप्रसिद्धु ॥
परीययाहीसंबंधु ॥ नाहींयेथें ॥ १२ ॥

एतावत्काळबोलिलें ॥ तेंशाब्दिकींचिपढिलें ॥ परीशब्दाचेंकेलें ॥ आत्मत्वींनसरे ॥ ३५ ॥ विसरलेंआठवावें ॥ तेथेंशब्दशिष्टत्वपावे ॥ परीअन्यथाचिजेंनव्हे ॥ तेथहाकैंचा ॥ ३६ ॥ विसरुनाहींपावला ॥ आठउहीतेथेंचिबुडाला ॥ ह्मणोनिआत्मत्वींबोला ॥ ठाउचिनाहीं ॥ ३७ ॥ शब्दब्रह्मजितुकेंजाण ॥ तितकीगुणत्रयाचीउभवण ॥ परीस्वरूपजेंनिर्गुण ॥ तेथेंहानमिरवे ॥ ३८ ॥ ॥ संमतिः ॥ ॥ त्रैगुण्यविषयावेदाइत्यादिभगवद्वचनं ॥ तथाचशब्दब्रह्मणिनिष्णातः ॥ इत्यादिभागवते ॥ ॥ एवंशब्दसंबंधेंवीण ॥ स्वतःसिद्धआत्मापूर्ण ॥ तोशब्दुभागनव्हेजाण ॥ ऐसाअर्थु ॥ ३९ ॥ शब्दप्रमाणेंवीण ॥ आत्मानुभवनघडेजाण ॥ ऐसेंह्मणालतरीशब्देंविहीन ॥ स्वसंवेद्यआत्मा ॥ १४० ॥

आत्माया बोलाचे ॥ कांहींचिउपयोगानवचे ॥
स्वसंवेद्याकोणाचें ॥ ओझेंआर्थी ॥ १३ ॥

आत्माअसेस्वतःसिद्ध ॥ परीशब्दामुळेंआत्मस्वाद ॥ हेंह्मणीह्मणास्वसंवेद्य ॥ आत्माचिस्वयें ॥ ४१ ॥ तोदुजेनवीण ॥ आपणआपलाजाण ॥ ज्ञेयज्ञातृत्वविहीन ॥ चिन्मात्रवस्तु ॥ ४२ ॥ आपलेंसुखआपण ॥ भोगीभोग्यभोक्तृत्वेंवीण ॥ येथेंशब्दाचेंकोण ॥ वाहीलवोझें ॥ ४३ ॥ जिव्हेआपुलास्वादु ॥ घ्यावयादुजासंबंधु ॥ नलगेतेवींशब्दु ॥ उपयोगीनव्हे ॥ ४४ ॥ आत्मत्वींआत्मस्वादु ॥ नघेतांचिअसेसिद्धु ॥ तोस्वादुचिपरमानंदु ॥ पूर्णात्मापैं ॥ ४५ ॥ आपलाआपणजाण ॥ तयाजाणताकरीकवण ॥ एवंआत्मास्वसंवेद्यआपण ॥ आपणाप्राप्त ॥४६॥ उक्तंच ॥ स्वयमेवात्मनात्मानंवेत्थत्वंपुरुषोत्तम ॥ इत्यादिभगवद्गीतायां ॥ तथाचब्रह्मैवसन्ब्रह्माप्नोति ॥ एवंशब्दब्रह्मादिकाचाउपरम ॥ होऊनिब्रह्मासीचप्राप्तब्रह्म ॥ येथप्राप्यप्रापकधर्म ॥ असेनाकीं ॥ ४७ ॥ तथाच ॥ मनःश्चक्षुरादेरगम्यस्वरूपंसनित्योपलब्धिस्वरूपोहमात्मा ॥ इतिहस्तामलके ॥ ॥ एवंनसोनिशब्दसंबंधु ॥ नित्यप्राप्तआत्मासिद्धु ॥ इयेचिमोहेरेंप्रबंधु ॥ पुढेंहीअसे ॥ ४८ ॥

आठवेंकांविसरें ॥ [illegible]निअवतरें ॥
त[illegible]वर[illegible]सीवस्तुदुसरें ॥ असेनाकीं ॥ १४ ॥

वस्तुवस्तूसीअप्राप्तनघडे ॥ तरीप्राप्तीहीतिथनसोडे ॥ विषयांचेरूपेंघडे ॥ प्राप्तीअप्राप्ती ॥४९॥

विषयेंद्रियसंयोग ॥ तेथप्राप्ताप्राप्तभाग ॥ एकलीवस्तुनिःसंग ॥ सर्वदापूर्ण ॥१५०॥ वस्तूसीदुसरीवस्तु ॥ किंप्रपंचाचासांगातु ॥ कींवस्तुत्वींचिस्वगतु ॥ भेदुअसतां ॥ ५१ ॥ तरीविषयीविषयपण ॥ सुखेंचिघडतेंजाण ॥ आतांभेदत्रयविहीन ॥ तेथेंहेंकैंचें ॥ ५२ ॥ एवंआपणासीआपण ॥ विषयोनव्हेपैंजाण ॥ यालागींस्मरणास्मरण ॥ नसेयेथ ॥ ५३ ॥ विसराचियेसोये ॥ स्मरणासीविषयोनव्हे ॥ तरीयेथेंद्रष्टृत्वानोहे ॥ आघातुकधीं ॥ ५४ ॥ शुद्धबुद्धनित्यमुक्तस्वभाव॥ दृङ्मात्रआत्माराव ॥ द्रष्टेपणाअभाव ॥ कदाहीनोहे ॥५५॥ परीजेंद्रष्टेपण ॥ तेंदृश्यसंबंधेंवीण॥ विसरुआणिआठवण ॥ दोहींसीनेणें ॥ ५६ ॥

आपणआपणातें ॥ आठवीविसरेकेउतें ॥
कायजीभजिभेतें ॥ चाखेनचाखे ॥ १५ ॥

वस्तुआपणयाआठवी ॥ तरीआवडचितेंअघवी ॥ ह्मणोनिमाथानुघवी ॥ आठउयेथें ॥ ५७ ॥ आतांविसराचीखूण ॥ तेंतोंमुळींचिनसेंजाण ॥ यालागींविसरेवीण ॥ आठवणहीठाके ॥ ५८ ॥ रसनेचारसु ॥ रसनाचिहेजाणिजेसु ॥ ह्मणोनिचाखावयाचासोसु ॥ नसेतयाचातियेसी॥५९॥ तरीआपुलियेचवीचीखूण ॥ नेणेंकायजिव्हाजाण ॥ ह्मणोनिचाखणियांनचाखणियावीण ॥ जिव्हाजेवीं ॥ १६० ॥ तेवींद्रष्टेपणेंवीण ॥ असेद्रष्टेंचिएकलेंजाण ॥ आतांस्मरणास्मरण ॥ यालागीं नाहीं ॥ ६१ ॥ येविषयींदृष्टांत ॥ पुरस्करपुढेंबोलत ॥ जेथेंशब्दाचेंविरत ॥ शब्दपण ॥ ६२ ॥

जागणायानिद्नाहीं ॥ मांजागणेंघडेकाई ॥
स्मरणास्मरणेंदोन्हींही ॥ स्वरूपींतैसीं ॥ १६ ॥

उद्बोधाच्याठायीं ॥ निदसाचचिनाहीं ॥ परीजागणेपणतेंही ॥ जागृतासीनघडे ॥ ६३ ॥ निद्रेचियासंधीसीचुकला ॥ तोजागेपणाहीमुकला ॥ जागाचिपरीबोला ॥ नव्हेचिठाऊ ॥ ६४ ॥ तेवींस्मरणेंविस्मरणेंवीण ॥ स्वरूपानसाहेशब्दप्रमाण ॥ मुळींशब्दासीचिजाण ॥ उगउनाहीं६५

सूर्योरात्रिपा[illegible] ॥ मांदिवोकायजाणें ॥
तेवींस्मरणास्मरणें ॥ वीणआपणवस्तु ॥ १७ ॥

मुख्यसूर्योच्यानगरीं ॥ नेणिजेदिवसनाशार्वरी ॥ उदयअस्ताचीवारी ॥ नाहींह्मणोनि ॥६६॥ तेवींउदयअस्तेंवीण ॥ सनातनद्रष्टेंसंधिहीन ॥ तेथेंशब्दाचामाथाजाण ॥ उघवैलकासया॥६७॥ ह्मणोनिशब्दाचेंप्रयोजन ॥ वस्तुत्वींनसेजाण ॥ हेंचिधरूनिअनुसंधान ॥ पुढेंओवी ॥ ६८ ॥

एवंस्मरणास्मरणनाहीं ॥ तरीस्मारकेंकाजकायी ॥
ह्मणोनिइयेठायीं ॥ बोलुनसरे ॥ १८ ॥

॥ ३ ॥ श्रुतिः ॥ तमेवभांतमनुभातिसर्वंतस्यभासासर्वमिदंविभाति ॥ इति ॥ तथाच ॥ नित्यो
नित्यानांचेतनश्चेतनानांएकोबहूनांयोविदधातिकामानिति ॥ ॥ स्मृतिरपि ॥ वेदाहंसमतीता
निवर्तमानानिचार्जुन ॥ भविष्याणिचभूतानिमांतुवेदनकश्चन ॥१॥ इतिभगवद्वचनं ॥ ॥ भूतभ
विष्यवर्तमान ॥ रचलेंआहेभूतभान ॥ यासमस्तासीमीचएकजाण ॥ वांचूनतेनेणतीसर्वथा
॥ ४ ॥ एवंजेंजेंकांहींभासमान ॥ मिळोनजाणतेंएकचिजाण ॥ ऐसेंस्वरूपनेण ॥ ह्मणावेंकसें
॥ ५ ॥ जेवींरसाचेंरसपण ॥ जिव्हेनेंठायींठेविलेंजाण ॥ तेजिव्हाकायरसहीन ॥ ह्मणोंयेपाहा
॥ ६ ॥ तेरसमात्राचिदेखें ॥ ह्मणोनिआपआपणानचाखे ॥ तऱ्हींनचाखोंनचाखे ॥ उपाधिर
हित ॥ ७ ॥ तेवींआत्मानिखळज्ञानघन ॥ तेणेंआपणाआपण ॥ जाणावेंचनलगेजाण ॥ इतु
काअर्थ ॥ ८ ॥ जरीतोआपलाआपणनेणे ॥ तरीहेंचिजाणतसेकोण ॥ तस्मात्अवच्छेदहीन ॥
जाणताचस्वयें ॥ ९ ॥ ज्याचेजाणीवेसपाहीं ॥ काळाचावारालागलानाहीं ॥ ह्मणोनभेदलागेल
कांहीं ॥ ऐसेंनव्हे ॥६१०॥ जोआत्मानित्यबुद्ध ॥ नाहींकाळगतिअवच्छेद ॥ ह्मणोनिवेद्यवेदकभेद ॥
असेनाकीं ॥ ११ ॥ ह्मणोननजाणतचजाण ॥ हेंचिउमटिलेंतेथेंखूण ॥ तेथेंतंवनवेज्ञान ॥ उठलें
नाहीं ॥१२॥ ज्ञानेंजाणिजेज्ञान ॥ तेथूनउठिलेंतेंचजाण ॥ हेअनुभवाचीखूण ॥ नव्हेवप्रगनाकीजे
ऐसी ॥ १३ ॥ असोऐसाआत्मासच्चिदानंदु ॥ जेथेंनसेतर्कांचाभेदु ॥ तोतेणेंचअसेसिद्धु ॥ काय
देशब्दतयाचेंतया ॥ १४ ॥ नेणणेंआणिजाणणें ॥ हेंजयाचेनजाणतपणें ॥ त्यासीनाहींह्मणणें ॥
घडेकाई ॥१५॥ तरीशून्यवादतर्क ॥ निमालायेथेंनिष्टंक ॥ सच्चिदानंदस्वाभाविक ॥ आत्माअसे
॥१६॥ तेंत्रिभेदलक्षणें ॥ जाणिजेत्रिवाचकपणें ॥ ऐसियाअनुमानें ॥ नाहींजोकीं ॥ १७ ॥ जोअ
नुमानाचाद्योतक ॥ नव्हेजोआनुमानिक ॥ तोशब्दासीकेवींदेख ॥ विषयहोय ॥ १८ ॥ शब्दाची
नुमगेसोय ॥ आणिलेवीणजोआहे ॥ तोजाणोनिजाणोंये ॥ ऐसाकैंचा ॥ १९ ॥ जोजाणणें:त्र
आहे ॥ त्यासीजाणणेंनव्हेउपाये ॥ ह्मणोनिउपायनवाहे ॥ जेथीलवाट ॥६२०॥ किंवातोचित

यासप्राप्त ॥ हेंअवघेंअसंमत ॥ मांशब्दकेवींशोभत ॥ प्राप्तिमिसें ॥ २१ ॥ हेंबोलिलेंदिसेलशब्दीं ॥ परीहेंआहेबोलाअर्धीं ॥ ह्मणोनियेथेंत्रिशुद्धि ॥ शब्दनमिरवे ॥ २२ ॥ स्मृतिः ॥ शब्दगोचरतया स्थितःसदाशब्दगोचरविहीनरूपतः॥ यत्स्थितंतदहमेवसंततःप्रत्ययोपिमतिरेवमेवहि ॥ १ ॥ इतिब्र ह्मगीतायां ॥ ॥ जेंजेंशब्दासीअगोचरपाहीं ॥ तेथेंदिसेशब्दगोचरताही ॥ एवंगोचरअगोचर कांहीं ॥ आत्माचअसे ॥२३॥ ह्मणोनिशब्दासीद्योतकतानघडे ॥ किंवास्वतानसेप्राप्तिचेंकुवाडें ॥ आपलेनिसुरवाडे ॥ सर्वदाअसे ॥ २४ ॥

कोण्हाहीप्रमाणाचेनिहातें ॥ वस्तुघेनानेघेआपणयातें ॥
जेंस्वयेंआयितें ॥ घेणेंनानघेणें ॥ ९३ ॥

आपुलेजाणीवेआपणजाणोंये ॥ तरीजाणीवतंवअधींचआहे ॥ अंगतेंकायनव्हे ॥ आपलेंरूप ॥ २५ ॥ एवंजर्‍हींजाणितलें ॥ तर्‍हींआपणावरीकल्लोळें ॥ परीजाणीवेनजाणितलें ॥ ऐसेंनव्हे ॥ २६ ॥ एवंप्रमाणेंजेणेंद्योतिलीं ॥ तेवस्तुप्रमाणींनिर्धारिली ॥ हेंअवघीबोली ॥ वल्गनमात्र ॥ २७ ॥ घेणेंनानघेणें ॥ ऐसेंजेंआपलेंअसणें ॥ तेंकेवींशब्देंयेणें ॥ सद्भावाआणिजेल ॥ २८ ॥

ह्मणोनिआत्माआत्मलाभें ॥ नांदऊनिशब्दशोभे ॥
येइलऐसानलभे ॥ उमसुघेवों ॥ ९४ ॥

ह्मणोनआत्मानित्यप्राप्त ॥ तोआपणाआपणप्राप्तहोत ॥ हेंअवघेंअसंमत ॥ वोडवलेंयेथें॥२९॥ तेथेंआत्माआत्मत्वलाधला ॥ ह्मणोनिशब्दसार्थकजाला ॥ कांजेअविद्यानाशकेला ॥ शब्देंह्म णोनि ॥६३०॥ तरीनसतीअविद्याशब्देंभाविली ॥ तेशब्देंयेणेंखंडिली ॥ जेवींनिर्धनाच्यामनोरथा जाली ॥ आथीनाथी ॥ ३१ ॥ ह्मणोनिनसतेअविद्येसीनाशिलें ॥ हेंअवघेंनिरर्थकजालें ॥ मां आत्मयासीदाविलें ॥ येणेंकेवीं ॥ ३२ ॥ अहोआत्मयाचेंपूर्णपणीं ॥ नाहींशब्दाचीमिरवणी ॥ तेथेंस्वरूपप्राप्तीचीआयिनी ॥ पुरवीलहाकेवीं ॥३३॥ ॥ उक्तंच ॥ यमग्न्युष्णवन्नित्यबोधस्वरूपं मनश्चक्षुरादीन्यबोधात्मकानि ॥ प्रवर्ततआश्रित्यनिष्कंपमेकंसनित्योपलब्धिस्वरूपोहमात्मा ॥ इतिहस्तामलके ॥ हेंजेंमनश्चक्षुरादिकें ॥ स्वताअसतीअबोधात्मकें ॥ बोधरूपएकनिकें ॥ आत्म स्वरूप ॥ ३४ ॥ तेंकोण्हेंसंबंधेंवीण ॥ आपेंआपबोधपूर्ण ॥ जेवींउष्णत्वाचिजाण ॥ अग्निचेंरूप ॥३५॥ यालागींउपचारेंवीणउपलब्ध ॥ ह्मणोनिबोलिलानित्योपलब्ध ॥ मनचक्षुरादिकेंमुग्ध ॥ स्वताअसती ॥ ३६ ॥ तेंनावेकयाचाआश्रयोपावोनि ॥ क्षणेकयाचीप्रवृत्तिदिसतसेजनीं ॥ तयाआत्मयाचेनि ॥ निर्धारवेकेवीं ॥ ३७ ॥ ह्मणोनिआत्मानित्यबुद्ध ॥ येथेंउमसुचिनेघेशब्द ॥ यालागींदृष्टांतेंसीमहासिद्ध ॥ पुढेंहीबोलतसे ॥ ३८ ॥

एवंमाध्यान्हींचिदिवीं ॥ तमधाडीनादिवोदावी ॥
तैसीउभयतापदवी ॥ शब्दाजाली ॥ ९५ ॥

अविद्यानसेआपण ॥ सिद्धआत्मासाधिलेवीण ॥ येथेंशब्देंकायजाण ॥ केलेंपाहा ॥ ३९ ॥ जेवींमाध्यान्हकाळींअग्नि ॥ उजळिजेजरीदीपकोण्ही ॥ तेव्हडीतयाचीकरणी ॥ वांयांचिगे ली ॥ ६४० ॥ नकरीप्रकाशासीअनुमोदन ॥ ननासीतमाचेंनाहींपण ॥ एवंतयासीदीपपण ॥ असतचिनाहीं ॥ ४१ ॥ तेवींअसतचिशब्दनिमाला ॥ अविद्यानाशातोनाथिला ॥ आत्मत्वींत रीबुडाला ॥ आपणचिथिता ॥ ४२ ॥

आतांअविद्यानाहींपणें ॥ नाहींतयेतेंनाशणें ॥ आत्मासिद्ध चिमाकोणें ॥ कायसाधावें ॥ ९६ ॥ ऐसाउभयपक्षीं ॥ बोलुन लाहेनखी ॥ हरपलाप्रळयोदकीं ॥ ओघजैसा ॥ ९७ ॥

एवंआत्माशुद्धबुद्ध ॥ जोकींस्वताचिअसेसिद्ध ॥ जयाच्याद्रष्टृत्वासबाध ॥ कालत्रयींनसे ॥४३॥ ॥ श्रुतिः ॥ नहिद्रष्टुर्दृष्टेर्विपरिलोपोविद्यतेअविनाशित्वात् ॥ इति ॥ ॥ ह्मणोनिज्यादेखण्यासपाहीं ॥ सर्वथाविलोपचिनाहीं ॥ तेथेंअविद्याहेंकाई ॥ कासयाऐसी ॥ ४४ ॥ आतां आत्मयाचेअखंडपणीं ॥ आइतीअविद्येचीहानी ॥ तेथेंअविद्याहाशब्दह्मणी ॥ उमसपावे ॥ ४५ ॥ एवंउभयपक्षींयासी ॥ अप्रयोजकताआलीऐसी ॥ किंबहुनाअसावयासी ॥ ठावचिनाहीं ॥४६॥ अविद्यानाहींठायींचि ॥ आत्माशुद्धअर्थींचि ॥ ह्मणोनशब्दाची ॥ नखीचनलगे ॥ ४७ ॥ आत्मा सच्चिदानंदघन ॥ असेअसतेपणेंवीण ॥ पाहातांपूर्णत्वाचीखूण ॥ तेथेंअविद्याकैंची ॥ ४८ ॥ माशब्दाचाकैंचाउगव ॥ आत्माआत्मत्वाचानधरीभाव ॥ चिन्मात्रचिदार्णव ॥ पुंजाळलाअसे ॥ ४९ ॥ तेथेंशब्दाचाकैंचामाग ॥ जेवींप्रळयोदकींहरपलाओघ ॥ माशब्दींआत्मत्वाचालाग ॥ लागेलकाय ॥ ६५० ॥ उक्तंच ॥ अस्तिनास्तिवचनेनभाषितंभातिशब्दपरिभाषितंतथा ॥ भानहीनमपिभाषितंचमेरूपमेवनहिसंशयःक्वचित् ॥ इतिब्रह्मगीतायां ॥ जेंजेंआर्थीनार्थीनिरूपित ॥ नानापूर्वपक्षनानासिद्धांत ॥ तेंअवघेंशब्दभाषित ॥ नावेकदिसतसे ॥ ५१ ॥ परीस्यानमोडूनि चिन्मात्रखूण ॥ नदेखोनअन्यभान ॥ शब्दगोचरनहोन ॥ रूपमात्रनिरूपिलें ॥ ५२ ॥ तेंनिरूपण दशेआलेंनाहीं ॥ एवंशब्दाचाचउगउनाहीं ॥ ऐसेंब्रह्मयाप्रतिपाहीं ॥ निगदिलेंउमाकांतें ॥ ५३ ॥ एवंआत्मत्वींनाहींपरोक्षदशा ॥ तेथेंशब्दासठावहोयकैसा ॥ आतांशब्दभागसहसा ॥ अर्थचिनाहीं ॥ ५४ ॥

आतांबोलाभागुकांहीं ॥ असणेंजयाच्याठायीं ॥ अर्थतातरीनाहीं ॥ निपटूनियां ॥ ९८ ॥

आत्मासर्वदारूपहीन ॥ कार्यकारणविहीन ॥ तोकोण्हीयांअर्थासजाण ॥ प्रसवलाचनाहीं ॥ ५५ ॥ आतांजेथअर्थचनाहीं ॥ तेथशब्दासयेईलकायी ॥ एवंअर्थेंवीणपाहीं ॥ शब्दतोकिमात्मक ॥ ५६ ॥

बागुलआलाह्मणतें ॥ बोलणेंजैसेंरितें ॥ कांआकाशवोळंबतें ॥ तळहातीं ॥ ९९ ॥ तैसीनिरर्थकेंजल्पें ॥ होऊनियासपडपें ॥ शोभतीजैसेलेपें ॥ रंगावरी ॥ १०० ॥

पूर्वोक्तनिरूपणेंकरून ॥ शब्दव्यर्थजालाअर्थेंवीण ॥ कांजेअविद्येसस्वतानास्तिकपण ॥ शब्दें कायकीजे ॥ ५७ ॥ आत्माशब्दाअधींआहे ॥ ह्मणोनिशब्दतेथेंनसाहे ॥ एवंयाअभिप्रायें ॥ शब्दचमिथ्या ॥५८॥ आतांऐलाडिलजेंआहाच ॥ तेंलटिकेंचदिसेकवच ॥ जेवींबागुलह्मणतेंसाच ॥ बोलणेंजैसें ॥५९॥ लटिकाचबाळाप्रतिबागुल ॥ आलाह्मणतीपरीबोलफोल ॥ तेवींचअर्थेंवीण हेहीबोल ॥ डिंबमात्र ॥६६०॥ किंवाउरूनपाहातां ॥ आकाशाचीअतिनीचता ॥ देखिजेजेवींहाता ॥ पावेजैसें ॥ ६१ ॥ परीतेंठायींच्याठाईं ॥ समीपदूरीतयानाहीं ॥ निरावेवींपाहीं ॥ भानत्र कैंचें ॥ ६२ ॥ निरावेवींदिसेभान ॥ तैसेंबोलणेंचिपरीअर्थहीन ॥ जेवींपडपाचेंभूषण ॥ विषये

नेत्रां ॥ ६३ ॥ परीआतांअवघेंपोकुळ ॥ देखतदेखतटवाळ ॥ किंवाचित्रींचेंलेपकेवळ ॥ रंगमात्र ॥ ६४ ॥ तेथेंलेपाचाजोहाभाव ॥ दिसेपरीतेंअवघीमाव ॥ तेवींशब्दासीचिबरव ॥ वोडवलीयेथें ॥ ६५ ॥ एवंप्रमेयप्रमाणातीत ॥ ज्ञेयज्ञानविवर्जित ॥ रूपअरूपाचीजेथ ॥ वार्ताचिनाहीं ॥ ६६ ॥ जेथेंविक्षेपकधींनाहीं ॥ तेथेंअविद्याकैंचीकाई ॥ ह्मणोनिशब्दाचियाकांहीं ॥ नयेचिभागा ॥ ६७ ॥ सिद्धाआत्मयासमाधन ॥ नसतीयअविद्येसीनाशजाण ॥ हेंकेवळवाग्विडंबन ॥ हीनअर्थें ॥ ६८ ॥ अर्थींवाचासमर्पिली ॥ तेथवाचकताचबुडाली ॥ तेंकेवींबोलीं ॥ बोलवेआतां ॥ ६९ ॥ एवंआरोपआणिअपवाद ॥ हाशब्दाचाचसंबंध ॥ तोचनाहींआत्मासिद्ध ॥ जैसातैसा ॥ ६७० ॥ आतांयाशब्दाचेंखंडण ॥ प्रसंगाचेंउपसंहरण ॥ केलेंसेतेथअवधान ॥ श्रोतींदीजे ॥ ७१ ॥

एवंशब्दैकजीवनें ॥ बापुडींज्ञानेंअज्ञानें ॥
साचपणेंवनें ॥ चित्रींचींजैसीं ॥ १०१ ॥

जेंज्ञानाज्ञानविहीन ॥ दृष्टात्रस्वरूपपूर्ण ॥ जेंप्राप्तजालयावीण ॥ नित्यप्राप्त ॥ ७२ ॥ तेथजें विद्यालक्षण ॥ जेंकींप्राप्तिकज्ञान ॥ आणिअविद्येचेंजेंखंडण ॥ तेंअज्ञानजाणावें ॥ ७३ ॥ असोज्ञानासीजेंजालेपण ॥ तेथेंवसतसेअज्ञान ॥ तरीज्ञानरूपासीजाण ॥ ज्ञानचिनसाहे ॥ ७४ ॥ आत्मयाआत्मप्राप्ति ॥ तेथेंचवसेअप्राप्ति ॥ प्राप्ताप्राप्तवित्पत्ति ॥ ज्ञानअज्ञान ॥ ७५ ॥ एवंवस्तूसीवस्तुज्ञान ॥ हेंकेवळवाचारंभण ॥ ह्मणोनिशब्दचिएकजीवन ॥ ज्ञानअज्ञानासी ॥७६॥ आपआपलीवेद्यवेदकता ॥ तोचहाशब्दआतां ॥ तरीएकेरूपींसद्वयता ॥ आलीचनये ॥ ७७ ॥ जेवींचित्रींच्यावाटिका ॥ सपुष्पफळींमंडितदेखा ॥ परीरंगनाहींअनेका ॥ भावासीआला ॥ ७८ ॥ तेवींएकपणनाहींफुटलें ॥ स्वरूपमात्रपाहींसंचलें ॥ तेथज्ञानाज्ञानभासलें ॥ चित्रवनजैसें ॥ ७९ ॥ अथवाचित्रींचेंवन ॥ ह्मणिजेचित्रींचिनाहींपण ॥ मातयासाचपण ॥ येईलकैसें ॥ ६८० ॥ तेवींस्वताचिन्मात्रपूर्ण ॥ शब्दचिव्यर्थजाण ॥ तेथहीउच्चारण ॥ अज्ञानऐसें ॥ ८१ ॥ तरीअज्ञानह्मणिजेअर्थहीन ॥ आणित्याचेंविरोधिज्ञान ॥ एवंउभयासीव्यर्थपण ॥ सहजचिआलें ॥ ८२ ॥ एवं[illegible]ं ॥ केवळशब्दाचीउभवणी ॥ तोशब्दचिझणी ॥ उमसघेवो ॥ ८३ ॥

य[illegible]निमाला ॥ महाप्रळयोहोसहरला ॥
अभ्रासवेंगेला ॥ दुर्दिनुजैसा ॥ १०२ ॥

अहोज्ञानाज्ञानासीमूळ ॥ शब्दचहाकेवळ ॥ तरीशब्दचिमूळ ॥ उगउनेघे ॥ ८४ ॥ अहोप्रल्यार्णवसंचला ॥ आद्यंतेंवीणभरला ॥ तेथेंशब्दाचामासला ॥ हरपोनगेलापैं ॥ ८५ ॥ त्याशब्दाचेपोटीं ॥ हरपल्याप्रळयकोटी ॥ दृष्टात्रदृष्टी ॥ सुरवाडजाला ॥८६॥ परीशब्दएकसामावला ॥ मगप्रपंचलयजाला ॥ तरीशब्दत्वेंअसेसंचला ॥ शब्दत्वेंसंहरे ॥ ८७ ॥ तोशब्दचजेथेंनाहीं ॥ तेथेंमहाप्रळयतोकाई ॥ शब्दाचसवेंपाहीं ॥ होऊनिठेला ॥ ८८ ॥ अहोमहाप्रळयह्मणिजेकाई ॥ तरीस्वात्मानुभवजोकांहीं ॥ तोशब्दाचसवेंअनुभवपाहीं ॥ नमिरवीअंग ॥ ८९ ॥ तेंराहिलेंशब्दासवें ॥ येथतंवकांहींचिनसंभवे ॥ आत्मारामींउद्भवे ॥ आणिअभिभवेकाई ॥६९०॥ जैसादुर्दिनअभ्रासवें ॥ परीसूर्यींतंवनसंभवे ॥ ह्मणोनिसूर्यासनलगेराहावें ॥ दुर्दिनासीं ॥ ९१ ॥ तेवींशब्दचजयाजीवन ॥ तेंमरेचहीशब्देंचवीण ॥ स्वरूपींतंवशब्दाजाण ॥ उगवचनाहीं ॥ ९२ ॥ एवंज्ञानाज्ञानेंवीण ॥ स्वरूपअसेसंपूर्ण ॥ तेथिंचीखूण ॥ दाऊनदिधली ॥ ९३ ॥ आणिज्ञानाज्ञान

हीन ॥ तरीकेवळअसेशून्य ॥ हेहीशंकासंपूर्ण ॥ तोडिलीयेथें ॥ ९४ ॥ सच्चिदानंदआत्माअसे॥ तेथेंत्रिपदाचामागनुमसे ॥ प्रमेयेंप्रमाणदशे ॥ आलाचिनाहीं ॥ ९५ ॥ अपरोक्षसच्चिदानंद ॥ सहजचिनसतीत्रिधाभेद ॥ तेथेंकेवींआतांशब्द ॥ शब्दत्वेंमिरवे ॥ ९६ ॥ शब्दींबोधकतानाहीं ॥ बोधरूपआत्माचिकांहीं ॥ त्याबोधरूपासीपाहीं ॥ बोधावेंनलगे ॥ ९७ ॥ तयेबोधरूपनिखळीं ॥ नुमटेशब्दाचीनव्हाळी ॥ एकेहाताटाळी ॥ नवाजेजेवीं ॥ ९८ ॥ एवंचित्सागरउचंबळला ॥ तोचिदार्णवींसामावला ॥ तेथेंचिशब्दाचामासला ॥ हरपोनजाये ॥ ९९ ॥ येथेंउद्भवलें आणिनिमालें ॥ हेंतंवकांहींनाहींजालें ॥ आतांनावेकबोलाआलें ॥ तेंनिमालेंबोलाचसवें ॥७०० एवंइत्यादिहाप्रसंग ॥ संपलायेथेंसांग ॥ परीदेखिलानाहींलाग ॥ बोलाचायेथें ॥ १ ॥ हेअनुभवामृतींचीखूण ॥ अनुभवेंचिहोयउपलवण ॥ जरीसद्गुरूराजपूर्ण ॥ लाहिजेनिका ॥ २ ॥ गुरुकृपेचेनिसुरवाडें ॥ गुह्याचेंगुह्यत्वनमोडे ॥ विवरलेंऐसेंआवडे ॥ परीजेथिलतेथें ॥ ३ ॥ अहोगुरुमाउलियासांतविलें ॥ नावेकशांतिसेजेसुतविलें ॥ तेथेंसेखींस्वानुभूत्याजागविलें ॥ तंवसुखाचीचउषा ॥ ४ ॥ उषानव्हेहेंअनुभवजळ ॥ नावेकमजयेथेंकेलेंकल्लोळ ॥ गुरूमाउली क्रीडारोळ ॥ कौतुकपाहे ॥ ५ ॥ अहोबाळकाच्याबोलींपाहीं ॥ मिथ्यासत्यदोन्हींनाहीं ॥ ते वींहेंवदलोंजेंकांहीं ॥ तेंनेणपणें ॥ ६ ॥ तेथेंउक्तानुक्तउक्ति ॥ हेमजतंवनाहींव्युत्पत्ति ॥ नावे कलाडविलोकीकरुणामूर्ती ॥ नित्यानंदें ॥ ७ ॥ म्यांत्याचेकृपेचेंअनुमोदन ॥ पावोनकेलेंहेंविवरण ॥ येथेंन्यूनअथवापूर्ण ॥ तेंसंतजाणती ॥८॥ येऱ्हवींनिखळचिन्मात्रावतार ॥ ज्ञानमात्र चिज्ञानेश्वर ॥ तेथूनहाचिदाकार ॥ कौतुकाआला ॥ ९ ॥ असोतोज्ञानोदयतरणी ॥ विकाश लाअनुभवामृतकिरणीं ॥ तेथेंअहंममतादितमाहानी ॥ नकरितांजाली ॥ ७१० ॥ अहोयातेजपुंजामाजीं ॥ कैसीबुद्धिरिघेलमाझी ॥ असोयाअमितासमोजीं ॥ मीहेंघडेकैसें ॥ ११ ॥ हेंअसो ज्ञानेश्वराचीखूण ॥ म्यांकीजेलयेथीलविवरण ॥ तरीपंगुलंघीलजाण ॥ गिरिमस्तक ॥ १२ ॥ तस्मात्येथीलसंपूर्णभाव ॥ म्यांकाढिजेलहेअवघीमाव ॥ परीकायकीजेस्वभाव ॥ राहोंनेदी ॥ ॥१३॥ हेंहीअसोनित्यानंदकल्याणमूर्ती ॥ तोचेंववितमाझीभारती ॥ आतांमजयेवढीगती ॥ का सयाअसे ॥१४॥ कोणपदभावेंकोणें ॥ रचिलेंआहेसमर्थेंतेणें ॥ हेंमीकायजाणें ॥ उकलुयाचा ॥ ॥ १५ ॥ अहोश्रीनित्यानंदाचियाकृपा ॥ हासमाधिजोडलासोपा ॥ कर्माअकर्माचियारूपा ॥ उल्लंघूनि ॥ १६ ॥ अहोकर्मनव्हेनाउगेपण ॥ हेंमुख्यसमाधीचेंलक्षण ॥ नित्यानंदेंहडसून ॥ दाविलेंमातें ॥ १७ ॥ उक्तंच ॥ तत्वावबोधएवैकःसर्वाशातृणपावकः ॥ प्रोक्तःसमाधिशब्देननतुतूष्णीमवस्थितिः ॥ इतिवासिष्ठे ॥ ॥ ह्मणिजेइंद्रियांताटीदेऊन ॥ बैसिजेघालूनआसन ॥ हेंनव्हे लक्षण ॥ समाधीचें ॥ १८ ॥ अहोबोधतत्वजेंआपलें ॥ तेंनिजबोधेंचआलिंगिलें ॥ पूर्वापरतेंसी शिवतलें ॥ नाहींजेंकीं ॥ १९ ॥ तयाचाघडेजरीबोध ॥ नुमटेजालेपणाचासंबंध ॥ ऐसाप्रत्यय सिद्ध ॥ हाचसमाधी॥७२०॥ बोधेंबोधाआलिंगिलें ॥ हेंबोलणेंचिवायांगेलें ॥ परीतेतंवसंचलें॥ अधींचितैसें ॥ २१ ॥ अहोऐसेजोप्रत्यये ॥ तोप्रत्ययसाक्षित्वानये ॥ जेवींदीपदीपाचाहोये ॥ साक्षीकेवी ॥२२॥ दीपाचेंदीपपण ॥ दीपींअसेसाक्षित्वेंवीण ॥ बोधींबोधकताजाण ॥ तैसीअसे ॥ २३ ॥ तेचहेबोधबोध्येंवीण ॥ उमटलेंगुरुशिष्यपण ॥ किंवासमाधिनुलंघून ॥ विवरणबिनटे ॥ २४ ॥ येथमाझेंपरिहाराचेंलक्षण ॥ होऊनिगेलेंशतचूर्ण ॥ आतांकौतुकार्थअवसान ॥ मिरा बसानींकेलें ॥ २५ ॥ अधींचशब्दखुंटला ॥ तोखंडूनप्रकरणार्थकेला ॥ श्रीमंतनित्यानंदेंमांडिला ॥ नावेकखेळु ॥ २६ अहोनित्यानंदमजजीवन ॥ नित्यानंदमजमीपण ॥ ग्रंथआणिविवरण ॥

त्याचेंचिरूप ॥ २७ ॥ श्रीज्ञानेश्वरमुखनिसृतआलें ॥ तेंनित्यानंदेंमजपाजिलें ॥ म्यांहीतें आस्वादिलें ॥ अधिकारेंआपुलिया ॥ २८ ॥ आतांनित्यानंदाच्यापाईं ॥ वाचेनेविसावाघेतला पाहीं ॥ ह्मणोनिइयेठायीं ॥ संपविलेंप्रकर्णे ॥ २९ ॥ पुढेंपूर्वपक्षाचेनिछेदें ॥ अज्ञानाचाअभाव साधे ॥ ऐसेंकांहींविनोदें ॥ बोलिलेंअसे ॥ ७३० ॥ तेपरिसतीश्रोतेजन ॥ मीकरीनधीटपण ॥ यालागींसंतांचेश्रीचरण ॥ वंदितअसें ॥ ३१ ॥ नित्यानंदचरणरजःकण ॥ तेमजजालेपयःपान ॥ तेणेंमीकल्याण ॥ शिवचिअसें ॥ ७३२ ॥ इतिश्रीअनुभवामृतविवरणेशब्दखंडणंनामषष्ठं प्रकरणंसंपूणम् ॥

प्रकरण सप्तम.

ॐपरमात्मनेनमः ॥ जयजयचिदेकमूर्ति ॥ चित्सिंहासनस्थाचिद्वैभवचिद्दीप्ति ॥ चिदेकछत्राचिन्नृपति ॥ चिन्मयानंदा ॥ १ ॥ प्रभोतूंचिब्रह्मांडींचारावो ॥ तुझेंराज्यस्थानलगेकाळाचा घावो ॥ असोतुझियेराज्याअपावो ॥ देखिलाचिनाहीं ॥ २ ॥ तुझेंराज्यजीक्षयहीन ॥ क्षितीमंडळींनाहींदुजेंशासन ॥ अकृत्रिमअसपत्न ॥ राज्यचूडामणीजी ॥ ३ ॥ प्रभोनवलतुझेंअजातशत्रुपण ॥ नेणसीराज्यकिंवारंककोण ॥ अरिआणिमित्रजाण ॥ असतीचनातुज ॥ ४ ॥ अहोया लोकत्रयाच्याठायीं ॥ राजातूंचिएकपाहीं ॥ परीतुवांयालोकत्रयासीकहीं ॥ जाणितलेंचनाहीं ॥ ५ ॥ अहोनवलतुझेंराजेपण ॥ रंककोण्हीचनाहींजाण ॥ ह्मणोनिराजेपणेंवीण ॥ राजाहोसी ॥ ६ ॥ तूंतंवकांहींचनेणसी ॥ आणिराज्यस्थितितंवजैसीतैसी ॥ तुझीयेराजाज्ञेसी ॥ तुलंघीकोण्हीं ॥ ७ ॥ अहोउल्लंघितांहीतुलंघेजाण ॥ प्रभोनवलतुझेंहेंशासन ॥ तुवांहेंप्रेरिलीचनसोन आज्ञाजाण ॥ स्वयेंचिलाटी ॥८॥ अहोयाराज्यपदासीजाण ॥ नाहींआद्यमध्यावसान ॥ पट्टाभिषेकेंजालाहेखूण ॥ तुजहीअदृश्य ॥ ९ ॥ किंवाआज्ञातुवांकधींकेलीअसे ॥ जेणेंक्षितिमंडळने मलेंदिसे ॥ हेहीखूणनुमसे ॥ तुझीचतुज ॥१०॥ अहोहेंनवलतुझेंशासन ॥ वर्ततसेकेलेनवीण ॥ विरंचीसीविरंचीपण ॥ तुझीयाआज्ञा ॥११॥ तोउगेचकरीसृजन ॥ रमानाथेंकीजेपाळण ॥ महारुद्रेंसंहारण ॥ नकरितांचकीजे ॥१२॥ अहोदिनकरेंतपावें ॥ निशापतीनेंस्रवावें ॥ औषधीसीपोसावें ॥ आपल्याकिरणीं ॥१३॥ अंबरींअवकाशरीति ॥ अहोवायूचाठाईंगति ॥ अग्नीचेरूपाचीदीप्ति ॥ नैसर्गिक ॥१४॥ उदकेंरसत्वनसांडावें ॥ पृथ्वियाभूतांतेंधरावें ॥ कदाचितनविसर्जावें ॥ कठिणत्वासतियेनें ॥१५॥ अहोहेंकितीबोलावें ॥ समुद्रेंभरलेंचअसावें ॥ कृतांतेंक्रमावें ॥ काळगतीसी १६ किंबहुनाअवघेनचराचरें ॥ आपुलालियेप्राप्ताचारें ॥ असावेंहेंशासनखरें ॥ नप्रेरितांअसे ॥१७॥ प्रभूनीचनवेंतुझेंराजेपण ॥ अतिक्रमउपजलाचिनाहींजाण ॥ चित्सूर्यसर्वदाप्रकाशघन ॥ नेणें उदयअस्तासी ॥ १८ ॥ जेथेंउदयअस्तुचिनाहीं ॥ तेथेंकाळगतितेकैंचिकायी ॥ ह्मणोनीनिचन वाचपाहीं ॥ राजपट्टचतुझा ॥ १९ ॥ जेथीलसूर्यचिअस्तेवीण ॥ तेथेंकाळच्चिनसंभवेजाण ॥ एवंकाळाचेंशासन ॥ तुझेंराज्यनेणें ॥ २० ॥ आणीकएकितुझीराज्यखूण ॥ तूंराजाआणिराज्य सजन ॥ याबोलासविषयनिपटून ॥ संभवलाचनाहीं ॥२१॥ ह्मणोनतुझेराज्येंकधींही ॥ भंगभेद देखिलाचिनाहीं ॥ कांजेनव्हेआगमापाईं ॥ राजेपणतुझें ॥ २२ ॥ अहोसकळराजेसहवर्त्तमान ॥ सर्वदातूंआनंदघन ॥ आतांहास्तुतिभागचिजाण ॥ मुरडलाप्रभो ॥ २३ ॥ कांजेंतूंत्रैलोक्येंसीसंपन्न ॥ परीतूंतवएकाकीचजाण ॥ निर्धारिताहेतुझीखूण ॥ मजमीपणयेवोंविसरलें ॥ २४ ॥

ह्मणोनस्तुतिसहीविसरलों ॥ माझेमीपण लीलालिलों ॥ बोलकेपणेंसांडलों ॥ मौनेंसहित॥२५॥ परीरत्नींजेदीप्तिकांहीं ॥ तेरत्नींनिवांतचिअसेठायीं ॥ आणिनफांकितांचपाहीं ॥ विलासेफांके ॥२६॥ तेवींमाझेंबोलिकेपण ॥ असोनतुझ्याठायींमग्न ॥ आणिमग्नत्वाचीखूण ॥ नमोडतांफांके ॥ २७ ॥ अहोजीश्रीनित्यानंदा ॥ प्रभोसकळकल्याणकंदा ॥ तुझीयाकल्याणत्वेंसर्वदां ॥ कल्याणचअसे ॥ २८ ॥ परीजिव्हाआपलीगोडी ॥ नसंडीनसोनिसवडी ॥ तैसीतुझीपदपरवडी ॥ पाहोंचिआवडे ॥ २९ ॥ ह्मणोनतुझेंपादावलोकन ॥ नराहावेंकेलेनिवीण ॥ तेचिहेंनबोलोन ॥ बोलतुअसे ॥ ३० ॥ जेवींपावलियाहीसमुद्राचेंअंग ॥ नराहेगंगेचाओघ ॥ तेवींचहेंकांहींलगबग ॥ माझ्याठायीं ॥ ३१ ॥ आतांतुझेंप्रेमनतुटावें ॥ तुजचिवानावेंतुजचिवंदावें ॥ ऐसेंकांहीं द्यावें ॥ पसायदान ॥ ३२ ॥ आतांअसोहेविज्ञप्ति ॥ कृपाकीजेकरुणामूर्ति ॥ जेमीवाणींतुझीकीर्ति ॥ अनुभवामृतव्याजें ॥ ३३ ॥ अहोआइतेंपरमामृत ॥ परीम्याजेणेंहेंआस्वादिजेत ॥ ऐसारसनेसीअद्भुत ॥ अधिकारदीजे ॥३४॥ अहोअरोचकअवघेंफिटे ॥ हेअमृतचजीव्हावावटे॥ रसरसनेचेवांटे ॥ तुटोनजाती ॥ ३५ ॥ हेंचिमागतसेंदातारा ॥ वांचूनवृथाहावचनपसारा ॥ तुझीवासयामोहरा ॥ पाहातुसेस्वामी ॥ ३६ ॥ आतांकरावेंकूर्मावलोकन ॥ म्याचहोइजेरसरूपजाण ॥ आणिआस्वादजीपूर्ण ॥ होइजेमियां ॥ ३७ ॥ पराचापांगफेडी ॥ भोग्यभोक्तृत्वाचामाधुमोडी ॥ अतृप्तीचातोडी ॥ थाराचयेथूनि ॥ ३८ ॥ मगसहजचितृप्तपण ॥ हेंहीमोडेलआठवण ॥ अवघाचिद्रसचिजाण ॥ वोतोनिघाली ॥ ३९ ॥ हेंहीअसोजीदाता ॥ मजगोंवीकायआतां ॥ तुझ्याचरणयुग्मींमाथा ॥ हेंचिपुरे ॥ ४० ॥ अहोसत्पदआणिचित्पद ॥ हेंतुझेंचरणद्वंद्व ॥ माझीआवडीहाआनंद ॥ जडोनिगेला ॥ ४१ ॥ ह्मणोनिमजनाहींमीपण ॥ सर्वकाळमाझेंमन ॥ नकरितांचिजाण ॥ आइतेंअसें ॥ ४२ ॥ ऐसामनचंद्रमाकळापूर्ण ॥ देखोनउल्हासलाकरुणासिंधुआपण ॥ परीनवलहेंउत्थान ॥ वोहटुनेघे ॥ ४३ ॥ अहोइयेकृपापौर्णिमेच्याठायीं ॥ दाटलियाचंद्रकळाचचंद्रींपाहीं ॥ तेंहीसांडिलेंतिथिप्रवाहीं ॥ वांटियाजाणें ॥ ४४ ॥ एवंचंद्रकळाभेदमोडला॥ह्मणोनिवाढीहोविसरला॥ह्मणोनसागरेंहीसांडिला॥उल्हासवोहटु ॥ ४५ ॥ आतांसागरकरुणारसेंउचंबळला ॥ तोमागुतानव्हेचिथेकुला ॥ एवंइयासुखार्णवींबुडाला ॥ मनचांदुहीथिता ॥ ४६ ॥ अहोहोतेंजैंपितापुत्रपण ॥ तऱ्हींवागविलीपितृत्वाचीखूण॥ आत्मावैपुत्रनामासिहेजाण॥ श्रुतीचेंवचनसाक्ष ॥४७॥ अहोनित्यानंदाब्धिउचंबळला ॥ तेथेंमनचंद्रमग्नजाला ॥ परीमग्नत्वेंसीउसासला ॥ सुखभोगानावेक ॥४८॥ तोमीनित्यानंदसागरीं॥ कल्लोळत्वेंक्रीडाकरी ॥ सज्जनाचीयानमस्कारीं ॥ चरणारविंदा ॥ ४९ ॥ प्रभूहेअनुभावामृतखाजें ॥ आह्लादिधलेंजीगुरुराजें ॥ हेंस्वीकारावेंवोजें ॥ तेसिकवावेंतुह्मी ॥५०॥ तुह्मीनित्यानंदनिर्झर ॥ नित्यानंदस्वामीअतिचतुर ॥ मीतुमचानिपटनाकिंकर ॥ पायधुळीतुमची ॥ ५१ ॥ यावरीसंताचेंअनुमोदन ॥ पावोनआरंभिलेंविवरण ॥ नित्यानंदचरणबैसऊन ॥ हृदयराउळीं ॥ ५२ ॥ अहोतयातेजाचीदिपवाळी ॥ हेविवरणवाटउजळी ॥ आतांसंतराउळींघाली ॥ वाग्वेलपत्री ॥ ५३ ॥ अहोन्यूनचिपूर्णत्वाघ्यावें ॥ अवधानउचितघ्यावें ॥ शिवकल्याणव्हावें ॥ जगेंचियेणें ॥ ५४ ॥ मागेशब्दाचेंखंडण ॥ दाऊनिसंपविलेंप्रकरण ॥ अविद्येचाहीअभावजाण॥ दाखविलातेथें ॥ ५५ ॥ सर्वेचिआतांहेंप्रकरण ॥ आरंभिलेंअज्ञानखंडण ॥ तरीआदेवेंहूनआन॥ अज्ञानतेंकायी ॥ ५६ ॥ तरीयेथेंदिसतसेअनुमान ॥ जैमागेंदाविलेंअविद्याखंडण ॥ त्याचेंचआतांदृढीकरण ॥ अज्ञानमिसें ॥ ५७ ॥ परीनावेकविरोधउभाकीजे ॥ तोवृथाह्मणोनिदाविजे॥

मगविरोधचिनुपजे ॥ सर्वथैव ॥ ५८ ॥ वाटेखांबउभाआहे ॥ तेथेंपुरुषभानह्मणीहोये ॥ ह्मणोनवाटसारासांगोंये ॥ खूणतेथिंची ॥ ५९ ॥ अगापंथशोभेलागीं ॥ खांबउभारिलामार्गी ॥ तेथेंनकरावीवाउगी ॥ पुरुषशंकातुह्मीं ॥ ६० ॥ तेवींमिथ्यादावितांअज्ञान ॥ तेचिअर्थपुष्टिलागून ॥ पूर्वपक्षअसतीतेथेंसाचपण ॥ धरावेंह्मणी ॥ ६१ ॥ यालागींपूर्वपक्षलोटून ॥ मिथ्यादावितसेअज्ञान ॥ यालागींफिरोन ॥ बोलणेंकेलें ॥ ६२ ॥ अहोहालऊनिबळकाविलें ॥ तेंवज्रप्रायनिष्टंककेलें ॥ ह्मणोनवायांचउत्पादिलें ॥ विरोधिमत ॥ ६३ ॥ अगापराअपराउक्ति ॥ त्यापरार्थीचिअवधियाज्ञौवती ॥ अवसानसिद्धांतीं ॥ अवघियांएक ॥ ६४ ॥ नावेकउभेकरूनीपूर्वपक्षातें ॥ साधूनघ्यावेंसिद्धांतातें ॥ मगसिद्धांतींचथितें ॥ सिद्धांतत्वउडे ॥ ६५ ॥ संमतिः ॥ शास्त्राणामपिनिर्देशस्तर्काणामपिभाषणं ॥ अन्यद्विकल्पजालंयत्तदुक्तिश्चसमासतः ॥ १ ॥ अन्यथानपरंब्रह्मश्रुतिःसाध्वीनतत्परा ॥ चित्तपाकानुगुण्येनश्रोतृणांपरमाश्रुतिः ॥ २ ॥ सोपानक्रमतोदेवोमंदंमंदंहितंनृणां ॥ उपदिश्यन्विषन्नापिपुनःपक्वाधिकारिणः ॥ ३ ॥ एतदात्म्यमिदंसर्वमित्याहंपरमाद्वयं ॥ इतिब्रह्मगीतायां ॥ नानाशास्त्रतर्कभाषा ॥ आणिकल्पजाळशतसहस्रशा ॥ याअवघियाहीविशेषां ॥ ब्रह्मचिविशेष्य ॥ ६६ ॥ ब्रह्माहूनपर ॥ नाहींश्रुतिचेंजिव्हार ॥ आतांचित्तपाकानुसार ॥ मंदाधिकारां ॥ ६७ ॥ ह्मणोनमंदमंदसोपानक्रम ॥ बोलोनदाविलेंपक्वाधिकारवर्मे ॥ एवंअवघाअनुक्रम ॥ सिद्धांतांज्ञोंवे ॥ ६८ ॥ अहोमंदाधिकारालागून ॥ क्रमसांगितलासोपान ॥ मगपक्वाधिकारत्यासीचजाण ॥ सर्वात्मताबोलिले ॥ ६९ ॥ ह्मणोनअपरजेंमत ॥ तेंपरार्थासीचद्योतित ॥ ह्मणोनपूर्वपक्षसाधित ॥ अज्ञानअभाव ॥ ७० ॥ किंवासच्चिदानंदआत्मापूर्ण ॥ येथेंशब्दाचेंकेलेंखंडण ॥ अविद्याहीजाण ॥ खंडिलीतेथें ॥ ७१ ॥ एवंव्यतिरेकाचीखूण ॥ दाऊनखंडिलेंअज्ञान ॥ आतांअन्वयेंहीकरून ॥ साधितोंतेंचि ॥ ७२ ॥ अभावाआलेंअज्ञान ॥ मगसहजचिज्ञानींनाहींज्ञानपण ॥ अन्वयव्यतिरेकाचीखूण ॥ हरपलीतेथें ॥ ७३ ॥ अज्ञानाचाचिअभाव ॥ तरीविश्वासीचकेउताठाव ॥ स्वतःसिद्धआत्माराव ॥ संचलाअसे ॥ ७४ ॥ ऐसेंकांहींअवांकून ॥ आरंभिलेंअज्ञानखंडण ॥ यालागींअवधान ॥ मागतुसेश्रोतयां ॥ ७५ ॥ मागेंप्रबंधमिसें ॥ अवसानींबोलिलेंऐसें ॥ जेंशब्देंचिजीवनअसे ॥ ज्ञानाअज्ञाना ॥ ७६ ॥ तस्मात्स्वरूपाठायीं ॥ ज्ञानाज्ञानविशेषनाहीं ॥ ऐसेंपडलेंठायीं ॥ येणेंबोलें ॥ ७७ ॥ अहोअर्थेंवीणशब्दजाण ॥ तेंबोलिजेवाचारंभण ॥ वाचारंभणतेंनिपटून ॥ स्वरूपींनसे ॥ ७८ ॥ ऐसापूर्ववाक्याचाअंतरार्थ ॥ देखोनशंकाउठत ॥ तेंहीअसेपरिहरित ॥ अवधानद्यावें ॥ ७९ ॥ अहोज्ञानाचेउत्कर्षे ॥ ज्ञानचिनयेज्ञानदशे ॥ तेथेंअज्ञानकैसें ॥ थारोंशकेपां ॥ ८० ॥ ज्ञानक्षोभोनपाहे ॥ तैंअज्ञानकोठेंआहे ॥ मगसहजचिएकलेंहोये ॥ ह्मणोननिवांतज्ञान ॥ ८१ ॥ एवंज्ञानींनाहींज्ञानपण ॥ यासीज्ञानचिकींकारण ॥ अज्ञानतंवनिपटून ॥ असेनायेथें ॥ ८२ ॥ हेंपूर्ववाक्याचेंगुह्यजाण ॥ जेंनिःशेषनसेअज्ञान ॥ येथेंशंकेचीखूण ॥ तेऐसीअसे ॥ ८३ ॥ अहोजालेंअज्ञानपरिहरण ॥ मगज्ञानत्वेंनसेज्ञान ॥ तेथेंसहजचिअज्ञान ॥ अभावाआलें ॥ ८४ ॥ तरीज्ञानदृष्टिपाहातां ॥ कैंचीअज्ञानाचीवार्ता ॥ परीहाज्ञानोत्कर्षनयेहाता ॥ तैंअज्ञानासिद्ध ॥ ८५ ॥ ज्ञानदृष्टिअज्ञानवावो ॥ परीअत्यंतिकनव्हेअभावो ॥ ऐसापूर्वपक्षाचाभावो ॥ सुचोनबोले ॥ ८६ ॥ यापूर्वपक्षानुसार ॥ पुढेंसूचिलापरिहार ॥ तोआतांसविस्तर ॥ प्रसंगेंसांगें ॥ ८७ ॥

येऱ्हवींतरीअज्ञाना ॥ जैंज्ञानानसेक्षोभना ॥
तैंतऱ्हींकाना ॥ खालींचदडे ॥ १ ॥

विचारकरितांचजेंनाहीं ॥ तेंपूर्वीहोतेंहातर्कुकायी ॥ तस्मात्पहिलेंचिनसेयेथेंकांहीं ॥ शंका नलगे ॥ ८८ ॥ अहोऐसाकोण्हीकाळनसे ॥ जोज्ञानेंवीणरिताअसे ॥ आतांअज्ञानतेंकैसें ॥ कास याह्मणावें ॥ ८९ ॥ अगाज्ञानक्षोभजऱ्हींनाहीं ॥ ह्मणिजेज्ञानकरीनपाहतांही ॥ अज्ञानाचीरीति तेकाई ॥ कासयाऐसी ॥ ९० ॥ अहोज्ञानाचाउत्कर्ष ॥ हातुमचामतनिर्देश ॥ सिद्धांतेंसामा न्यविशेष ॥ असेनाकधीं ॥९१॥ असोज्ञानविशेषताहीनसतां ॥ अज्ञानतंवआलेंनाहींश्रवणपंथा॥ अज्ञानाचीवार्ता ॥ नाऐकतीकान ॥ ९२ ॥ कानाखालींदडेह्मणिजेऐसें ॥ जेंश्रवणासीविषयहो तनसे ॥ आतांशब्दींजेंदिसे ॥ तेंतंवस्फुरद्रूप ॥ ९३ ॥ अगाअज्ञानह्मणिजेनाहींज्ञान ॥ तेंकेवींश ब्दासीउठवीजाण ॥ ज्ञानलोपवितेंकोण ॥ अज्ञानाभासवितें ॥९४॥ आतांअज्ञानकारणनव्हे ॥ तरी कारणेंवीणकार्यनसंभवे ॥ ज्ञानापासूनअज्ञानहोआवें ॥ हेंतंवसर्वथानघडे ॥ ९५ ॥ अज्ञानाची करणी ॥ ऐकिलीनाहींजीकानीं ॥ श्रवणाबोधवितेंझणी ॥ अज्ञानह्मणाल ॥ ९६ ॥ अहोश्रवणश ब्देंयेणें ॥ मनचक्षुरादिकेंकरणें ॥ इत्यादिकांसीविषयझणे ॥ अज्ञानहोय ॥ ९७ ॥ जेंश्रवणासीक रीश्रवणाधिकारी ॥ जेंकींडोळ्यांतेंदेखतेंकरी ॥ असोमनादिकेंस्वव्यापारीं ॥ प्रवर्ततीजेणें॥९८॥ तेंझणीहोईलअज्ञान ॥ शंकाघेऊननघ्यावेंरान ॥ एवंअज्ञानसद्भावींजाण ॥ अबद्धमत ॥ ९९ ॥ आतांजरीकरणीवीण॥ ह्मणालहेंएकअज्ञान ॥ तरीहेंमतकोण ॥ मानीलसाच ॥ १०० ॥ करणी वीणअज्ञान ॥ ह्मणालप्रत्यक्षअसेलजाण ॥ तेंअज्ञानदेखेऐसेंकोण ॥ आहेयेथें ॥ १ ॥ देखिजेजेंना आयिकीजे ॥ बुध्यादिकींहीनेणिजे ॥ करणीचिकांहींनुपजे ॥ अज्ञानकरी ॥ २ ॥ उक्तंच ॥ येनश ब्दंरसंरूपंगंधंजानासिराघव ॥ तमात्मानंपरंब्रह्मजानीहिपरमेश्वरं ॥ १ ॥ इतिवासिष्ठे ॥ ॥ तरी अज्ञानाचीअस्तिक्यता ॥ मानावीआतांकवणियासत्ता ॥ एवंज्ञानहीनक्षोभतां ॥ श्रवणासीनये ॥३॥ उक्तंच ॥ खलुनाभासतेभानंब्रह्मवस्त्वेवकेवलं ॥ भानसंबंधतोभानमितिवार्ताप्यसंगता ॥ ॥ इतिब्रह्मगीतायां ॥ अज्ञानह्मणिजेअप्रकाशमान ॥ तरीतेथूनकेवींघडेहेंभान ॥ आतांभानभानें करून ॥ हेंहीनघडे ॥४॥ एवंवस्तूसीनाहींखंडण ॥ आतांकैंचेंयेथेंअज्ञान ॥ अज्ञानवार्ताचिजाण॥ अज्ञाननव्हे ॥ ५॥ आशंका ॥ आत्मानिरंतरपूर्ण ॥ अनादिलटिकेंअज्ञान ॥ ऐसीतात्विकखूण ॥ प्रकटलीजेकीं ॥६॥ याप्रगटणियांऐलिकडे ॥ अज्ञानहोतेंसेनिवडें ॥ तरीअत्यंतिककेवींघडे ॥ अ ज्ञानअभाव ॥ ७ ॥ हेखूणलाधावयाकारण ॥ जालेंअज्ञानपरिहरण ॥ तस्मात्जालेंअज्ञान ॥ का रणस्थानीं ॥८॥ येआशंकेपरिहार ॥ दिधलाअसेपरिकर ॥ तेंवचनसविस्तर ॥ कीजेलस्पष्ट ॥९॥

आडसूनिअंधारीं ॥ खद्योतदीप्तिशिरीं ॥
तैसेंलटिकेवरी ॥ अनादिहोय ॥ २ ॥

अंधकाराचेनिदोषें ॥ नावेकखद्योतींदीप्तिभासे ॥ मगसूर्योदयींआपैसें ॥ उमगेचिनातें ॥ ११० असतांहीअंधारीं ॥ दीप्तिभासेदीप्तिनकरी ॥ मगस्पर्शतांहीसूर्यकरीं ॥ असेलकाई ॥ ११ ॥ अं धकारींजऱ्हींभासे ॥ तऱ्हींदीप्तिकरुनव्हेजैसें ॥ तेवींअज्ञानऐसेंदिसे ॥ परीअज्ञाननव्हे ॥ १२ ॥ खद्योतहीप्रकाशहीन ॥ तमहींतंवतैसेंचजाण ॥ तेथेंनावेकद्रुटद्रुटीतेकोण ॥ साचमानी ॥ १३ ॥ तेवींअज्ञानभावितांही ॥ अज्ञानत्वतेथेंनाहीं ॥ आतांसिद्धप्रत्ययीं ॥ कायअनुमानत्याचें ॥ १४ ॥ अहोअप्रत्ययआणिअज्ञान ॥ रूपएकचिजाण ॥ तरीअसेप्रत्ययेंवीण ॥ तेंसाचकेवीं ॥ १५ ॥ अप्र त्ययासीचपाहीं ॥ अप्रत्ययत्वनाहीं ॥ ह्मणोनभाविलेंजेंकांहीं ॥ तेंअज्ञाननव्हे ॥ १६ ॥ नेणीवेचें पांघुरण ॥ घेऊनभासेअज्ञान ॥ तेथेंहीअज्ञानपण ॥ नसेतया ॥ १७ ॥ अहोनेणीवेचेमिश ॥ वां

चूनजाणीवसावकाश ॥ कांजेंवस्तुनिर्दोष ॥ काळत्रयीं ॥ १८ ॥ जाणीवेनसतांहानी ॥ कैंचीअज्ञानाचीमिरवणी ॥ एवंनेणीवेसीभेदूनि ॥ जाणीवचसंचली ॥ १९ ॥ ह्मणोनअज्ञानाचियाअखंडता ॥ ज्ञानाचीपावेप्रकटता ॥ तेंअज्ञानाचाभावधरित ॥ न्यायाचुकी ॥ १२० ॥ जेवींलहरीआडकरूनि ॥ लहरींमाजींलपेपाणी ॥ मागुतीलहरीनिवारूनि ॥ आपणप्रकटे ॥ २१ ॥ तेवींआपलेपडपें ॥ स्वरूपआपणामाजींलपे ॥ मगआपलेनिचप्रतापें ॥ आपणप्रकटे ॥ २२ ॥ एवंभावितांही अज्ञान ॥ भावनाचनसेज्ञानहीन ॥ आतांलटिकेंपरीजाण ॥ अनादिअसे ॥ २३ ॥ ज्ञानाचेनिस्वभावें ॥ अज्ञानकिंचित्भासावें ॥ त्याभासासवें ॥ अवघेंजगचि ॥ २४ ॥ एवंअज्ञानत्वरूपाआलें परीकार्यनिर्वाहकनाहींजालें ॥ ह्मणोनउमटलेंअसतांचगेलें ॥ हारपोनि ॥ २५ ॥ आतांहाअनादिस्वभाव ॥ तोशब्दींचपावेबरव ॥ जेवींखद्योतींतेजभाव ॥ अंधारींधरिला ॥ २६ ॥ परंतुलटिकेपणतंवनचुके ॥ ऐसेंचिदृष्टांतेंसीनिकें ॥ बोलिलाअसेकौतुकें ॥ मूळप्रबंधें ॥ २७ ॥

जैसीस्वप्नास्वप्नींमहिमा ॥ तमींमानुअसेतमा ॥
तेवींअज्ञानगरिमा ॥ अज्ञानींचि ॥ ३ ॥

स्वप्नींस्वप्नाचें ॥ परीलटिकेपणतंवनवचे ॥ तेवींअज्ञानतमींतमाचें ॥ महिमानअसे ॥ २८॥ तेथेंअंधारासीचअंधारपण ॥ असेकार्यकारणेंवीण ॥ भासलेंअसतांचिजाण ॥ निर्वाहनपवे ॥ २९॥ परंतुप्रकाशाच्याघरीं ॥ नसोनहेउगीचवारी ॥ तेवींवास्तव्यनाहींजऱ्हीं ॥ तऱ्हींअज्ञानत्वआवडे ॥ १३० ॥ अहोअज्ञानऐसेंबोलतांजाण ॥ केवळशब्दचशोभायमान ॥ वांचूनअर्थतत्वेंप्रमाण ॥ मानूंनयेकीं ॥ ३१ ॥ भावितांचिअज्ञान ॥ भावनामात्रचिजाण ॥ जैसेंस्वप्नींचेंसाचपण ॥ स्वप्नींच असे ॥ ३२ ॥ ह्मणोनिअज्ञानाचीथोरी ॥ अज्ञानींचिअसेखरी ॥ परीजाणावयाचीपरी ॥ येथेंनाहीं ॥ ३३ ॥ अहोजाणावयाजेंनाहीं ॥ तेंअसोनकाजकाई ॥ पुढेंइयेविषयीं ॥ दृष्टांतअसे ॥ ३४॥

कोल्हारीचेवारु ॥ नयेतीधारकींधरूं ॥
नयेलेणाशृंगारु ॥ वोडंबरीचा ॥ ४ ॥

जेवींगंधर्वनगरींच्यावारुवांपांहीं ॥ दिसतचसाचपणनाहीं ॥ तेवींचिवोडंबरीचेंजेंकांहीं ॥ दिसतचिमिथ्या ॥ ३५ ॥ हेंदिसेतैसेंनाहीं ॥ तेवींअज्ञानत्वरूपायेतांही ॥ नसेतेथेंकांहीं ॥ अज्ञानार्थु ॥ ३६ ॥ अहोजेंजेंकांहींप्रमेयजाण ॥ त्यासीअर्थाचेनिअसेसाचपण ॥ येथेंविचारितांनिपटून ॥ कोरडाचिशब्दु ॥ ३७ ॥ अहोभलतेहीपदार्थीं ॥ वादकीजेआथीनाथी ॥ तेथेंबुझावितांसिद्धांतीं ॥ विचारूनिपाहा ॥ ३८ ॥ मगविचारजेथेंस्थिरावे ॥ तेंचसत्यत्वायोंपावें ॥ आणिविचारेंजेंअभिभवे ॥ तेंपहिलेंचनाहीं ॥ ३९॥ एवंअज्ञानभावेंअज्ञान ॥ पावलेंनाहींसाचपण ॥ मांपाहिजेजेंनिर्वाळून ॥ तेथेंकैंचें ॥ १४० ॥

हेंजाणणेंयाच्याघरीं ॥ खोंचिलेंहीआननकरी ॥
कायीचांदिणांउठेलहरी ॥ मृगजळाची ॥ ५ ॥

पहिलेंचजैंनाहींजाण ॥ तेंविचारेंकायहोईलआन ॥ ह्मणिजेजाणतांसाचपण ॥ येईलकैंचें ॥ ॥ ४१ ॥ नसोनवाउगेंभान ॥ तेंहीनदिसेनिपटून ॥ लाधलियाखूण ॥ सम्यक्ज्ञानाची ॥ ४२॥ जेवींप्रकटलियाशांतचंडकीर्ण ॥ तेथेंकेवींउठेमृगजळभान ॥ तेवींअखंडैकजैंज्ञान ॥ तैंअज्ञान कैंचें ॥ ४३॥ सूर्यप्रकाशींजाण ॥ मिथ्याचपरीउगेंचभान ॥ त्याप्रकाशासीजैंसौम्यपण ॥ तेथेंभा

नहीनसे ॥४४॥ तेवींज्ञानींजंवज्ञानपण ॥ तेथेंनाथिलेंचिपरीअज्ञानभान ॥ आतांज्ञानींचनाहींज्ञातृत्वजाण ॥ तेथेंअज्ञानकैंचें ॥ ४५ ॥ ह्मणोनजालियासम्यक्ज्ञान ॥ देखिलेंअज्ञानाचेंपरिहरण॥ यापूर्वपक्षास्तवजाण ॥ निरोपिलेंऐसें ॥ ४६ ॥ पुढेंहीहेंचिदृढीकरण ॥ करावयाउक्तनिरोपण॥ सिद्धाचासिद्धजाण ॥ उपपादितअसे ॥ ४७ ॥

आणिज्ञानहेंजेंह्मणिजे ॥ तेंअज्ञानचिपांदुजें ॥
एकलपवूनदाविजे ॥ एकनव्हे ॥ ६ ॥

अगाऐसेंजेंमानिलेंकांहीं ॥ जेंज्ञानोदयींअज्ञाननाहीं ॥ येऱ्हवींतंवपाहीं ॥ पाहेचऐसें ॥ ४८ ॥ जरीजालियाज्ञानाचाउदय ॥ मानिजेअज्ञानाचालय ॥ तरीअज्ञानहाअभिप्राय ॥ ज्ञानासीचये ॥ ॥४९॥ तेथेंअज्ञानदिसेलोपलें ॥ परीज्ञानत्वेंतेंचिउठलें ॥ मगकैसेंनहीहरलें ॥ नजायतेंकीं॥१५० अहोवास्तवेंअज्ञानअसे ॥ तरीअज्ञानभासकुचिभ्रंशे ॥ मगकैसेनहीनसे ॥ नाशिलियाही ॥ ५१ ॥ ह्मणोनवास्तवेंनसेअज्ञान ॥ तेंनाशोनसम्यक्ज्ञान ॥ ऐसीकांहींखूण ॥ अठवेजरी ॥ ५२ ॥ तरी ज्ञानासीआलेंलटिकेपण ॥ नसोडिचयेथअज्ञान ॥ तैंज्ञानाभिधान ॥ विटंबनमात्र ॥ ५३ ॥ तरी हेंआहेकींनाहीं ॥ ऐसेंपाडावयाठायीं ॥ पुढेंइयेचविषयीं ॥ चालिलाग्रंथु ॥ ५४ ॥

असोआतांहाप्रस्तावो ॥ अर्धीअज्ञानाचाधांडोळाघेवो ॥
मगतयाचासाचीलाहो ॥ ज्ञानहीलटिकें ॥ ७ ॥

अज्ञानआणिज्ञानअसे ॥ तरीदोहींसव्यर्थतादिसे ॥ ह्मणोनहेंअसोऐसें ॥ बोलिलामुळीं ॥ ॥ ५५ ॥ अज्ञानाचामागुघेतां ॥ तेंसत्यत्वेंनसांपडेहाता ॥ तरीज्ञानलटिकेंह्मणतां ॥ लाजकाई ॥ ॥५६॥ह्मणोनअज्ञानआहेकिंवानाहीं ॥ हेंआदरेंपाडावेंठायीं ॥ उक्तीइयेविषयीं ॥ परिकराअसती

याअज्ञानज्ञानातें ॥ अंगींचिआहेजिथें ॥
तरीजेथेंअसेतयातें ॥ नेणकांनकरी ॥ ८ ॥

अहोअज्ञानपदार्थनव्हे ॥ मास्वतंत्रेंचअसोंलाहे ॥ आतांधर्ममात्रचिआहे ॥ तरीप्रमाणानये ॥ ॥५८॥ हेंअज्ञानजेथेंअसतें ॥ तैंअसताठावनेणकरितें ॥ तरीऐसाठावनाहींजेथें ॥ अज्ञानअसेहें ॥ ॥५९॥ काळत्रयाच्याठाईं ॥ ज्ञानासीहानीनाहीं ॥ तरीअज्ञानहेंपाहीं ॥ कोठेंअसेपां ॥ १६० ॥ तृणापासूनब्रह्मवरी ॥ एकिचैतन्याचीचकुसरी ॥ पूर्णत्वाहारी ॥ आलीचनाहीं ॥ ६१ ॥ एवंपूर्णानंदसागरीं ॥ उठेलअज्ञानलहरी ॥ हेंकायचतुरीं ॥ मानूंयेईल ॥६२॥ संमतिः ॥ यद्वात्मानंसकलवपुषामेकमंतर्बहिस्थंदृष्ट्वापूर्णंखमिवसततंसर्वभांडस्थमेकं ॥ नान्यत्कार्यंकिमपिसततंकारणाद्भिन्नरूपंनिस्त्रैगुण्येपथिविचरतांकोविधिःकोनिषेधः ॥ १ ॥ इतिशुकोक्तिः ॥ ॥ एवंकार्यकारणाहून ॥ सर्वथानुठीभिन्न ॥ ह्मणोननिपटूनअज्ञान ॥ सद्भावानये ॥ ६३ ॥

अज्ञानजेथेंअसावें ॥ तेणेंसर्वनेणहोआवें ॥
ऐसीजातिस्वभावें ॥ अज्ञानाची ॥ ९ ॥

अज्ञानाचाअर्थ ॥ नेणणेंयाचासंकेत ॥ तरीस्फुरद्रूपसमस्त ॥ आइतेंअसे ॥ ६४ ॥ त्यास्फुरद्रूपाच्याठाईं ॥ अज्ञानअसतेंकांहीं ॥ तरीस्फुरद्रूपचिपाहीं ॥ लोपातेंपावतें ॥ ६५ ॥ मगअज्ञानें कोठेंउमटावें ॥ चराचरेंकेवींअसावें ॥ ह्मणोनअज्ञानसद्भावपावे ॥ ऐसेंनाहीं ॥ ६६ ॥ आतांमागुतापूर्वपक्षघेऊन ॥ पुढेंबोलिलासेवचन ॥ आणीकपदेंचिपरिहरण ॥ करीलत्याचें ॥ ६७ ॥

तरीशास्त्रमतऐसें ॥ जेआत्माचिअज्ञानअसे ॥
आणितेणेंचितोगिवसे ॥ आश्रोजरी ॥ १० ॥

मतांतरेंऐसेंआहे ॥ जेंआत्माचिअज्ञानजेंहें ॥ पूर्वार्धेंऐसीहे ॥ आशंकाकेली ॥ ६८ ॥ येथील उरलेंअर्धपद ॥ लाऊनपुढेंसंबंध ॥ आशंकाविविध ॥ निराकरिजे ॥ ६९ ॥

तरीनुठितांदुजें ॥ जैंअज्ञानआहेबीजें ॥
तैंतेचिआथीहेंबुझे ॥ कोणयेथें ॥ ११ ॥

मतवादीऐसेंबोलिला ॥ हाचिआश्रोतुह्मांगिवसला ॥ तरीमतपक्षचिउडाला ॥ त्याचेचि बोलें ॥ १७० ॥ जंअज्ञानदुजेंनाहीं ॥ आत्माचिअज्ञानकांहीं ॥ तरीआत्माअज्ञानपाहीं ॥ बुझतें कोण ॥ ७१ ॥ किंवाअज्ञानचअसतेंबीजें ॥ तैंतेथूनकैंचेंउठतेंदुजें ॥ जेणेंदुजेनजाणिजे ॥ आत्मा अज्ञान ॥ ७२ ॥ तस्मात्अज्ञानाहूनवेगळें ॥ त्यासीचिअज्ञानऐसेंकळे ॥ आत्माआत्मलीळे॥ज्ञान रूप ॥ ७३ ॥ आत्माअसेअज्ञान ॥ तरीआत्मयाजाणतेंकवण ॥ करणेंमनादिकरून ॥ जाणती काई ॥ ७४ ॥ विषयभोग्यहोती ॥ परीस्वताभोगनपवती ॥ विषयांचीग्रहणशक्ति ॥ इंद्रियेंवर्तें ॥ ७५ ॥ तेइंद्रियेंप्राणेंवीण ॥ स्वतांनपावतीचळण ॥ तेइंद्रियेंआणिप्राण ॥ मनेंवीणस्तब्ध॥७६॥ आतांअवघ्यांसीअधिष्ठून ॥ आलेंमनासीयामनपण ॥ त्यामनाचेंरूपजाण ॥ संकल्पमात्र ॥७७॥ त्यासंकल्पींसंकल्पपण ॥ नसेसंकल्पाअधीन ॥ त्याचेंहीअधिष्ठान ॥ चैतन्यमात्र ॥ ७८ ॥ एवं इंद्रियादिविलासेंजाण ॥ विलासलेंएकलेंचैतन्य ॥ चैतन्यह्मणिजेपूर्ण ॥ ज्ञानमात्र ॥७९॥ अहो हेमनचक्षुरादिकें ॥ सर्वथाअबोधात्मकें ॥ बोधरूपअसकें ॥ आत्मस्वरूप ॥ १८० ॥ त्याबोधस्व रूपेंवीण ॥ रूपासीचयेपैंकोण ॥ एवंसर्वत्रसर्वदापूर्ण ॥ बोधमात्र ॥ ८१ ॥ त्याबोधरूपालोप नाहीं ॥ ह्मणोनतेथेंनसेअन्यथाकांहीं ॥ जेवींघृतत्वेंनसेपाहीं ॥ कणिकाउगउ ॥ ८२ ॥ एवंआ त्मानिखळज्ञानघन ॥ तोआत्माजरीअज्ञान ॥ तरीअज्ञानचिकोण ॥ जाणतेंपांयेथें ॥ ८३ ॥ एवं यापदाचेंविवरण ॥ जाहालेंपुढिलेपदींअनुमोदन ॥ तेंहींआतांसावधान ॥ परिसावेंहोजी॥८४॥

अज्ञानतंवआपणयातें ॥ जडपणेंनेणेंनिरुतें ॥
आणिप्रमाणप्रमाणातें ॥ होतआहे ॥ १२ ॥

आतांआत्माजरीअज्ञान ॥ तरीअज्ञाननिखळजडपण ॥ आणितेंआपणयांजाण ॥ जडत्वेंनेणें ॥ ८५ ॥ आणिअज्ञानहेंप्रमाण ॥ प्रमाणींसाधिलेंसेजाण ॥ ह्मणोनप्रमाणासीकारण ॥ अज्ञान नव्हे ॥ ८६ ॥

यालागींजरीअज्ञान ॥ करीलआपुलेंज्ञान ॥
हेंह्मणतखेवोघेववीमौन ॥ विरोधुचि ॥ १३ ॥

यालागींअज्ञानहेंप्रमाण ॥ अज्ञानेंचकेलेंसेजाण ॥ ऐसेंहेंवलगण ॥ अर्थहीन ॥ ८७ ॥ अहो जियेबोलींअर्थुनाहीं ॥ तोबोलचिनव्हेपाहीं ॥ ह्मणोनअज्ञानविषयकांहीं ॥ बोलतांचिमौन ॥८८॥ ह्मणोनअज्ञानप्रमाणजेंहें ॥ तेंआत्मेनिप्रकाशिलेंपाहें ॥ तेंआत्मत्वींकेवींसाहे ॥ अज्ञानहेतू ॥८९॥ यालागींआत्मत्वींअज्ञान ॥ हेंमुख्यविरुद्धवचन ॥ आतांअज्ञानासस्वतंत्रपण ॥ अर्थुचिनघडे ॥१९०॥ अज्ञानेंजरीअसावें ॥ तरीजाणतयानेणकरावें ॥ तरीजाणतेंतेंस्वभावें ॥ वस्तुमात्र॥९१॥

अहोजाणतेंदुसरेंअसतें ॥ तरीएकासीअज्ञानेंआवरिजेतें ॥ दुसरियानेंजाणिजेतें ॥ अज्ञानऐसें ॥ ९२ ॥ ॥ उक्तंच ॥ वस्तुतोनास्तिचाज्ञानंचित्प्रकाशविरोधतः ॥ इतिब्रह्मगीतायां ॥ अहो ऐसेंकैंचेंअज्ञान ॥ जेंचित्प्रकाशापडेआवरण ॥ आतांचित्प्रकाशानावरितांजाण ॥ अज्ञानतेंकि मात्मक ॥ ९३ ॥ एवंअज्ञानसमूळनाहीं ॥ वस्तुएकलीकालत्रयीं ॥ ह्मणोनयेविषयीं ॥ पुढेंही बोले ॥ ९४ ॥

आणिजाणतीवस्तुएक ॥ तेयेणेंअज्ञानेंकीजेमूर्ख ॥
तैंअज्ञानहेंलेख ॥ कवणधरी ॥ १४ ॥

ह्मणोनस्वरूपाहूनिकांहीं ॥ जाणणेंदुसरेठायीं ॥ वस्तुतातरीनाहीं ॥ निर्धारेंसी ॥ ९५ ॥ ॥ श्रुतिः ॥ जाग्रत्स्वप्नसुषुप्त्यादिप्रपंचोयत्प्रकाशते ॥ तद्ब्रह्माहमितिज्ञात्वासर्वबंधात्प्रमुच्यते ॥ १ ॥ इति ॥ एवंसर्वप्रकाशाचेंस्थान ॥ एकलेंवस्तुमात्रज्ञान ॥ तेंजरीयेणेंअज्ञानेंजाण ॥ कीजेतेमूर्ख ॥ ९६ ॥ अहोअज्ञानाचीखूण ॥ तेंनेणणेंचिनिखळपूर्ण ॥ अहोमूर्खासीमूर्खपण ॥ प्रत्ययानयेपैं ॥ ९७ ॥ यालागींजाणणेंहोयमूर्ख ॥ तरीअज्ञानाचेंनसतेंलेख ॥ ह्मणोनचिवस्तुएक ॥ कालत्रयींकीं ॥ ९८ ॥ आतांअज्ञानासीअज्ञानभान ॥ तरीअज्ञानतेंचिज्ञान ॥ येणेंहीअज्ञान ॥ नाहींचजालें ९९ अहोअज्ञानप्रत्ययायेतें ॥ तरीसुखेंआहेह्मणिजेतें ॥ ह्मणोनिपुढेंमागुतें ॥ बोलतुअसे ॥ २०० ॥

अहोआपणयांहीपुरता ॥ नेणुनकरवेजाणता ॥
तयातेंअज्ञानह्मणतां ॥ लाजिजेकीं ॥ १५ ॥

जाणतयानेणनकरी ॥ तरीअज्ञानइहींउत्तरीं ॥ अक्षरांचीहारी ॥ व्यर्थचिजाली ॥ १ ॥ अहो आत्मत्वींहेनमखे ॥ अथवानिराळेंहीअसोंनसके ॥ तरीअज्ञानआहेहेंअसकें ॥ वलगणमात्र ॥२॥ एवंजाणीवेनकरितांआवरण ॥ आहेह्मणावेंअज्ञान ॥ इयेलाजेसमान ॥ लाजआहे ॥ ३ ॥

आभाळेंभानूग्रासे ॥ तैंआभाळकोणेंप्रकाशे ॥
सुषुप्तिसुषुप्तयारुसे ॥ तैंतेचिकोणा ॥ १६ ॥

अहोअज्ञानजरीसत्यअसतें ॥ तरीआत्मयानेणकरितें ॥ मगअज्ञानऐसेंयातें ॥ ह्मणतेंकोण ॥४॥ जेवींसूर्यप्रकाशेंकरून ॥ अभ्रत्वेंअभ्रदिसेजाण ॥ तेंसूर्यासीलोपीतरीकोण ॥ देखतेंअभ्र ॥ ५ ॥ अगासूर्यरश्मीचाप्रभव ॥ उमटेअभ्राचाभाव ॥ परीसूर्यचिअभ्रास्तव ॥ आच्छादेनाकीं ॥ ६ ॥ तेवींआत्माअज्ञानजाला ॥ मगअज्ञानपक्षकोणेंदेखिला ॥ निद्रिस्तुनिदानिमाला ॥ तरीनि द्राचिकैंची ॥७॥ ह्मणोनतुर्यपुरुषाच्याठाईं ॥ निद्रेचाआडळचिनाहीं ॥ तोअसेकाळत्रयीं ॥ देख णापुरुषु ॥ ८ ॥ तोजरीनिद्रेनेंनिमे ॥ मगयानिद्रेचेनिसंभ्रमे ॥ आपलेसुखींरमे ॥ ऐसाकवणु॥९॥ आतांयेविषयींदृष्टांत ॥ पुढिलेंपदींअसेदिसत ॥ तेंचिआतांदत्तचित्त ॥ अवधाराहोजी ॥२१०॥

तैसेंअज्ञानअसेजेथें ॥ तेंचिजरीअज्ञानआतें ॥
तरीअज्ञानअज्ञानातें ॥ नेणतांगेलें ॥ १७ ॥

अज्ञानाचेंअधिष्ठान ॥ तेंजरीजालेंअज्ञान ॥ तरीसहजचिनेणतपण ॥ नेणोनिगेलें ॥११॥ जेवीं निरंजनोकोण्हीनिमाला ॥ तोनिमालेसाहितबुडाला ॥ तोनिमालायाबोला ॥ विषयचिनव्हे ॥ १२ ॥ ह्मणोननेणतयाचेंनेणपण ॥ नेणिवेमाजींबुडालेंजाण ॥ त्याचीवार्ताहीकोण ॥ करिजेतीपहा॥१३

आतांसाक्षसाक्षत्वेंवीण ॥ निखळचिजरीअज्ञान ॥ तरीयेवढेंचिद्विलासभुवन ॥ बुडोनिजातें ॥
॥ १४ ॥ अहोआत्मेनिअवघेंनांदे ॥ तोआत्माअज्ञानेंबाधे ॥ तरीहेबोधविनोदें ॥ जगचिनसतें ॥
॥ १५ ॥ ह्मणोनयेथेंऐसेंनाहीं ॥ चिद्विलासनीचनवापाहीं ॥ हेंअज्ञानत्वेंचिठायीं ॥ ठेविलेंजेणें
॥ १६ ॥ यालागींपुढेंजाण ॥ बोलिलाउपपत्तिकरून ॥ श्रोतांद्यावेंअवधान ॥ कृपाकरूनि ॥ १७॥

नातरीअज्ञानएकघडे ॥ हेंजयास्तवनिवडे ॥
तेंअज्ञानन्व्हेंफुडें ॥ कोणेंकाळीं ॥ १८ ॥

यालागींआत्मत्वजरीसंचलें ॥ तरीचअज्ञानऐसेंनिवडलें ॥ तेंअज्ञानयेणेंबोलें ॥ सिणवीका ह्या ॥१८॥ जेवींभ्रमितासीभ्रमुजाणवे ॥ तेंभ्रमुचितेथेंनसंभवे ॥ आतांभ्रमकाळींहीजाणीवें ॥ सां डिलानाहीं ॥ १९ ॥ अहोभ्रमाचीप्रत्यक्षतानाहीं ॥ तेंशाहाणाचिमीह्मणेंपाहीं ॥ यालागींकाळत्र यीं ॥ भुलिचिनाहीं ॥ २२० ॥ तेवींअज्ञानहेंप्रमाण ॥ हेंद्रष्ट्यानिद्योतिलेंजाण ॥ ह्मणोनद्रष्टेपण ॥ आवरलेंनाहीं ॥ २१ ॥ तोंअज्ञानेंअज्ञानन्व्हे ॥ तरीअज्ञानकासयाह्मणावें ॥ आतांअज्ञानवादा अघवें ॥ व्यर्थत्वचिआलें ॥ २२ ॥ जरीअज्ञानसत्यअसतें ॥ तरीजाणतेपणमावळतें ॥ यालागीं नघडेनिरुतें ॥ हेंचिसिद्ध ॥ २३ ॥

पडळहीआथीडोळा ॥ आणिडोळान्व्हेआंधळा ॥
तरीआथीयापोकळा ॥ बोलियाकीं ॥ १९ ॥

डोळयानकरीअंध ॥ तेंपडळहावृथावाद ॥ तेवींजाणनयांनाहींबाध ॥ तेंअज्ञानकैंचें ॥ २४ ॥ अहोअज्ञानहेंप्रमाण ॥ परीनमळेनिखळज्ञान ॥ एवंज्ञानचिप्रत्यक्षजाण ॥ अज्ञानवाद ॥ २५ ॥ ए वंअज्ञाननघडेह्मणोनि ॥ पुढेंदृष्टांतांचीश्रेणी ॥ चालिलीसेतेसज्जनीं ॥ अवधारीजोजी ॥ २६ ॥

इंधनाच्याअंगीं ॥ खवळलेनआगी ॥
तेंनजळेतैंवाउगी ॥ शक्तिचिते ॥ २० ॥

कींइंधनींअग्निप्रकटे ॥ आणिइंधनतैसेंचिठाके ॥ तेंप्रकटलाहेंअसकें ॥ वाउगेंजालें ॥ २७ ॥ते वींअज्ञानप्रकटलें ॥ आणिज्ञातेपणअसेसेंचलें ॥ तरीव्यर्थचिवोडवलें ॥ बोलणेंहें ॥ २८ ॥

अंधारुकोंडोनघरीं ॥ घरापडसाईनकरीं ॥
तैंअंधारइहींअक्षरीं ॥ नह्मणावाकीं ॥ २१ ॥

किंवापडसाईनाहींपडली ॥ अंधारइहींबोलीं ॥ बोलतांजेवींआली ॥ वृथाकुटी ॥ २९ ॥ ते वींजगदांध्यजालेंनाहीं ॥ आत्मकळाठायींच्याठायीं ॥ तरीअज्ञानवादाकाई ॥ आतुडेयेथें ॥२३०॥

वोजावोंनेदीजागणें ॥ तयेनिदेतेंनिद्कोणह्मणे ॥ दिवसाना
णीउणें ॥ तैंरात्रिचिकैंची ॥ २२ ॥ तैसेंआत्माअज्ञानअसकें ॥
अ[illegible]के ॥ तैंअज्ञानशब्दालटिकें ॥ आलेंचिकीं ॥ २३ ॥

जागणेंवोजावलेंनाहीं ॥ ह्मणिजेसंचलेंजागणेंपाहीं ॥ आणिनिद्राआलीहेकायी ॥ प्रमाणगोष्टी ॥ ३१ ॥ किंवारात्रिसमयोजाला ॥ आणिदिवसनाहींमावळला ॥ तरीरात्रियाबोला ॥ साचप णकैंचें ॥ ३२ ॥ तेवींजितुकेंजेंजेंविलासमान ॥ मिळोनमोटकेंआत्मज्ञान ॥ तेंअसकेंअज्ञानन्व्हे

तरीजाण ॥ तेंचिकैंचें ॥३३॥ अहोजेंजेंजियेठायीं ॥ असतेंज्ञानमात्रचिपाहीं ॥ ऐसियेंचिन्मात्रडोहीं ॥ अज्ञानकैंचें ॥३४॥ आत्माज्ञानमात्रनसतां ॥ तरीअज्ञानहोऊनअसता ॥ आतांत्याज्ञानाचा नाशहोता ॥ आत्मघातचिकीं ॥ ३५॥ आत्माहज्ञात्रज्ञान ॥ तेंजालेंजैंअज्ञान ॥ आत्मनाशकाय आन ॥ याहूनिअसे ॥ ३६ ॥ आहोआत्मनाशहोता ॥ तरीअभावचिअवघाअसता ॥ उद्धवलयें सीनसता ॥ जगाचामार्ग ॥ ३७ ॥ अहोअवघेंअसतेंशून्य ॥ मगअज्ञानकिमात्मककोण ॥ याला गींवृथावल्गन ॥ काजकाई ॥ ३८ ॥ अहोआत्मयावेगळें ॥ कांहींअसतेंनिराळें ॥ तरीयेथैंभाविलें ॥ अज्ञानजात ॥ ३९ ॥ आतांआत्माअज्ञाननोहे ॥ परीतेथेंचिअज्ञानआहे ॥ ऐसेंह्मणालतरी वाये ॥ बोलणेंचिहें ॥ २४० ॥ अहोउगाचिबोलाहीजाण ॥ नदिसेशोभायमान ॥ येविषयींनिरूपण ॥ पुढेंहीअसे ॥ ४१ ॥

येऱ्हवींतरीआत्मयां ॥ मार्जीअज्ञानअसावया ॥
कारणह्मणतांन्याया ॥ चुकीयेईलकीं ॥ २४ ॥

आत्माआणिअज्ञान ॥ हेंवचनचिअघटमान ॥ विचारेंनव्हेंप्रमाण ॥ आणिन्यायाहीचुकी ४२ अहोहेअनुभवाचीमात ॥ परीतेअसोप्रस्तुत ॥ आतांन्यायेंहेंघडत ॥ कींनघडेपाहा ॥ ४३ ॥ येचिविषयींनिरूपण ॥ असेदृष्टांतेंसहवर्तमान ॥ तेंहीसांगोंविवरण ॥ अवधानद्यावें ॥ ४४ ॥

अज्ञानतममेळणी ॥ आत्माप्रकाशाचीखाणी ॥
आतांदोहींमिळणी ॥ एकींकैसी ॥ २५ ॥

अहोअज्ञानजातीचेंतम ॥ आत्माप्रकाशाचेंधाम ॥ यादोहींसीसमागम ॥ असेकेवीं ॥ ४५ ॥ हेंपरस्परेंविरोधि ॥ ह्मणोननघडेउभयांसीसंधि ॥ एवंअज्ञानवादीबुद्धि ॥ उमसूंनेघे ॥ ४६ ॥ अहोसाचजरीअज्ञान ॥ तरीआत्मत्वींचनघडेजाण ॥ आतांआत्माजरीसनातन ॥ तरीअज्ञानचिनघडे ॥ ४७ ॥ आतांघडेजरीह्मणतसा ॥ तरीहेंचिआतांपरियसा ॥ विरोधियांसहसा ॥ संधिचिनघडे ॥ ४८ ॥

स्वप्नआणिजागरु ॥ आठउआणिविसरु ॥ इयेंयुग्मेंएकाहारु ॥
चालतींजरी ॥२६॥ शीतातपाएकवट ॥ वाहेवस्तीचीवाट ॥
कांतमेंबांधिजेमोट ॥ सूर्यरश्मीची ॥ २७ ॥ नानारातिआ-
णिदिवो ॥ येतीएकेठायींराहों ॥ तैंआत्माजीवेजीवो ॥
अज्ञानाचेनि ॥ २८ ॥

अहोस्वप्नआणिजागृती ॥ नावेकतैसींचदिसती ॥ परीस्वप्नाचीसंपत्ति ॥ जागृतीसनाहीं ॥ ४९ ॥ तस्मात्जागृताच्याठायीं ॥ स्वप्नअसोंचनसेकेपाहीं ॥ तेवींआत्मत्वींनाहीं ॥ अज्ञानहेतू ॥ २५० ॥ अथवास्वप्नशब्देंनिद्राचिघडे ॥ तयाजागृतीसीसंगनघडे ॥ तेवींआत्मत्वींनजोडे ॥ अज्ञानसंगु ॥ ५१ ॥ आत्माजागानिरंतर ॥ तेथेंकैंचेंअवस्थांतर ॥ हेंजाणतीचतुर ॥ प्राप्तपुरुष॥५२॥ अहोजागृतेंपुरुषेंकांहीं ॥ जागृतीवीणनेणिजेचिकांहीं ॥ तेंदेखणीकळापाहीं ॥ नव्हेचेस्वप्न ५३ तेविषयींचिद्विलासपाटणीं ॥ नुमटेअज्ञानाचीमिरवणी ॥ चिन्मात्रतरणी ॥ अस्तुचिनपवे॥५४॥ तेवींविसराचीखूण ॥ आठवेदेखिलीचिनाहींजाण ॥ किंवासीताचेंसंगोपन ॥ तपनकेंकरी

॥ ५५ ॥ एवंआत्मत्वींअज्ञाननसे ॥ आतांअज्ञानीआत्मावसे ॥ तरीहेंवचनवायसें ॥ निर्धारनेघे ॥ ५६ ॥ करूनसूर्यरश्मिएकवट ॥ घेइजेतमेंबांधोनमोट ॥ तरीआत्मास्वताप्रकट ॥ अज्ञानेंआवरता ॥ ५७ ॥ आत्मयागवसणीअज्ञानाची ॥ तरीआत्मप्राप्तीचकैंची ॥ अज्ञानेंआत्मयाची ॥ उपलब्धीकेवीं ॥५८॥ अहोअज्ञानेंआवरता ॥ तरीचित्किर्णीकोणफांकता ॥ याजगदाकाराचीवार्ता ॥ तेहीनसती ॥ ५९ ॥ ह्मणोनिआत्मत्वींअज्ञान ॥ किंवाआत्माचिअज्ञानजाण ॥ हेंअवघेंवल्गन ॥ असंबंध ॥ २६० ॥

हेंअसोमृत्युआणिजिणें ॥ येशोभतीजरीमेहुणे ॥
तरीआत्मेनिअसणें ॥ अज्ञानेसी ॥ २९ ॥

अहोआत्मत्वाचीयेखुणे ॥ मृत्युसीचनाहींजिणें ॥ मांजिणेमृत्युमेहुणे ॥ कैंचींअसती ॥ ६१ ॥ अगाजिणियातेंमृत्युमारी ॥ किंवामरणातेंजिणेंतारी ॥ ह्मणोनएकवटइतरइतरीं ॥ असोंनशकिजे ॥ ६२ ॥ एवंआत्मातंवनित्यजीवन ॥ तेथेंअज्ञानह्मणिजेनित्यमरण ॥ यालागींयाचासमागम जाण ॥ सर्वथानघडे ॥ ६३ ॥ ह्मणोनआत्मानित्यपूर्ण ॥ येथेंनिपटूननदिसेअज्ञान ॥ इयेचविषयीं जाण ॥ पुढेंहीबोले ॥ ६४ ॥

अहोआत्मेनजेंबाधे ॥ तेंचिआत्मेनसीनांदे ॥
ऐसींकाइसींविरुद्धें ॥ बोलणींइयें ॥ ३० ॥

आत्मानिखळप्रकाशघन ॥ तेथेंजरीनांदेअज्ञान ॥ तरीशीतआणिदीपन ॥ सहवासघडे ॥६५॥ किंवाउदकाच्यापोटीं ॥ वसेजरीतृषेचीखोटी ॥ तरीआत्मयाच्यापोटीं ॥ अज्ञानबैसे ॥६६॥ अहो त्रिशुद्धिअज्ञाननाहीं ॥ आत्मयाचेंशुद्धत्वयेचिठायीं ॥ तियेआत्मत्वींकायी ॥ अज्ञानवसे ॥६७॥ अबोधआणिबोधु ॥ येथेंपरस्परेंविरोधु ॥ तयांउभयतांसंबंधु ॥ कैसाघडेपां ॥ ६८ ॥ जरीअनादिअज्ञाननाहीं ॥ तरीचआत्माअनादिपाहीं ॥ पुढेंहीइयेचविषयीं ॥ बोलतुअसे ॥ ६९ ॥

अहोअंधारपणीचिपैज ॥ सांडूनअंधारतेज ॥
जालातैंसहज ॥ सूर्यचिनिभ्रांत ॥ ३१ ॥

अर्धीअंधारींअंधारपणनाहीं ॥ मगअंधारेंचतेजपाहीं ॥ हेंबोलाआलेंकांहीं ॥ परीऐसेंनव्हे ॥२७०॥ अहोतेजेंअंधकारातें ॥ देखिलेंचिनाहींनिरुतें ॥ तेथेंअंधारपणअसतें ॥ तरीलोटतेंचिना ॥ ७१ ॥ एवंअंधारींअंधारपणनाहीं ॥ तरीचतेजींतेजत्वपाहीं ॥ हेसूर्याच्याठायीं ॥ चोजवावीखूण ॥ ७२ ॥ कालत्रयींअंधारुनाहीं ॥ तरीचसूर्यसूर्यत्वपाहीं ॥ तेवींअज्ञानअर्धीचनसेंठायीं ॥ ह्मणोनिआत्मानित्य ॥ ७३ ॥

दुलाकुडपणसांडिलें ॥ आणिआगीपणमांडिलें ॥
तैंतेंचिआगीजालें ॥ इंधनकीं ॥ ३२ ॥

अहोकाष्ठदशाजाये ॥ तरीकाष्ठचिअग्निहोये ॥ परीकाष्ठअसतांनोहे ॥ अग्निचकाष्ठ ॥ ७४ ॥ तेवींरूपाआलेंसेअज्ञानपण ॥ तेंचिजरीनव्हेअज्ञान ॥ तरीचआत्माएकुचिद्धन ॥ अविनाशवंत ॥ ७५ ॥

कांगंगापावतखेवों ॥ आनपणाचाठावो ॥
सांडीतैंगंगाहो ॥ लाहेपाणी ॥ ३३ ॥

अगाओघपणजरीगेलें ॥ तरीचपाणीगंगाजालें ॥ नसतीदोनीमासले ॥ उदकींतियें ॥ ७६ ॥ नानापाणियांच्याठायीं ॥ गंगाओघमासलानाहीं ॥ तरीचगंगासमवायी ॥ ऐक्यत्वाआले॥७७॥ तेवींआत्मायाचाठाईं ॥ आत्माअनात्माहेखूणनाहीं ॥ तरीचआत्मनिर्धारेंपाहीं ॥ अज्ञानअसत्य ॥ ७८ ॥ येविषयींनिरूपण ॥ असेअनुभवाचीखूण ॥ जेनिपट्टूनअज्ञान ॥ ठाईंचनसे ॥ ७९ ॥

तैसेंअज्ञानअज्ञानहेंनोहे ॥ तरीआत्माअसकेंअसोंलाहे ॥
येऱ्हवींअज्ञानहोये ॥ लागलाचि ॥ ३४ ॥

अहोअज्ञानजेंभाविलेंआहे ॥ तेंअज्ञानकीरनोहे ॥ तरीचआत्मत्वींसाहे ॥ सर्वात्मत्व ॥२८०॥ अगाआत्मयावीणकांहीं ॥ अणुहीरितेंनाहीं ॥ आतांअज्ञानकोणेंठायीं ॥ मानिजेलसत्य ॥ ८१ ॥ नातरीआत्मयाचेनिप्रत्ययें ॥ जरीअज्ञानाचाभावहोये ॥ तरीसुखेंह्मणोये ॥ अज्ञानआथी ॥८२॥ अहोयेरहीआथीनाथी ॥ नपडेनिर्धाराचेहातीं ॥ तेनिवाडीजेसभासंतीं ॥ विचारूनि ॥ ८३ ॥ मगविचारींसांपडलें ॥ तेंचितिहींप्रमाणधरिलें ॥ विचारींजेंनाडलें ॥ तेंआपणचिनाहीं ॥ ८४ ॥ परीविचारासीभ्यालें ॥ आणिअसतेंचिनाहींजालें ॥ ऐसेंनव्हेतेंभलें ॥ अर्धीचनाहीं ॥ ८५ ॥ ह्मणोनअनादिआत्मापूर्ण ॥ तेणेंप्रत्ययजालासंपूर्ण ॥ तेथेंआतांअज्ञान ॥ केउतेंअसे ॥ ८६ ॥ यालागींअनादिहेंअज्ञान ॥ मिथ्याचिअसेआपण ॥ आत्मानवाजाण ॥ आणिलानाहीं ॥ ८७ ॥ ह्मणोनिअनादिलटिकेंअज्ञान ॥ तेंआत्मत्वींनसेजाण ॥ किंवालटिकियासीस्वतंत्रपण ॥ तेंहील टिकें ॥ ८८ ॥ तस्मात्आत्मत्वींहेंलटिकें ॥ स्वतंत्रहीअसोंनसके ॥ ऐसेंकांहींकौतुकें ॥ बोलतु असे ॥ ८९ ॥

आत्मेनसीविरोधी ॥ ह्मणोनिनुरेचिइयेसंबंधी ॥
वेगळेंतरीसिद्धी ॥ जायेचिना ॥ ३५ ॥

आत्मासकळतेजराशी ॥ जोतमाचेंनामहीग्रासी ॥ त्याच्यारूपींअज्ञानतमासी ॥ वस्तिचनघडे ॥ २९० ॥ पाहतांतयाचेंरूप ॥ तरीशब्देंहीनकरवेमाप ॥ कांजेंशब्दमात्रहीविक्षेप ॥ नसाहेजेथें ॥९१॥ तयास्वरूपाहूनिकांहीं ॥ जनींविजनींउरलेंनाहीं ॥ आतांअज्ञानेंपाहीं॥ वसावेंकोठें॥९२॥ एवंआत्मसत्तेमाझारीं ॥ अज्ञानासीनुरेउरी ॥ आतांवेगळेंचिजरी ॥ असेलअज्ञान ॥ ९३ ॥ तरीकोण्हेंहीआधारेंवांचून ॥ आधेयचिकेवींजाण ॥ कायरोगियावीण ॥ रोगचिस्वतंत्र ॥९४॥ आत्मातरीनिर्जरामरनिरामय ॥ तेथेंतरीनवसेहाआमय ॥ आतांस्वतंत्रकेवींहोय ॥ जिणेंयाचें ॥९५॥ ह्मणोनिअज्ञानाचेनिर्धारीं॥ अज्ञानासीनुरेउरी ॥ येविषयींकुसरी॥ दृष्टांतआइका ॥९६॥

लवणाचीमासोळी ॥ जहींजालीजिवाळी ॥
तरीजळींनाजळावेगळी ॥ नजीयेजेवीं ॥ ३६ ॥

लवणाचामत्स्यकेला ॥ जीवनकळाहीपावला ॥ हेंनघडेपरीबोलिला ॥ रूपकमिषें ॥ ९७ ॥ तेथेंमत्स्यजातिपाहावें ॥ तरीउदकेंवीणजायजीवें ॥ आणिउदकींजरीअसावें ॥ तरीलवणाचा मत्स्य ॥ ९८ ॥ ह्मणोनउदकींविरोनजाये ॥ अथवावेगळाहीनजीये ॥ तस्मात्प्रमाणासनये ॥ ऐ

साअर्थु ॥ ९९ ॥ असोलवणमत्स्यजरीजीयावें ॥ मगउदकींअथवावेगळेंअसावें ॥ ह्मणोनठायीं चाचिनसंभवे ॥ तात्पर्यहेंचि ॥ ३०० ॥ तेवींज्ञानासीहानीनाहीं ॥ ह्मणोनअज्ञाननसेठायीं ॥ आतांनाथिलेंचिपाहीं ॥ भाविलेंजरी ॥ १ ॥ तरीज्ञानरूपाच्याठायीं ॥ हेंराहोंचनसकेपाहीं ॥ अथवाआत्मयावेगळेंही ॥ असोंचनसके ॥ २ ॥ असोअज्ञानहेंअनुमान ॥ हेंचिनव्हेअज्ञान ॥ तेथेंआत्मत्वींअथवावेगळेंजाण ॥ असेलकाई ॥ ३ ॥ ह्मणोनअज्ञानप्रतिपादन ॥ हेंवचनचिअप्रमाण ॥ ऐसानिश्चयोकरून ॥ पुढेंहीबोले ॥ ४ ॥

जेंअज्ञानयेथेंनसे ॥ तरीचआत्माअसे ॥
ह्मणोनिबोलणेंवायसें ॥ नायकावेंकीं ॥ ३७ ॥

